# "गीत ज्ञानेश्वर"




REFBK 0022512
REFBK-0022512

लेखक व रचिता :- विठ्ठल नरहरी बरबडे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 2359 ८१९४
22592

# अ र्प ण



**कै. सौ. प्रमिलास**

पुनीत केले करस्पर्शे तव भाग्यवंत ज्या करा।
तेचि जोडुनी करतो अर्पण सेवा 'ज्ञानेश्वरा'॥

**वि. न. बरबडे**
लेखक व कवि

REFBK-0022512
REFBK-0022512

# “गीत-ज्ञानेश्वर”

लेखक – कवि
विठ्ठल नरहरी उर्फ बबन बरबडे
मुलुंड, मुंबई नं. ८१

: मुद्रक :

प्रतिभा मुद्रण
कोठी रोड, महाल
नागपूर (महाराष्ट्र)

गिरिजा प्रिंटर्स
सुभाष रोड,
नागपूर

: प्रकाशक :

अजय प्रकाशन
कोठी रोड, महाल नागपूर

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

मुल्य बारा रुपये पन्नास पैसे

# प्रकाशिकेचे मनोगत

श्री. वि. न. बरबडे यांच्या भाविक आणि प्रासादिक लेखणीतून स्त्रवलेले **"गीत ज्ञानेश्वर"** मुद्रित करुन प्रकाशित करण्याचा योग, प्रतिभा मुद्रण आणि अजय प्रकाशन यांची संचालिका म्हणून मला लाभला हे महत्‌भाग्यच म्हणावे लागेल. कैवल्यमूर्ती श्री ज्ञानेश्वर माऊलीची सेवा हातून घडली याचा आनंद शब्दातीत आहे. तीनच वर्षापूर्वी श्री चंद्रशेखर वऱ्हाडपांडे रचित **"गीत गजानन"** या पुस्तकाचे प्रकाशनानंतर हे दुसरे संत वाङ्मय अजय प्रकाशन, नागपूर जनताजनार्दनाला मोठ्या श्रद्धेने सादर करीत आहे.

प्रस्तुत **"गीत ज्ञानेश्वर"** चे लेखक व कवी **श्री. बरबडे** हे प्राचार्य भाऊसाहेब खोलापूरकर यांचे मावसबंधू म्हणून माझे दीर. प्राचार्य खोलापूरकरांना ते वडील व मार्गदर्शक मानतात. त्यामुळे घरगुती जिव्हाळ्यासोबतच या साद्यंत प्रकाशनात त्या "ज्ञानीयांच्या राजाची" कृपाच दिसली. म्हणूनच अडचणींशिवाय हे प्रकाशन ठरलेल्या कालावधीत पार पडले.

श्री बरबडे हे रेल्वे सुरक्षा दलात अधिकारी आहेत. त्यांच्या हडेलहप्पी जीवनात भाविकता व असामान्य श्रद्धेचा सुगंध दरवळावा आणि त्याची परिणती **"गीत ज्ञानेश्वर"** या प्रासादिक काव्यात व्हावी हा एक अनाकलनीय योग आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या जीवनावर लिखाण करणे हे कठीण काम आणि त्यातही त्यांचे जीवन काव्यबद्ध करणे हे अती कठीण कार्य होय. विठ्ठलपंत-रुक्मिणी व त्यांची चार स्वयंप्रज्ञ अपत्ये यांच्या त्यागमय व अलौकिक जीवनाचे दर्शन या ग्रंथात श्री बरबडे यांनी घडविले आहे.

जनता जनार्दन ही सेवा रुजू करुन घेईल अशी आशा आहे.

**सौ. प्रतिभा खोलापूरकर**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 2369
22592
ग्रंथ शाखा (स्थळ ...)

॥ ॐ ॥



गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुःसाक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरुवेनमः ॥

श्री

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्ष्यम् ॥
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम् ।
भावातीतं त्रिगुण रहितं सदगुरुं तं नमामि ॥

॥ श्री गणेशायनमः ॥



कृपाळू पार्वतिनंदन ।
पूजितो देव गजानन ॥ धृ ॥

अवयव ज्याचे स्मृती प्रमाण ।
पुराण अठरा मणीभूषण ।
काव्य नाटके पायि रुणझुण ।
शोभवी देवाचे चरणऽ ॥ १॥


व्यासादिक ऋषी यांची तरल ।
प्रज्ञा कटिचा शेला विरल ।
सहा दिशा ह्या भूजा सबल ।
सोंड ही, ब्रम्हसौख्य ध्यान ॥ २॥

एक दंत हा संवादाचा ।
ज्ञानदीप हो द्वय नेत्रांचा
कर्ण उत्तर पूर्व मिमांसा ।
करी हा विघ्ने निर्दालन ॥ ३ ॥

चरणे दोन्ही चिन्ह 'अकार' ।
'उकार' दर्शक उदर विशाल ।
मस्तक सांगे अर्थ 'मकार' ।
असा हा ॐकार स्वयंपूर्ण ॥ ४ ॥

आणि शारदा विश्वमोहिनी ।
स्फूर्ति देवता कला कामिनी ।
अभिनव ऐसी ज्ञानदायिनी ।
भक्तिने तिजलाही वंदनऽ ॥ ५ ॥

तैसे प्रेमळ सद्‌गुरु माझे ।
जया कृपेने अवघड काजे ।
घेऊनि पावन पदी विराजे ।
गायनी ज्ञानेश्वर जीवनऽ ॥ ६ ॥



भागवत धर्माची पताका आजही उंच फडकावीत, डौलान भाविकांच श्रद्धास्थान होऊन उभ असलेल, आळंदी येथील हे 'श्री ज्ञानेश्वर मंदीर'

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 2309 22592
ग्रंथ शाखा

# दोन्ही कर जोडोनी

सा. न. वि. वि.

**अनंत हस्ते कमलावराने ।**
**देता किती घेशिल दो कराने ॥**

आज जनताजनार्दनासमोर "श्री ज्ञानेश्वर माउली"चा मला लाभलेला हा कृपाप्रसाद **"गीत–ज्ञानेश्वर"** सादर करतांना वरील उक्तीची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. कारण मी एका अर्थाने अतिशय सामान्य माणूस. शिक्षणही जेमतेमच, पण माउलींनी त्यांचे तेजस्वी आणि मांगल्याने ओतप्रोत भरलेलं जीवनचरित्र माझे हातून काव्यांत लिहून घ्यावे, यातच वरील उक्तीची सत्यता मला पटली आणि म्हणूनच मी अगदी नम्रपणे, तसा उल्लेख ह्या माझ्या निवेदनात करीत आहे. माउलींनी मला दिलेले हे दान फारच मोठे, अनुपम व अमोल आहे. त्याची महती गाण्यासाठी शब्दभांडार अपुरे आहे. कृपावंत माउलीचेच दान ते. मुक्त हस्ताने एका श्रद्धावान भक्ताला दिलेले. त्यात काय बरे कमी असणार ?

योगच असा होता. माझा जन्म अमरावती जिल्ह्यांतील एका लहानशा खेड्यात झाला. त्या खेड्याचे नांव बग्गी. तिथे मी लहानपणी जे पाहिले ते वातावरण अत्यंत भाविक. चंद्रभागा नांवाची नदी. नदीच्या पात्रातच मध्यभागी देऊळ. नदीच्या गावाकडील किनाऱ्यावर इतर देवळे आणि सत्पुरुषांच्या समाध्या. तिथून दरवर्षी नियमाने आषाढी एकादशीला पंढरपूरला पोहोचेल अशा अंदाजाने, वारकरी मंडळींचा जथ्था निघत असे. मी पाच–सहा वर्षाचा असेन. मला आठवते. "ज्ञानबा–तुकाराम" च्या गजरात आणि टाळमृदंगांच्या मधुर तालात ते विठ्ठलभक्त, पंढरपूर मार्गावर पाऊल टाकीत त्यावेळी सर्व गांवकरी

लोकासमवेत माझे आईवडीलही मला घेउन वेशीपर्यंत जात आणि त्या वारकऱ्यांना निरोप देउन परत गांवात येत. त्यावेळी कानावर पडलेले ते पवित्र शब्द, "ज्ञानबा–तुकाराम" हृदयात कुठेतरी जागा धरुन बसले आणि परिणामतः भावी जीवनात भाविकता, दया, नम्रता, न्यायप्रियता इत्यादि सद्‌गुण माझ्या ठायी रूजले आणि बहरले.

बालपण गेले. वयाचे सोळावे वर्षीच दैवगतीच्या चक्रामुळें संपूर्ण घर चालविण्याची जबाबदारी माझे शिरावर पडली. सन १९४१ साली गांव सोडून मी अमरावती येथे आलो व कै. डा. श्रीधर रंगनाथ उर्फ भाऊसाहेब भट यांचे दवाखान्यात नोकरीला लागलो. माझी आज्ञाधारक, चाणाक्ष व काम करतांना दिसणारी तडफदार वृत्ती, भाऊसाहेबांच्या सोज्वळ, दानशूर आणि अनुभवी दृष्टीतून सुटली नाही. माझ्यावर त्यांचा खूप लोभ जडला. त्यांच्या दयाळू हृदयात माझ्याविषयी पुत्रवत जिव्हाळा निर्माण झाला. मी सावलीप्रमाणे त्यांचे सोबत राहू लागलो. आणि हाही पण एक योगच म्हणावा लागेल, भाऊसाहेबांचे मन ऐहिक गोष्टीपासून विरक्त होऊ लागले. जन्मांध संत **श्री गुलाबराव महाराज मोहोड माधानकर** यांच्या सुशिक्षित आणि विद्वान अशा श्री ज्ञानेश्वर माउलीच्या भक्तगणांच्या सहवासात ते रमले. त्या नांवाशी ते एकरूप झाले. "श्री ज्ञानेश्वर माउली" हे नांवच त्यांचे पुढील जीवन झाले. त्याच वर्षी कात्यायनी व्रताच्या उत्सवाकरिता, भाऊसाहेबांना संप्रदायाकडून निमंत्रण येताच त्यांनी जाण्याची तयारी केली. सोबत मलाही घेतले. सर्वत्र भक्तगणासह मी पण त्या "पोहोनगाव" येथे झालेल्या कात्यायनी सोहळ्यात भाग घेतला. तो दिव्य सोहळा पाहून मी भारला गेलो. तल्लीन झालो. मला काही तरी सुप्त असे मानसिक समाधान वाटले. पुढे भाऊसाहेबांच्या आज्ञेनेच मी इंग्रज सरकारच्या नोकरीत शिरलो. सन १९४३ ते ७५ हा ३२ वर्षाचा काळ नेत्रपटलासमोरून झरझर निघून गेला. सरकारी नोकर आणि तोही पोलीस दलासारख्या 'रेल्वे सुरक्षा दलाचा' अधिकारी, त्याचबरोबर एक संसारी माणूस, ह्या दोनही भूमिका वठवून त्या काळात जीवनयात्रा पार केली–पण स्वतःला न विसरता, स्वतःच दैवी मुद्दल न गमावता अहंकारी, अन्यायी व स्वार्थी वृत्तीशी कोणतीही तडजोड न करता घरात माझी पत्नी सौ. प्रमिला हिने घरातली आनुवंशिक वारसा म्हणून मिळालेली भाविकतेची ज्योत सतत तेवत ठेवली. तिने त्या ज्योतीला आपल्या पातिव्रत्याचा, सात्विकतेचा आणि भाविकतेचा स्नेह पुरविला. तारीख १ जानेवारी १९६७ ला इहलोक सोडून जाताना तिने तोच भाविकतेचा पुण्यवारसा आपल्या कन्या कु. आशा (आता सौ. आशा देशपांडे), कु. लता, कु. सुनंदा यांचे हाती दिला. ती भाविकता घरात स्थिरावली. मी पण त्या भाविकतेत नाहून निघालो. वावटळी आल्या तशा निघून गेल्या. त्या वावटळीच्या मायावी चक्रात सुद्धा

आम्ही डगमगलो नाही. खंबीर पाय जमिनीला धरून राहिले. अशा वावटळीं-कडेही समत्व भावाने पाहिले.

१९७६ साल उजाडले. मला वाचनाचा नाद पूर्वीपासूनच होता. असाच एक दिवस मी व्ही. टी. हून घरी परत येत असतांना, **नवनीत** या मराठी डायजेस्टची पाने गाडीत बसून चाळत होतो. एका अभिनव ओळीवर माझी नजर स्थिरावली. **"मोगरा फुलला"**. प्रथमदर्शनीच "श्री ज्ञानेश्वर माउली" ह्यांच्या जीवनावर लिहिलेले हे वाङमय आहे, हे माझ्या लक्षात आले आणि मी तल्लीनतेने वाचू लागलो. तो प्रसंग व वर्णन करण्याची लेखकाची शैली आणि आत्मियता, ह्या सर्वांचा माझ्या जिज्ञासू मनावर इतका परिणाम झाला की, क्षणभर मला वाटले, तो प्रसंग माझ्या दृष्टीसमोरच घडत आहे. मी त्या लेखाशी अगदी एकरूप झालो आणि पर्यायतः त्या प्रसंगाची छाप माझे मनावर पडली. या महाराष्ट्रांतील संतवाङमय लेखकरत्नमालिकेतील प्रभावंत "कौस्तुभरत्न" असे **श्री. गो. नी. उर्फ आप्पासाहेब दांडेकर** लिखित **"मोगरा फुलला"** ग्रंथातील "श्री ज्ञानेश्वर" संजीवन समाधिप्रसंग त्या लेखात प्रकाशित केला होता. काय लिहिण्याची शैली ! काय सुंदर भाषा ! **"तेथे कर माझे जुळती"**. अक्षरशः माझे दोनही हात जोडले गेले, आप्पासाहेबांसाठी. त्याच क्षणी मी निश्चय केला की, **'मोगरा फुलला'** हे पुस्तक वाचायचे. तदनुसार दुसरे दिवशी मी सारा मुंबई बाजार पालथा घातला. सारे बुकडेपो आणि बुकस्टॉल अक्षरशः चाळणीतून काढल्यावत हुडकले. सर्व ठिकाणी एकच उत्तर–प्रती संपल्या ! पुढील आवृत्ती निघाली म्हणजे मिळेल. हताश झालो. . तात्पुरता तरी.

दोनच दिवस मध्ये गेले असतील. मी माझे एक स्नेही श्री. डी. के. भिसे यांचेकडे वाचण्याकरता म्हणून पुस्तकांचे शोधात गेलो. त्यांचेकडे पुस्तकांचा मोठा संच आहे हे मला माहीत होते. मी त्यांना "पुस्तक द्या एखादे वाचायला" असे म्हणताच, "तुम्ही तर सर्वच पुस्तके वाचली आहेत दादासाहेब. ही कपाटाची चावी घ्या आणि जे लागेल ते पुस्तक घ्या" अस म्हणतच, त्यांनी चावी माझे हातात दिली, मी कपाट उघडले. एक एक पुस्तक काढीत होतो, नांव वाचीत होतो आणि बाजूला ठेवत होतो. सर्वच पुस्तक मी वाचली होती. एकादे तरी न वाचलेले पुस्तक मिळेल या आशेने मी पुस्तक काढीत असतांना, माझ्या तोंडातून एकाएकी आश्चर्यदर्शक उद्‌गार बाहेर पडले. "काय हो दादासाहेब काय झालं ?" असं भिस्यांनी विचारताच मी माझे हातातील नवी कोरी **'मोगरा फुलला'**ची प्रत त्याना दाखविली आणि म्हणालो, "भिसे प्रत्यक्ष सूर्यबिंब तुमच्या घरांत आणि त्याचा प्रकाश पण तुम्हाला दिसू नये, हे एक आश्चर्यच आहे माझ्या दृष्टीने". त्यावर थोडे हसणेबोलणे झाले, चहा घेतला आणि भिसे कुटुंबाचे आभार मानून घरी परतलो.

'मोगरा फुलला' वाचन सुरू केलं आणि वाचनाच्या दरम्यान ह्या मजकूरावर माझी नजर स्थिरावली. "मत्त गजास आकळण्याचे सामर्थ्य ज्याचे अंगी त्याने मुखावरील घोंघावणारी मुरकुटे काय वारीत बसावे ? साती सागर पैल जाण्याऐसा जो बळिवंत, त्याने थिल्लरात हात मारीत काये म्हणून तृप्तता आनुभवावी ? दाही दिशा ओलांडण्याची शक्ती ज्याचे पंखामध्यें त्याने एकाद्या पिंजऱ्यात काये म्हणोन संतुष्ट असावे. ?"

पैठण मुक्कामी गोदातिरी कालिका मंदिरात, मानवी जन्म त्याची क्षणभंगुरता आणि अविनाशी आत्मा तसेंच नाशवंत देह, यावरील प्रवचनांत, श्री. ज्ञानदेव वरील उल्लेख करून गेले, तेच लेखकाने प्रतिपादन केले होते. पुन्हा पुन्हा ही वाक्ये मी वाचत होतो आणि विचार करत होतो. **त्या वाक्यांनी मला आत्मज्ञान झाले.** माझ्यातील सुप्त प्रतिभेला ते आव्हानच ठरले शेवटी.

पुस्तकाचे वाचन सुरू केले. रसग्रहण करीत एक एक पान, एक एक अक्षर तन्मयतेने वाचत गेलो, प्रत्येक वाक्याचा अर्थ, त्यातील गूढता आणि सौंदर्याचे आकलन करत गेलो. प्रसंग व ते वर्णन करण्याची श्री. आप्पासाहेबांची शैली मनात साठवीत गेलो. एक वाचन झाले. तृप्ती वाटेना म्हणून पुन्हा दुसरे वाचन सुरू केलं. आणि त्या दुसऱ्या वाचनांत तो भाग्यवंत क्षण आला. "श्री ज्ञानदेवां"च्या वर नमूद केलेल्या वाकगंगेतून माझ्यातील काव्यप्रतिभा जागृत झाली. पुस्तकातील विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांचे विवाहाचा प्रसंग वाचत होतो. सहजच मनांत एक कल्पना आली कीं, हाच प्रसंग काव्यांत जर उतरविला तर कसा दिसेल ? १९४० पासूनच मी लहानसहान कविता करायचा. ही देणगी मला दैवदत्तच होती. पण मी कधी कुण्या मोठ्या विषयाला हात लावला नव्हता. कल्पना येताच विवाहप्रसंग काव्यांत उतरविण्याकरितां शब्दांची बांधणी सुरू केली, पण झोप येईपर्यंत मनासारखी सुरवात काही जमली नाही. रात्री त्याच गूढ तंद्रीत असतांनाच झोप लागली.

गाढ झोपेंत होतो मी. कानावर रेडिओची घोषणा आली, ". . . .आणि गात आहेत लता मंगेशकर" आणि लगेच विश्वाची गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या आवाजांत गानपंक्ती ऐकू येऊ लागल्या,

"श्री सिद्धेश्वर साक्ष ठेउनी ।
विठ्ठले रुक्मिणीस वरले ।
राउळी शुभमंगल झाले ।।"

ह्या कर्णमधुर आवाजातल्या पंक्ती कानावर पडल्या आणि माझी झोप उघडली. पाहतो तो आवाज बंद. मी लगेच रेडिओच्या खोलीत आलो. लाइट

लावला. सर्व मुले झोपली होती आणि रेडिओच बटन बंद होते. ऐकलेल्या ओळी एकसारख्या कानांत घुमत होत्या व मी त्या माझ्या तोंडाने त्याच चालीत गुणगुणत होतो. मला पडलेले स्वप्न होते ते, ही माझी खात्री झाली. मला त्याच वेळी काही सुप्त जाणीव झाली. न्हाणीघरांत गेलो, हात–पाय–तोंड धुतले. श्री. दत्तात्रयाच्या प्रतिमेसमोर पणती पेटविली. उदबत्ती लावून दत्त आराधना केली, साष्टांग नमस्कार केला आणि लेखनसाहित्य घेऊन निद्रावस्थेत ऐकलेल्या त्या तीन ओळी ॐकाराचे खाली लिहिल्या. त्या वेळी ३॥ वाजले होते. सकाळी ५॥ वाजेपर्यंत तो पूर्ण प्रसंग काव्यांत उतरला होता. निद्रावस्थेत असतांना ऐकलेल्या चालीतच ते गीत मी म्हणून पाहिले. साडेसहा वाजता जेव्हां मुले झोपून उठली तेव्हा त्यांनाही गाऊन ऐकविले. त्यांना फारच आवडले. ही घटना भविष्यकाळची नांदीच वाटली मला त्यावेळी. त्यानंतर मी "मोगरा फुलला" ह्या पुस्तकांतील एक एक प्रसंग काव्यांत उतरवीत गेलो आणि अशा रीतीने "गीत–ज्ञानेश्वर" ची कल्पना मनांत उपजली. स्वतः माउलींचीच कृपा दिसली मला त्या अनपेक्षित घटनेमागे.

"श्री ज्ञानेश्वर माउली" यांचे जीवनावर इतर लेखकांनी लिहिलेले गद्य वाङमय मी मिळवले आणि वाचून काढले. 'श्री ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' पुन्हा एकदा वाचले. या सर्व वाचनामुळे 'ज्ञानेश्वर' जीवनाची पूर्ण कल्पना झाली. प्रसंगामागून प्रसंग काव्यबद्ध उतरत गेलेत.

तेवढ्यात काही कामानिमित्त मला नागपूरला जावे लागले. माझ्या लिखाणाच्या वह्या सोबत होत्याच. माझे मावसभाऊ, प्राचार्य ल. पु. खोलापूरकर यांच्या घरीच नेहमीप्रमाणे माझा मुक्काम होता. एक दिवस माझी गीते लिहिलेली वही बैठकीत टेबलावर ठेऊन मी स्वयंपाकघरांत सौ. वहिनींशी गप्पा मारत होतो. भाऊसाहेब तिथे आले. माझी ती वही हातांत घेऊनच आणि म्हणाले, "अरे बबन तू काय लिहीत आहेस ?" मी त्यांना थोडक्यांत माझ्या 'गीत ज्ञानेश्वराची' कल्पना दिली. त्यावर ते म्हणाले, "काव्यरचना फारच सुंदर केली आहेस, तू पूर्ण कर. "ज्ञानेश्वर माउली" प्रसन्न दिसते तुझ्यावर. दैवी कार्य हाती घेतलेस आणि ते तू पूर्ण करू शकशील असा मला विश्वास वाटतो"

त्याच रात्री मी माझी काही गीते त्यांना काही निवडक निमंत्रितांच्या घरगुती बैठकीत गाऊन ऐकविली. ऐकणाऱ्या सर्वांनीच प्रशंसा केली गीतांची व त्यांतील हृदयस्पर्शी गूढ अर्थाची. माझ्यावर माया असलेल्या प्रेमळ माणसांकडून मिळालेले ते प्रोत्साहनच होते.

'श्री गणेश' चतुर्थी आली. त्याच शुभदिनी ब्रम्हमंत्रोच्चारांत श्री. गजाननाची स्थापना केली. 'श्री गुरुदेवदत्तांची' प्रतिमा पाटावर मांडली आणि समोर श्री ज्ञानेश्वर माउलींचे नावाचा नारळ ठेउन पक्क्या लिखाणाचा श्रीगणेशा केला; ॐकाराच्या नादब्रह्मांत आणि ज्ञानदीपाच्या प्रकाशांत. आज पौष मासातील

संकष्टीचतुर्थी. ह्या 'गीत-ज्ञानेश्वर' लेखनाची समाप्ती. माझ्यासारख्या पामरा-हातून "श्री माउलींनी" लेखन पूर्ण करवून घेतले, कृपावंत माउली. "मूकं करोति वाचालम् । पंगु लंघयते गिरिः ॥ ईश्वरी लीला अगाध आहे. एक स्वप्न साकार झालं त्यांच्या कृपाप्रसादे.

"मोगरा फुलला" या पुस्तकांतून "गीत-ज्ञानेश्वर" लिहिण्याची तात्कालिक प्रेरणा झाली म्हणून कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे आद्य कर्तव्य समजलो आणि तसे पत्र मी श्री. आप्पासाहेबांना लिहिले. त्यांनी उलट डाकेने पत्र पाठवून "गीत-ज्ञानेश्वर" लिहिल्याबद्दल माझे अभिनंदन केलं व मला माझ्या कार्यात सुयश चिंतिले. प्रत्यक्ष सरस्वतीपुत्राचेच आशीर्वाद लाभले मला. मी पुढेपुढे जात होतो. नंतर लगेच मला प्रत्यक्ष आप्पासाहेबांच्या भेटींचे योग आले. ते मला मार्गदर्शन करत गेले आणि त्यांच्याच महान आशिर्वादाखाली हे माझे स्वप्न साकार झालं. मी त्यांचा अतिशय ऋणी आहे, त्याचप्रमाणें सुप्रसिद्ध कवी आणि पत्रकार श्री. सुरेश भट, साहित्यिक श्री. विद्याधर गोखले, शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे, "इंद्रायणिकाठी" चे लेखक श्री. रवींद्र भट, महाराष्ट्राचे लाडके स्वरसम्राट श्री. सुधीर फडके, ज्ञानेश्वर माउलीभक्त व विधान परिषद सदस्य श्री. गोविंदराव आठवले, अॅडव्होकेट नागपूर, या सर्वांनी मला ह्या कार्यात अमोल सहाय्य केले, त्यावद्दल मी त्यांचा ऋणी आहे. माझे मुख्य सुरक्षा अधिकारी श्री. सु. वि. भावे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. शारदा भावे, ह्यांनी या माझ्या कार्यात वेळोवेळी हातभार लावून मला उपकृत केले यावद्दल मी त्यांचाही अत्यंत आभारी आहे.

"गीत-ज्ञानेश्वर" साठी मुखपृष्ठावरील श्री माउलीचे चित्र काढणारे चित्रकार श्री. लक्ष्मणराव हडकर (एल. राजाराम आर्ट स्टुडिओ), घटनास्थळांचे फोटो काढणारे श्री. एन. एस. नायर, चित्र व फोटो यांचेवरून ब्लॉक बनविणारे श्री. गुप्ता ब्रदर्स, मुखपृष्ठ अत्यंत आत्मियतेने आणि सुंदर छापून देणारे श्री. एस. एस. पालकर आणि "गीत-ज्ञानेश्वर" च्या मुद्रणाची जबाबदारी अत्यंत प्रेमाने आणि सुबकपणे पार पाडणाऱ्या सौ. प्रतिभा खोलापूरकर (महाल, नागपूर) यांचाही मी अत्यंत ऋणी आहे.

तद्वतच मला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या मित्र, मैत्रिणींचे आणि हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार मानून मी ही माझी सेवा श्री ज्ञानेश्वर माउलीच्या चरणी भक्तिपूर्वक अर्पण करतो.

आपला नम्र

**विठ्ठल नरहरी बरवडे**

आर. बी. ३ /३६ /३

मुलुंड (पूर्व) मुंबई-८१

# प्रस्तावना

साकेत या महाकवि मैथिलीशरण गुप्तांच्या महाकाव्याच्या प्रारंभी त्यांनी दोन पंक्ती लिहिल्या आहेत.

राम तुम्हारा नाम स्वयंही काव्य है ।
कोई भी बन जाय कवि, सहज संभाव्य है ।।

श्री ज्ञानेश्वर चरित्राचे तसे आहे.

या महानुभवाच्या जीवनाभोंवतीं एक विलक्षण गूढ निर्माण झाले आहे. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी यासारखे अद्वितीय ग्रंथ निर्माण करून देखील ज्ञानोबांनी स्वतःच्या लौकिक जीवनाविषयी एक ओळ देखील कुठें लिहून ठेवली नाही. केवळ नामदेवांचे अभंग हेंच काय तें या दिव्यचरित्राचा मागोवा घेण्यासाठीं हाताशीं उपलब्ध असलेले सूत्र. तेवढ्या या सुतावरून ज्ञानेश्वर भक्तांनी स्वर्गास जाण्याचे कितीएक प्रयत्न केले आहेत.

हें असें अतर्क्य त्या चरित्राभोवतीं रचलें असल्यामुळेच रामायणाप्रमाणच ज्ञानदेव चरित्र हाही अनेक कवींना काव्यरचनेची स्फूर्ति देणारा विषय झाला आहे.

मित्रवर विठ्ठलराव बरबडे देखील 'गीत ज्ञानेश्वर' लिहिण्याकडे असेच प्रवृत्त झाले. ज्ञानदेव हा त्यांच्या परम आदराचा विषय. त्यांच्या चरित्राचे चिंतन करीत असतां, बरबड्यांना एका गीताचा प्रथम चरण कसा दिसला हे त्यांनी मोठ्या श्रद्धेने नोंदून ठेवले आहे. पोलिसी खात्यांतील आपली नोकरी नेटकेपणें सांभाळून त्यांनी आपला अलिकडील शेष सर्व काळ 'गीत-ज्ञानेश्वर' लिहिण्याकडे खर्च केला आहे. हा त्यांच्या जीवनांतील सर्वाधिक भाग्यशाली काळ असे मी मानतो.

"जे भक्तचरित्रातें प्रशंसिती, ते मज प्राणापरौते आवडती," असे वाक्य ज्ञानदेवांनी श्रीहरीच्या मुखी घातले आहे. तेव्हां बरबडे हे 'देवांना प्रिय' गणले जातील, याविषयीं शंका बाळगण्याचे कारण नाही.

त्यांची काव्यरचना साधी सुबोध आहे, 'वंशीनादनटी' सारखी शब्दांची खटपट नाही कीं, 'कोमल कांत पदावली' चे दर्शन इथे नाही, तरी ही एका श्रद्धावान सद्भक्तांची काव्यांजुळी आहे.

माउलींनी म्हटले आहे :-

प्रभू तुम्ही महेशाचिया मूर्ती ।
मी दुबळा अर्पितसे भक्ती ।
हे बोल जरी गंगावती ।
तरी स्वीकाराल की ।

ज्ञानदेव ह्या गंगावतीच्या त्रिदळाने केलेली पूजा निश्चितच गोड मानून घेतील.

— गोपाळ नीळकंठ दांडेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2329
दा. क्र. 22592

# कृ त ज्ञ ता

"गीत ज्ञानेश्वर" लेखनाला यांचे आशिर्वाद लाभले.



लेखकाचे बंधू, प्राचार्य ल. पु. उर्फ भाऊसाहेब
खोलापूरकर, आळंदी येथे पतीत पावन
इंद्रायणीत उभे राहून श्री सूर्यनारायणाला
अर्घ्य देत आहेत.



'श्री ज्ञानेश्वर माउली' संजीवन समाधीला "गीत ज्ञानेश्वर" चे हस्तलिखित श्रद्धापूर्वक अर्पण करीत असतांना लेखक–कवि.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2309
दा. क्र. 22492
ग्रंथ : शाखा

# पार्श्वभूमि

स्वर्गात वैकुंठलोकी मोठा उत्सव सुरू होता. ब्रह्मा, विष्णु आणि महेश; इतर देवाधिदेवासहीत प्रसन्न वातावरणात, सभागृहात बसले होते. मधूर पुष्पांचा सुगंध सर्वत्र दरवळत होता. गंधर्वाचं मंजुळ गायन चालू होतं आणि त्याच संगित तालावर स्वर्गपऱ्यांचं होणारं मोहक नृत्य पाहून, सर्व देवाधिदेवच काय पण शीरावर पृथ्वी धारण केलेले शेष भगवानही डोलत होते. निर्माण केलेल्या जगतात सर्व जीव सुखी आहेत, कुणालाही कसलच दुःख राहिलं नाही, सर्व राक्षस योनिचा नाश झाला आहे म्हणून धर्मकार्य, यज्ञ यात विघ्ने येत नाहीत, जनांचे दैनंदिन व्यवहार आनंदात चालू आहेत, त्यानिमित्त हा आनंदोत्सव देवांनी आयोजित केला होता. वातावरणच धुंद होत आणि त्या आनंदोत्सवात सर्वच देव मग्न झाले होते.

एवढ्यात नारायण ऽऽऽ नारायण ऽऽऽ म्हणत आणि हातातील वीणा, चिपळ्या झंकारीत महामुनी नारद दारात येऊन उभे राहिले. त्यांना पाहाताच देवाधिदेवांनी मोठ्या प्रेमानं त्यांचं स्वागत केलं. नारद आसनस्थ झाले.

"काय आदिदेवा, कशा निमित्त हा आजचा महोत्सव साजरा होत आहे, हे मला कळेल काय ?" असं नारदांनी विचारताच, भगवान विष्णू म्हणाले, "मुनिराज आपण निर्माण केलेल्या जगतात सर्व प्राणी—जीव सूखी आहेत, कुणालाच कसलही दुःख असं राहिलं नाही, धन धान्य यांची समृद्धी आहे, मानवांचे दैनंदिन व्यवहार अविरत आनंदात चालू आहेत, कुणालाच कसलीही चिंता राहिलेली नाही, त्यामुळे आम्हालाही काही काळजी नाही आणि कामही पण राहिलं नाही; म्हणून त्याप्रित्यर्थ आजचा हा महोत्सव साजरा होत आहे. आपणही थांबाव आणि ह्या महोत्सवाचा आस्वाद घ्यावा.

"नारायण ऽऽऽ नारायण ऽऽऽ आश्चर्यच आहे", असं म्हणून महामुनी नारदांनी एक दीर्घ उसासा घेतला. "वंद्य मुनिराजा, आपण आश्चर्य हे असं का

म्हटलं ? आम्ही बोलतो त्यात आपणाला वावगं आणि असत्य, असं काही दिसतं काय ? सांगा मुनिराज, सांगा लवकर. आम्ही ऐकण्यास उत्सुक आहोत." भगवानं विष्णू उद्गारले.

"नारायण ऽऽऽ नारायण ऽऽऽ" ही अशी एक दीर्घ ललकारी देतच नारदमुनी सांगू लागले.

"देवाधिदेवा आताच मी भूतलावर भ्रमण करून येत आहे. मी स्वये, जे तिथं पाहिलं आणि अनुभवले; ते आपण आता म्हणालात त्याच्या अगदी उलट आहे."

"महामुनी आम्हाला तर असं समजलं की, आता भूतलावर एकही दुःख म्हणून शिल्लक राहिलेलं नाही मग उलट ते कसं ?" भगवान विष्णू संचित होतासे बोलले.

"सांगा मुनिराज सांगा लवकर आणि या अज्ञानातून आमची मुक्तता करा. आम्हाला सत्य समजू द्या तुमच्याच तोंडून".

"ऐकाव देवानो, मी सांगतो ते." असं म्हणून नारद आपलं कथन सांगू लागले.

नारद— **झाला भूवरती अंधार ।**
**देवा पुनरपि घ्या अवतार ।।धृ।।**

जीव दीन ते अश्रु ढाळती ।
अन्नाविण कुणी तडफडताती ।
दुःखे सज्जन जर्जर असती ।
पीडा मानवा फार ।।१।।

जाति भेद ही अगणित झाले ।
एक दुजाते मानि धाकुले ।
ब्रम्हवृंद जणु देवचि बोले ।
आम्हीच तारणहार ।।२।।

शूद्रांना त्रैवर्णिक छळती ।
क्षत्रिय वैश्याचिही अवनती ।
संकट भारी अवलावरती ।
नाही तया आधार ।।३।।

श्रीमंतागृही लक्ष्मी नाचे ।
संपत्तीसह सरस्वतीचे ।
आसन झाले इतरा वंचे ।
अज्ञा ना उद्धार ॥४॥

यज्ञमंडपी वेद पुराण ।
वध वेदीवर पशुचे प्राण ।
घेती मंत्रोच्चारे ब्राम्हण ।
वाहते रक्ताची मग धार ॥५॥

मानव समजे पशु मानवा ।
लाज ही येईल बघुनी दानवा ।
व्यभिचारांचा नाच नागवा ।
ना करवे उच्चार ॥६॥

परचक्रे येतात भारती ।
प्राणा घेउन मूर्ति भंजती ।
लूट सुवर्णा जाय मागुती ।
करुनी क्रूर संहार ॥७॥

हत्या या परी रोज चालते ।
स्वये पाहिली ईश देवते ।
कथा सांगता मन हळहळते ।
खरेचि अपरंपार ॥८॥

कृष्णावतारी गीता कथिली ।
संस्कृत माजी आहे लिहिली ।
बहुजन अज्ञा नाही समजली ।
तिचे तत्व ना सार ॥९॥

जाउनी आता भूलोकावर ।
प्राकृति सांगा गीता सत्वर ।
कळेल अज्ञा हे परमेश्वर ।
ज्ञानामृत साकार ॥१०॥

काय सांगु मी अशी दुर्दशा ।
भू - उद्धारा एकची आशा ।
पुरी करावी त्रिलोक ईशा ।
उचलावा हा भार ।।११।।

"देवा ही अशी भयानक आणि अमानुष परिस्थिति आहे भूतलावर. आपण तिथं गेल्यावर स्वयेच अनुभवाल."

"परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ।
धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे" ।।

हे प्रभो आपणाला पुन्हा अवतार घेऊन भूतलावर जाण्याशिवाय गत्यंतरच नाही.

देवांना हे ऐकून अतिशय दुःख झालं. ब्रह्मदेव, भगवान विष्णूला म्हणाले "देवा आपण जाव मृत्यूलोकात अवतार घेऊन असा समय पातला आहे. तरी आता तयारीला लागाव."

विष्णु भगवान जरा दुःखित झाले आणि म्हणाले, "देवा, नेहमी मलाच तुम्ही अवतार कार्य करायला पाठविता आणि आपण स्वतः मात्र, सारी गंमत पाहात इथं स्वर्गलोकात बसता. मी अवतार घेऊन जातो. सर्व यातना मला एकट्यालाच सहन कराव्या लागतात. पांच पांच तप ऽ मग मला स्वर्गलोक सोडून मृत्यूलोकात राहावं लागतं. राम अवताराचे वेळी सर्व हाल माझे झालेत. चवदा वर्षे वनवासात मी अडकलो. पत्नी वियोगाचं दारुण दुःख मला शेवटपर्यंत सहन करावं लागलं. कृष्ण अवतारामध्यें राक्षसांचा निःपात करण्याचं कार्य मला एकट्यालाच करावं लागलं आणि वरून चोर, कपटी अशा अनेक उपाधी लोकाकडून मलाच ऐकाव्या लागल्या. महाभारतात पांडवांना सहाय्य करतांना, अधर्मी, कपटी, कृष्णकारस्थानी अशी विशेषणही धारण करून सर्वांचे शिव्याशाप शेवटी माझ्याच वाट्याला आलेत. आता मात्र मी एकटा जाणार नाही. यावेळी आपण स्वतः आणि भगवान महेशही पण येत असतील, तरच मी जाईन." भगवान विष्णुदेव हट्ट धरूनच बोलले.

ब्रह्मदेव हंसले आणि म्हणाले, "ठीक आहे देवा आम्ही दोघही तुमच्याबरोबर येऊ. आपण तिघही भाऊ भाऊ म्हणून जाऊ आणि एकाच कुशीतून जन्म घेऊ. आपलं कार्य मात्र दोनच तपात पूर्ण करून परत येऊ. म्हणजे स्वर्गलोक

जास्त काळ आपणाविणा खाली राहाणार नाही. काय महामुनी ठीक आहे कल्पना ?"

"नारायण ऽऽ नारायण ऽऽ" महामुनी नारद म्हणाले, "देवा, शुभ कार्याला तिघानी जाऊ नये असा आपलाच दंडक असतांना, हे असे कसे आपण तिघे जाणार!"

हे ऐकून स्वर्गदेवता आदिमाया उठून उभी राहिली आणि म्हणाली, "देवा मीही पण यावेळी तुम्हासोबत मृत्यूलोकांत येणार, तुमची धाकटी बहीण म्हणून. मी चवथी राहीन. मलाही बरोबर न्यावं."

ब्रह्मा, विष्णू आणि महेश ऐकून खुष झाले. ब्रह्मदेव नारदांना म्हणाले, "ठीक आहे महामुनी ठरलं हे. आणखी काही सूचना ?"

महामुनी नारद उत्तरले, "देवा, पूर्वी राम आणि कृष्ण अवताराचे वेळी, आपण अवतार घेऊन जाणार, ही बातमी भूतलावर पहिलेच पोहोचली होती. त्यामुळे जन्मापासूनच तुम्हाला देव मानण्यात आलं होतं. जन्मापासून, नरजन्मात सामान्य जीवांना मिळणाऱ्या पीडा आणि यातना आपणाला अनुभवता आल्या नाहीत. दुसरं म्हणजे आपण राम अवताराचे वेळी जन्म घेतला तो महाराजा दशरथाच्या राजप्रासादात. त्यामुळे राजपुत्र म्हणून, आपल्या वाट्याला सामान्य जनता क्लेश, बालपणी आलेच नाहीत. कृष्ण अवतारात आठ वर्षाचं आपलं सगुण रूपच देवकी-वसुदेवाच्या समोर जन्मताच उभं राहिलं होतं देव-अवतार म्हणून. नंतर ज्या नंदाघरी आपण गोकुळात वाढलात तेही सुखी लोक होते. त्यामुळे बालपणीचे हाल, दैन्य आणि अपेष्टा आपणाला अनुभवता आल्या नाहीत. तिसरं असं की, त्या दोनही अवतारात आपला जन्म उच्च कुळात झाला होता. त्या कारणानं वर्णभेद, जातिभेद आणि धर्मभेद यानुसार मिळणारा उपेक्षित जीवनाचा अनुभव आपणाला घेता आला नाही. पर्यायानच आपण त्यावर उपायही करू शकला नाहीत. आता तर त्या समस्या फारच जोरात फोफावल्या आहेत व त्यावर आपणाला इलाज करून, जनांना मार्गदर्शन करावं लागणार आहे. तरी ह्या सर्व बाबी विचारात घ्याव्यात देवांनी.

नारद मुनींचं कथन संपलं. ऐकून ब्रह्मदेव म्हणाले, "ठीक आहे महामुनी. आमच्या ध्यानात आल सर्व. ह्यावेळी आम्ही अवतार घेऊ तेव्हां आमचं आगमन पृथ्वीवर कुणालाच कळणार नाही. एवढच काय आम्हाला सुद्धा भूतळावर असेपर्यंत ते स्मरणार नाही. दुसरं म्हणजे आम्ही ना ब्राह्मण असू, ना क्षत्रिय, ना वैश्य, ना शूद्र. सर्वच ज्ञाति आणि धर्मजन ज्यांना अती हीन, त्यजित म्हणून

पाहील अशा एका निराळ्याच पंथात आम्ही जन्म घेऊ. आता झालं समाधान आपलं ?"

"नारायण ऽऽ नारायण ऽऽऽ" असं म्हणतच नारदमुनी भूतलाकडे निर्देश करून दाखवू लागले आणि म्हणाले, "ते बघा देवा. योगायोगच हा. भूतलावर पवित्र आळंदीला, सिद्धेश्वर राउळात "शुभमंगल होत आहे. तेच ठिकाण योग्य आहे अवताराला." सर्व देवाधिदेव ते शुभमंगल पाहात होते. त्यांनी त्या शुभमंगलावर पुष्पवृष्टी केली. नारद नारायण ऽऽ नारायण ऽऽ म्हणतच सर्व देवादिदेवांना वंदन करून वीणा–चिपळ्या झंकारीत आपल्या पुढील मार्गाला लागले.

□ □ □

2367
22592

# पूर्वपीठिका

**'सुजलाम् सुफलाम्'** अशी पुण्यभूमी म्हणून पुराणांनी गौरविलेल्या भारत भूमिवर, ज्या भागामध्यें हे शोकमय, पवित्र, सोज्वळ, भाविक आणि चिरस्मरणीय असं अजरामर कथानक, त्या जगत् निर्मात्या परमेश्वरानं घडवून आणलं, त्यातील प्रमुख अशा भूप्रदेशावर देवगिरीचा रामदेवराय यादव, यांचे समृद्ध असे राज्य होते,

त्याच प्रदेशात दक्षिणगंगा गोदावरी काठी, प्रतिष्ठाण, आता पैठण नावानं उल्लेखिली जात आहे ती, श्री आणि सरस्वती, यांनी संपन्न, अशी पुरातन नगरी होती. प्रतिष्ठाणचा ब्रम्हवृंद इतका व्युत्पन्न समजला जाई की, कोणत्याही आणि कोठल्याही धर्मसमस्येवर, त्यांनी दिलेला निर्णय, हा सर्व देशभर शिरसावंद्य म्हणून मानल्या जाई. तत्सम समस्येवर कुठेही निर्णय देतांना, तो अधिकार म्हणून उपयोगात आणल्या जात असे.

त्याचं प्रतिष्ठाण नगरीपासून साडेचार कोशावर 'आपेगाव' नामक एक गांव आहे. त्यावेळी तिथं गोविंदपंत कुळकर्णी नावाचे एक गृहस्थ राहात असत. घरी समृद्धी, शेतीवाडी, गावचे कुळकर्ण्य, सरकार दरबारात पिढीजात मान-प्रतिष्ठा, सर्वच काही त्यांना अनुकूल होतं. फक्त एकच कमतरता त्यांना व त्यांच्या शालीन पत्नी सौ. "निराबाई" यांना जाणवत होती. त्यांना संतति नव्हती. ह्या एकाच उणिवेमुळे दोघही पतिपत्नी नेहमी उदास असत. साहजिकच त्यांची वृत्ती धार्मिक बनली होती. तसं पाहाता त्यांचं घराणच धार्मिक वृत्तीचं. त्यांचे आजोबा मच्छिद्रनाथाचे उपासक, तर वडील सत्गुरु गोरखनाथांची आराधना करीत असत. स्वत: गोविंदपंत सद्गुरु गहिनीनाथाची उपासना करीत होते. पतिपत्नी दोघही गुरूदेवांना आळवितच, त्या कृपाळू परमेश्वरावर श्रद्धा ठेऊन अपत्यहीन स्थितीतच, आपली संसार यात्रा पार करत होते. मनात पुत्रप्राप्तीची इच्छा ठेऊनच, रोज उगवत्या सूर्याला हात जोडीत होते आणि मावळत्या सूर्य-नारायणाची करुणा भाकत होते. आणि एक दिवस भर दुपारी बारा वाजता

मध्यान्ह समयी त्यांच्या दारावर बुलंद आवाज घुमला. "जय अलख निरंजन, जय सद्‌गुरुदेव दत्त ऽऽ." आवाज ऐकून दोघाही पतिपत्नीने दाराकडे पाहिलं. दारात एक तेजःपुंज योगी उभे होते. पतिपत्नी दोघही दाराकडे आलेत. परमपवित्र सद्‌गुरु गहिनीनाथांना पाहून दोघांनीही मोठ्या भक्तिभावानं त्यांच्या पायावर लोटांगण घातलं, आणि चरणी विलीन झाले. सद्‌गुरुंनी प्रसन्न होऊन मुक्त कठानं आशिर्वाद दिला. "पुत्रवती भव."

त्या दिवसापासून घरात एक दिव्य ज्योत उजळली. तिचा प्रकाश पसरण्याला सुरवात झाली. एका शुभदिनी सौ. निराबाई प्रसूत झाल्या. गोविंदपंतांना पुत्ररत्न प्राप्त झालं. पुत्रप्राप्तिनिमित्त गोविंदपंताघरी मोठा आनंदोत्सव साजरा झाला. मोठ्या भक्तिभावानं त्यांनी मुलाचं नांव 'विठ्ठल' असं ठेवलं.

दिवस आनंदात आणि बाळाच्या कोडकौतुकात निघून गेलेत. विठ्ठल वाढता वाढता मोठा झाला. विद्या शिकला. मोठा ज्ञानी झाला. लोक मग त्याला "विठ्ठलपंत" अशा सन्मानदर्शक दुहेरी नावानं संबोधू लागले.

बाळपणापासूनच त्यांचं सारं लक्ष भक्तिमार्गाकडे. विद्यार्जनाची अवीट गोडी पण प्रतिष्ठाणचे विद्यादाते त्यांना थिटे वाटू लागले. भक्तिमार्गातून योगसाधनेच्या बळावर ह्या चलाचल विश्वाच्या मुळाची खोज करावी आणि दुःखाचं मूळच जगतातून निर्मुलन करून ठेवाव, इतकी गाढ अफाट व्यासंगी इच्छा व महत्वाकांक्षा. त्यांना संसारिक जीवनात मुळीच गोडी वाटेना. दैनंदिन वागण्यात, बोलण्यात, संसारी जीवनाविषयी त्यांच्यामध्ये संपूर्ण विरक्तीच दिसत होती. नित्य एकच ध्यास. पवित्र क्षेत्रांची तीर्थयात्रा. आई वडिलांना नेहमी एकच मागणं. तीर्थाटनास परवानगी. त्यांना ह्या ध्यानापासून परावृत्त करण्याचे आईवडीलांचे सारे प्रयत्न व्यर्थ गेले. शेवटी एक दिवस उदास आणि अतिशय दुःखी होतच ते म्हणाले, "जा बाळ जा. तुझी इच्छा पुरी करून घे. पण लवकर परत ये. आम्ही दोघही डोळ्यात प्राण ठेऊन, घरी तुझी वाट पहात आहोत, एवढं मात्र लक्षात असू दे, बरं बाळ !"

आई वडिलांना नमस्कार केला, त्यांचे शुभाशिर्वाद घेतले आणि अंगावरील वस्त्राशिवाय काहीही न घेता, एक दिवस विठ्ठलपंत घरून निघाले एखाद्या योग्यासारखे व तीर्थ क्षेत्रांची वाट चालू लागले. आई बाप दोघही डोळ्यांत आंसू आणून, मुलाची पाठमोरी आकृति पहात होते आणि त्याला सुखरूप ठेऊन परत घरी आणण्यासाठी, त्या दयाघन ईश्वराची करूणा भाकत होते. मनांत विचारांचंऽ काहूर माजलं होत त्यांच्या त्या क्षणी.

आईबाप– **बाळ हा तीर्थाटणी चालला ॥धृ॥**

अगणित केले देवा नवसऽ ।
दोन जिवांची मांडुन आरस ।
गहिनीगुरुवर कृपे पारस ।
कुलदीपक जन्मला ॥१॥

केले आम्ही यत्ना किति तरी ।
सांगितले त्या मृदु शब्दांतरी ।
आणि सुचविले कर्तव्या जरी ।
निग्रह ना ढळला ॥२॥

भविष्य स्वप्नें काय पाहिली ।
सुंदर शालिन सून छबीली ।
येत आमुच्या दारी नटली ।
सहचारिणी त्याला ॥३॥

सन्मानाचा हा अधिकारी ।
बसला राज्य नृप दरबारी ।
अंगी भूषण वस्त्रे भरजरी ।
लोकपाल गमला ॥४॥

स्वप्ने ही कधी होतिल पुरती ।
हा तर जाइ यात्रेवरती ।
येइल केव्हां परत मागुती ।
सांकडऽ देवा तुला । ५॥

निवेदक– वाट चालला बाळ लाडका घराकडे पाठऽ ॥
तात माय ते बघती पुसुनी नयनांचे काठऽ ॥
साद घालती म्हणुनी त्याते सुखामाजी ठेवा ॥
हीच प्रार्थना तुम्हा आमुची कृपावंत देवा ॥१॥

□ □ ◘

विठ्ठलपंत घरून निघाले आणि उत्तर देशातील तीर्थांना जाणाऱ्या वाटला लागले. रस्त्यात एक एक स्थान पहाव, पवित्र नदीमध्ये स्नान कराव, देवदर्शन घ्याव, भीक्षा मागुन उदरनिर्वाह करावा, पोथी पुराण पठण कराव आणि आनंदान निसर्ग सौंदर्य अवलोकन करीत हिंडाव असा त्यांचा कार्यक्रम अविरत चालू होता.

निवेदक– **मदनापरी ती कांति गोमटी। मुखि झळकी तेजऽ।**
**तीर्थाटण तो करित चालला। पहा योगिराज ॥धृ॥**

शीलवंत तो कुलीन भासे। त्रिनयाची मूर्ती।
राग लोभ ना माया मोही। उदासीन वृत्ती॥
निसर्ग सुंदर देखत जावे। पुढती तृप्तीने।
भगवंताचा अगाध महिमा। आनंदें गाणे॥
नभ ते वरती पांघरूण। त्या भूमिची शेजऽ॥१॥

दीन जनांचे दुःख पाहुनी। होई त्या खेद।
एक प्रभुने जग हे रचले। असा काय भेद॥
विचलित होई मनी आपुल्या। उत्तर गवसेना।
लीला ऐसी जगदीशाची। त्याला उमजेना॥
मनांत निग्रह "करीन त्याही। मूळाची खोजऽ" ॥२॥

यज्ञ चालला भव्य मंडपी। मंत्रोच्चारी अर्पिती।
ज्ञानी ब्राम्हण, आहुति कुंडा। साध्य मोक्ष प्राप्ती॥
जाता भक्तीने त्या दिसली। मंडप दारी तऱ्हा अशी।
द्रवले तन्मन बघुनी म्हणतो। क्रौर्य असे हे धर्माशी॥
कर्मे असल्या, लोक साधती। काय पुण्य काज ? ॥३॥

शांत चालले ब्राम्हण भोजन। अन्न रास पात्री।
उन्हांत गिरिजन दारि उपाशी। उभे जीर्ण गात्री॥
भार शिरावर त्यांच्या होता। यज्ञ समीधांचा।
काय न्याय हा ? जगांत नाही। वाली दीनांचा॥
वधवेदिवर, बलिदानाते। उभे पशू मूक।
काय जाणती जीव बिचारे। मृत्यु जवळी क्षण एक॥
क्रूर दंभ हा म्हणे जयाला। धर्म कर्म साज ॥४॥

असा चालला हिंडत तीर्थे । आला भीमेच्या काठी ।
भावे दर्शन घेण्या येई । गुरु दत्ताचे पुण्य मठी ।।
नाशिक त्र्यंबक ब्रम्हगिरीचे । घेऊनी पुढती मार्गाने ।
आळंदीला येउन रमला । जसे योजिले दैवाने ।।
इंद्रायणिची पवित्र जडली । योगी पुत्राते माया ।
भविष्य उदरी इथेच ठरली । घडणे ईश किमया ।।
संध्या स्नानें हरिगुण गाता । प्रभात जाई ती सांज ।
श्री सिद्धेश्वर राउळि वसला । भक्त योगिराज ।।५।।

□ □ □

प्रयाग, काशी, गोकुळ, वृंदावन, द्वारका, सोमनाथ, नाशिक, त्र्यंबकेश्वर, ब्रह्मगिरी, भीमाशंकर, आदि तीर्थक्षेत्रे अशाप्रकारे हिंडत हिंडत, तो योगिराज शेवटी, आपल्याच जन्मस्थळाजवळील, पवित्र अशा इंद्रायणिकाठी आळंदीला येऊन पोहोचला. आळंदीचा परिसर विठ्ठलपंताना खूप आवडला. शांत वहाणारी इंद्रायणी, तिच्या काठावर ब्रह्मवृंदांच चालत असलेलं ब्रह्मकर्म, श्री सिद्धेश्वर मंदिराचा परिसर, आजूबाजूचं निसर्ग सौंदर्य, वातावरणाची शुद्धता, मंदिरात अखंड तेवत राहाणारा नंदादीप, देवळात सकाळ संध्याकाळ होणारी शीवआवर्तनऽ आणि घंटानाद, आजूबाजूची रमणीय वनश्री, वृक्षराजी आणि त्यात पक्षीगणांचं चालणारं कर्णमधूर गुंजन, ह्या सर्वांनी त्यांच्या भाविक आणि अभ्यासू मनावर मोहिनी घातली. ते सिद्धेश्वर राउळातच स्थिर झाले. प्रातःकाळी उठाव, वेदपुराण पठण करावं, गावामध्यें जाउन कोरान्न भिक्षा मागून आणावी, राउळातच अन्नब्रह्म शिजवाव आणि ग्रहण करावं. पुन्हा वेदपुराण पठन करून दिवस काढावा, सायंकाळी स्नान, सायंसंध्या करावी व पुन्हा वेदपुराण पठण करून, रात्री राउळातच एका भगव्या वस्त्रावर झोपावं असा त्यांचा कार्यक्रम चालू होता. आणि एक दिवस;

निवेदक– "गांठ ही योगाने पडली" ॥ धृ ॥

स्वर्ग देवतांनी घडवीली ।
सिद्धोपंता कन्या लाभली ।
ज्यासाठी ती असे योजिली ।
श्रीरामास्तव जशी मैथिली ॥१॥


रुक्मिणि सुंदर मुखी शीलता ।
पित्यास ऐसी एकच दुहिता ।
उपवर झाली, सुखात असता ।
अवचित अवतरली ॥२॥

स्वर्ग देवता जणू भूवरी ।
इंद्रायणिच्या उतरे तीरी ।
करी पित्यासह घेत घागरी ।
जल भरण्या आली ॥३॥

घागर घेता भरुन जलाने ।
योगि पाहिला नदीत नयने ।
क्षणात फुलली दोनहि सुमने ।
माघारी झाली ॥४॥

पित्यास ऐश्या अबोल भेटी ।
दिसली पावन योग संगती ।
मनी योजिले घडणे पुढती ।
भाग्येजी लिहिली ॥५॥

मनी चिंतिती हा अपघात ।
यती मिळावा मज जामात ।
दुहिता माझी सदा सुखात ।
जर त्याने वरली ॥६॥



घागर घेता भरुन जलाने ।
योगि पाहिला नदीत नयने ॥

विठ्ठलपंत आणि रुक्मिणि यांची पहिली भेट या चक्रतीर्थावरच झाली होती.

मजसी नाही पुत्र संतती ।
रुक्मिणि दुहिता एकच ज्योती ।
स्विकारील का तिजसी हा यती ? ।
कळेना काय तिच्या भाली ॥७॥

कसे पुसावे ? न कळे मजसी ।
श्री सिद्धेशा विनति तुजसी ।
कृपावंत व्हा, त्रिभुवन वासी ।
इच्छा तुज वाहिली ॥८॥

□ □ □

विठ्ठलपंत आपले स्नान संध्यादि कर्मे आटोपून सिद्धेश्वर मंदिरा कडे चालू लागले. सिद्धोपंतही आपला नदीवरील कार्यक्षम आटोपून घराच्या वाटेला लागले. विठ्ठलपंताची प्रतिमा त्यांच्या नजरे समोर येत होती आणि त्यांच्यासहच, त्यांना त्यांची लाडकी रुक्मिणि दिसत होती. अशाच गोड तंद्रीत ते घरी गेले.

रात्री कसला तरी निश्चय करून ते सिद्धेश्वर मंदिरात गेले. देव दर्शन घेतल आणि राउळांत, जिथ यती विठ्ठलपंत बसले होते तिथ आले. मोठ्या भक्तिभावान त्यांनी यती विठ्ठलपंतांना नमस्कार केला. साहाजिकच यतींच्या तोंडून आशिर्वाद निघाला. " इष्टफल प्राप्तिरस्तु. " तात आज कस येण केल ?" सिद्धोपंतांच्या वयाचा विचार करून विठ्ठलपंतांनी त्यांना 'तात' अस संबोधितच विचारल. "सहजच आपल्या दर्शनाला." अस उत्तर देऊन, सिद्धोपंतांनी आपला पूर्ण परिचय यतींना दिला, विठ्ठलपंतांना विचारताच, त्यांनीही आपल नांव, गांव, आडनांव, गोत्र वगैरे सहित संपूर्ण माहिती स्वतःविषयी सांगितली. दोघानाही एकमेकाविषयी माहिती ऐकून धन्यता वाटली.

" विठ्ठलपंत उद्या दुपारी मध्यान्न ग्रहण करण्यासाठी आपण माझे घरी याव आणि आपल्यासह भोजनाचा लाभ मला देऊन, आपल्या पदाच्या पावन धुळीन, माझ घर उद्धाराव ही माझी आपणाला नम्र विनंति आहे. कृपा करून ती मान्य करावी व मला उपकृत कराव." सिद्धोपंत अतिशय आदराने बोलले.

" तात. आम्ही भटके तीर्थयात्री. तापसी. गृहस्थाश्रमी जनांच्या घरी जाण आणि अन्नब्रह्म ग्रहण करण आम्ही वर्ज्य केल आहे. तरी राग मानू नये." विठ्ठल-पंतांनी अतिशय नम्रपणे आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. ऐकून सिद्धोपंतांना एवढं वाईट वाटलं कीं, त्यांच्या नेत्रात अश्रुबिंदू आले व ते गालावरून ओघळू लागले. जरा स्वतःला सावरून ते यतीला म्हणाले, "आपण ज्ञानी आहात. सर्व जाणता. आपणच मला 'इष्टफल प्राप्तिरस्तु' असा आशिर्वाद दिला आहे आणि आपले चरण माझे घराला लागावे हीच इच्छा मनी आहे. आपण दिलेला आशिर्वाद पूर्ण करून मला पावन करावं. आपण सिद्धेश्वराची आराधना करता. माझ्या घरचं अन्नब्रह्म श्री सिद्धेश्वराचा प्रसादच समजावा."

विठ्ठलपंतांनी ऐकून क्षणभर विचार केला आणि मग हंसतच "तथास्तु" म्हटलं. सिद्धोपंत कृतार्थ झाल्यावत घराकडे चालू लागले.

दुसरे दिवशी सकाळपासूनच, सिद्धोपंताघरी यतीचे स्वागताची तयारी सुरू झाली. बरोबर बारा वाजता विठ्ठलपंताचं ते तेजस्वी ध्यान सिद्धोपंतांचे दारात येऊन उभं ठाकलं.

निवेदक– "गांठ हो योगाने पडली" ॥धृ॥

दारी बघता उभे यतीते ।
पत्नीचे सह सिद्धोपंते ।
जोडुनी अपुल्या दोन्ही कराते ।
स्वागतासी आली ॥१॥

बकुळ फुलांची माळ अंगणी ।
गुंफित रुक्मिणि बाला सगुणी ।
दारी दिसले, जणू दिनमणी ।
दृष्टी ती बोलली ॥२॥

गृहांत नेउनी बसविले यती ।
पद प्रक्षालुन त्याते पूजिती ।
कंठी माला कन्ये हाती ।
सन्माने टाकिली ॥३॥

आनंदे अती भोजन झाले ।
तृप्त होउनी यती भारले ।
निरोप अंती घेता उठले ।
जाण्या अपुल्या स्थळी ॥४॥

□ □ □

विठ्ठलपंत, त्या घरांत पाहिलेल्या धार्मिक, सोज्वळ आणि टापटिपीच्या वातावरणान मोहित झाले. ते सिद्धोपंतांचा निरोप घेऊन सिद्धेश्वर राउळात आले. रात्र झाली. विठ्ठलपंत आपले भजन पठणादि कार्यक्रम आटोपून नेहमी-प्रमाणे राउळात झोपले. तिकडे आपल्या घरी, सर्व कार्यक्रम संपल्यावर, सिद्धो-पंतही झोपी गेले. दोघही आपआपल्या स्थळी गाढ झोपेत होते. मध्यरात्र झाली. दोघांनाही एकाच वेळी स्वप्नें पडली. स्वप्नांची अंतिम अवस्था संपली. दोघही जागे झालेत. संभ्रमातच उठून बसलेत. अवचित अशीच स्वप्ने दोघांनाही पडली होती. विचार करतच बसलेत दोघही. त्यांची अवस्था मोठी विस्मयजनक झाली होती पडलेल्या स्वप्नांनी. त्याच मनस्थितीत दोघही असतांना कोंबडा आरवला. दोघही उठलेत आणि आपापल्या दिनचर्येला लागले.

दोघही इंद्रायणीवर स्नान संध्येला आलेत. मनातील गूढता त्यांच्या मुखावर दृग्गोचर होत होती. सिद्धोपंतांना वाटे की आपण आपल्याला पडलेल्या स्वप्नाची वाच्यता कशी करावी ? यतींची त्यावर काय प्रतिक्रिया होइल ? त्यांचा आपल्याविषयी गैरसमज तर होणार नाहीना ? विठ्ठलपंतांना वाटे की, आपणाला पडलेलं स्वप्न कसं सांगावं ? सिद्धोपंतांना आपल्याविषयी काय वाटेल ? एकाला, दुसऱ्याला पडलेल्या स्वप्नाची कल्पना नव्हती. शेवटी सिद्धोपंतानीच निर्णय घेतला आणि ते विठ्ठलपंतांना सांगू लागले.

सिद्धोपंत– **"ही कशी देवाची माया" ॥धृ॥**

स्वप्नी दिसले गेल्या रात्री ।
संकोचाने वच अडखळती ।
कसे सांगु मी पाहिली यती ।
रुक्मिणीसह काया ॥१॥

मजसी दिसली सजीव पुरती ।
देवघरातील विठ्ठल मूर्ति ।
झाली जागृत वीटेवरती ।
काय प्रभू, किमया ? ॥२॥

उतरित खाली, तो श्रीरंगऽ ।
सगुण सावळा पांडुरंगऽ ।
पाहुनी झालो खरेचि दंगऽ ।
जागृत विठुराया ॥३॥

उभे देव ते प्रसन्न वदने ।
पडली पाया दोन जोडिने ।
हांसत प्रेमे आशिर्वचने ।
दिधली, वर छाया ॥४॥

ईशे अंती दोघा धरले ।
शिरी तयांच्या हात ठेवले ।
मम कन्येसह तुम्हीच दिसले ।
ती तुमची जाया ॥५॥

समजुन घ्यावे योगी मजला ।
स्वार्थ मनी ना किंचित आला ।
तुम्हा अर्पितो रुक्मिणी बाला ।
स्वीकारा कृपया ॥६॥

卐 卐 卐

''विठ्ठलपंत हे असं दाखविलं मला स्वप्नात त्या दयानिधानानं. ईश्वरी संकेत असतील तसं होईल. आपण विचार करावा आणि मला पदरात घ्यावं". सिद्धोपंत अगदी भरल्या अंतःकरणात बोलले.

"तात तुम्ही मला वडिलांचे जागी आहात. पदरात घ्यावं असं म्हणून मला दुखवू नका, लाजवू नका. मलाही काल रात्री असच काही तरी दिसलं स्वप्नात. त्यामुळे असं वाटतं कीं, ईश्वरी इच्छाच अशी काही तरी आहे". विठ्ठलपंत एवढं बोलून, त्यांना पडलेलं स्वप्न सांगू लागले.

विठ्ठलपंत– "असें हें स्वप्न मला पडले". ॥धृ॥

असाच मजसी अनुभव आला ।
रुक्मिणिचा मी कर करि धरला ।
पतिपत्नीसम घालुनि माला ।
यापरी एक दुजा वरले ॥१॥

चालविलें तिज सप्तपदीला ।
हाती धरुनी तिच्या कराला ।
होम हवन विधी पुरा पाहिला ।
"यज्ञोमे कामः समृध्यताम्
श्रीयोमे कामः समृध्यताम्
धर्मोमे कामः समृध्यताम
प्रजामे कामः समृध्यताम्
यशोमे कामः समृध्यताम्
धर्मेच अर्थेच कामेच, नातिचरामि ।"
मी ब्रह्ममंत्र ऐकिले ॥२॥

मी भटका हा असा तापसी ।
संसाराची आस ना मजसी ।
प्रभुसेवा मज साध्य मानसी ।
परी हे विपरित दाखविले ॥३॥

स्वप्नी येऊनी त्या श्रीरंगे ।
शोभविले मज रुक्मिणीसंगे ।
सूचित केले ज्ञान विहंगे ।
आमुचे नाते हे जडले ॥४॥

प्रभुची इच्छा वंद्य मानुनी ।
तुम्ही करावी एका शुभ दिनी ।
योग्य तयारी मान्य जे जनी ।
माझे निग्रही मन झाले ॥५॥

卐 卐 卐

ह्या सर्व इच्छित ऋणानुबंधाची ही अशी गोडऽ सांगता झालेली पाहून सिद्धोपंतांना आनंद झाला. त्यांनी मोठ्या आत्मियतेनं विठ्ठलपंताचा हात आपल्या हातात धरला, व त्यांच्या घरीच वसतिला येऊन राहाण्याची विनंती केली. विठ्ठलपंतांनी ती आज्ञा समजूनच मानली. त्या दिवसापासून विठ्ठलपंत सिद्धोपंताच्या वाड्यातच राहू लागले. विठ्ठल रुक्मिणीसन्निध आला. श्री विष्णुभगवान लक्ष्मीसन्निध आले. ब्रह्म–रूपाजवळ आल. ईश्वरी संकेत सत्यसृष्टीत उतरू लागले.

सिद्धोपंतांनी सर्व काही आपल्या पत्नीला सांगितले. सौ. उमाबाईंना सर्व ऐकून धन्य झाल्यासारखं वाटलं योग्य असा कुलीन व विद्वान जावई लाभला होता. लग्नकार्य पहिल्याच शुभ मुहूर्तावर उरकून घ्यायचा त्यांनी निश्चय केला. घरी तयारीला सुरवात झाली. नातेवाईक आणि इष्टमित्र यांचेकडेस निमंत्रणे रवाना झाली. सिद्धोपंताचं घर आनंदान वहरून गेलं.

दुसरे दिवशी सकाळीच सिद्धोपंतांनी आपलं रेशमी पागोटऽ डोक्यावर चढवलं आणि ग्रामउपाध्यायाचे घरी आले. बैठकीत ग्राम उपाध्यायाचे सोबतच विसोबा चाटीही बसले होते. सिद्धोपंतानी दोघांनाही नमस्कार केला आणि आसनस्थ झाले.

"काय सिद्धोपंत कसं येणं केलं आज सकाळीच" ? ग्राम उपाध्यायनी विचारलं. "रुक्मिणीचं लग्न ठरविलं आहे. तरी जवळचा चांगला मुहूर्त काढून घ्यावा आपण." सिद्धोपंतांनी आपला येण्याचा उद्देश सांगितला. ग्राम उपाध्यायना नारायण नावाचा एक पुत्र होता. तो पण लग्नाचा होता. साहाजिकच सिद्धोपंतांनी वर म्हणून आपना नारायणच निश्चित केला असं समजून हंसतच ग्राम उपाध्याय म्हणाले, "अहो सिद्धोपंत अशी घाई का करता. माझा नारायण काही पळून जाणार नाही. तो तुमच्या कन्येसाठीच आहे. लग्न केव्हांही करता येईल." ग्राम उपाध्याय करीत असलेली चूक सिद्धोपंताच्या लक्षात आली. ते म्हणाले, "उपाध्याय बुवा वर निश्चित केला आहे मी. तो प्रश्न आता मिटला. आपण फक्त मुहूर्त काढून द्यावा." "कोण वर निश्चित केला आहे आपण ?" असं ग्राम उपाध्यायांनी विचारताच सिद्धोपंतांनी, "विठ्ठलपंत" असं सांगितलं. त्यांनी ते ऐकलच फक्त आणि एकदम लाल झाले आणि रागातच म्हणाले, "कोण तो सिद्धेश्वर मंदिरातला जोगडा ? भिकारी ! कुळ जात पात काही न पाहाताच तुम्ही त्याला जावई करणार ? काय अधर्म चालविला आहे तुम्ही ? आपल्या ब्राम्हणात असं कधी झालं आहे काय ? हे मला पसंत नाही." यावर सिद्धोपंत उत्तरले, "तुम्हाला पसंत नाही पण ईश्वराला तेच पसंत आहे." असं म्हणून त्यांनी दोघांनाही पडलेल्या स्वप्नांची हकीकत सविस्तरपणे सांगितली, आणि बोलले

"ईश्वरी संकेत झाला, त्याला मान दिलाच पाहिजे. ईश्वरी इच्छा पूर्ण व्हायलाच हवी. आपण मुहूर्त काढून मला उपकृत करावं."

"नाही त्रिवार नाही. मी या अशा अधर्माचरणात तुम्हाला सहयोग देणार नाही. माझा या लग्नाला विरोध आहे. मी पंचक्रोशीचा उपाध्याय आहे. साऱ्या लोकांना सांगीन व तुमच्या विरुद्ध उभे करीन. तुम्हाला कुणीच मदत करणार नाही. जो करील त्याला आम्ही बहिष्कृत करू. पाहतोच मी, कसे हे लग्न होते ते. "काय खरं आहे ना माझं म्हणणं विसोबा ? हा अधर्म आहे की नाही ?" असं विसोबाचाटी यांना ग्राम उपाध्याय यांनी विचारताच विसोबानं मान डोलावली आणि म्हणाले, "होय होय हा महान अधर्म आहे." ग्राम उपाध्याय अती क्रोधानं विसोबांना सांगू लागले.

ग्राम उपाध्याय– जोगड्यास कन्या हा मूढ अर्पितो ।
लग्न कसे होते ते मीच पाहतो ॥धृ॥

उच्च असू ब्रह्मवृंद ।
आम्हा ना दोषगंध ।
तोडुनी रुढीस अंध ।
काय योजितो ॥१॥

काय असे वेड यास ।
कन्या दे याचकास ।
मान प्रभू इच्छेस ।
देइ सांगतो ॥२॥

नाहि असे कधि घडले ।
भटक्यासीं दान दिले ।
कन्येचे कुणि असले ।
हाहि जाणतो ॥३॥

कृत्या ह्या ब्रह्मधर्म ।
मानिलची निंद्यकर्म ।
ज्ञातीवर एक मर्म ।
स्वये ठेवतो ॥४॥

ऐसे हे लग्न गौण ।
क्रोधाचे मम कारण ।
नाहि दुजे सत्य जाण ।
जे मी बोलतो ॥५॥

तुम्ही मज द्यावी साथ ।
मानुन मज ज्ञाति नाथ ।
करण्याते ह्या अनाथ ।
गांव उठवितो ॥६॥

याचे विण नाहि गती ।
धर्म बोल ही नीती ।
जागेवर मूढ मती ।
याची आणतो ॥७॥

धर्माचे करू तारण ।
भ्रष्टांचे दंभ हरण ।
अविचारी हा कृपण ।
जगा दावितो ॥८॥

卐 卐 卐

एकीकडे सिद्धोपंताघरी लग्नाची तयारी सुरू झाली तर दुसरीकडे ग्राम उपाध्याय व विसोबा चाटी दोघं मिळून सर्व परिसरांत पायपीट करून हिंडत होते आणि ह्या लग्नाविरुद्ध जनमत तयार करत होते. सिद्धोपंताविरुद्ध उघडलेली आघाडी मजबूत करत होते. हे लग्न होऊ नये म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा करत होते. सिद्धोपंत, सौ. उमाबाई, विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांची ईश्वरावर श्रद्धा होती व त्या श्रद्धेवरच त्यांना सर्व काही ठीक होईल अशी खात्री होती. तिथी जवळ येत चालली तसा विरोधी गटाचा पवित्राही तीव्र होत चालला होता. सर्व शुभ व्हावं म्हणून सौ. उमाबाई विघ्नहर्त्या गणपतीची आराधना करीत होत्या. अचानक लोकपाल गावाला भेट द्यायला येणार म्हणून बातमी आली आणि मग सर्वच, लोकपाल स्वागताची तयारी करण्यात गढले. ठराविक दिवशी पालखीत बसून लोकपाल आले. सर्व गांवकऱ्यांनी वेशीवर जाऊन शींग–तुताऱ्यांच्या निनादात त्यांच स्वागत केल. श्री सिद्धेश्वर दर्शनाचा कार्यक्रम झाला आणि मग मिरवणूकीनच लोकपाल गांवात आले. सिद्धोपंत गांवचे कुळकर्णी म्हणून साहाजिकच त्यांनी लोकपालांना आपल्या घरी आणलं. त्यांना बैठकीत त्यांच्या सन्मानाला साजेशा आसनावर बसवून दुग्धोपहार दिला आणि सिद्धोपंतांनी चांदीच्या वाटीत अक्षता आणून लोकपालांचे हातावर ठेवीत "उदईक कन्येच लग्न आहे, आपण स्वये हजर राहून कन्येस आशिर्वाद द्यावा" अशी विनंती केली. "अवश्य राहीन. आपल्याच कन्येचं लग्न आहे. आणि आपण सुद्धा सर्व जनानी लग्नास हजर राहून, लागेल ती मदत द्यावी. सर्व उत्तम झाल पाहिजे," असा आदेश सर्व ग्रामस्थांना दिला. लोकपालांचीच आज्ञा ती. सर्वच वातावरण विरघळून गेलं आणि दुसरे दिवशीच।

निवेदक– **श्री सिद्धेश्वर साक्ष ठेउनी**
**विठ्ठले रुक्मिणीस वरले ।**
**राउळी शुभमंगल झाले ॥धृ॥**

विठ्ठल रुक्मिणी जोडा सुंदर ।
सिद्धोपंता पावे गिरीधर ।
सखे सोयरे म्हणति खरोखर ।
भाग्य ते चालत घरीऽ आले ॥१॥

मंगल घटिला मंगलाक्षता ।
उधळुन झाली लग्न सांगता ।
मंजुळ मंगल अष्टक सरता ।
वाद्ये-ध्वनि हो बोललेऽ ॥२॥

लोकपाल ही बसुन मंडपी ।
आणति शोभा जन सांगाती ।
पुष्प वृष्टिते, करता वरुनी ।
देवही मोदानेऽ न्हाले ॥३॥

घंटानादे भव्य देउळी ।
सनइ चौघडे सुरास उधळी ।
वरात अंती अशी आगळी ।
पाहुनी सिद्धेश्वरऽ डोले ॥४॥

लग्न सोहळा असा संपला ।
इष्ट मित्र ते निज धामाला ।
जाते झाले इच्छित कुशला ।
मागुती दैव योगऽ उरले ॥५॥

कुणा नसें तें ठावे होते ।
भविष्यकाळी भाग्य विधाते ।
काय योजिली मंगल गीतें ।
भारती पुण्य पर्वऽ आले ॥६॥

卐 卐 卐

लग्न सोहळा पार पडला. परळ पूजनही उरकल. सिद्धोपंतांनी आपल्या घरी मुलगी आणि जावई यांना जोड्यान बसवून श्री सत्यनारायणाची पूजाही त्यांचे हाती करवून घेतली. विवाहानिमित्त बाहेरगांवाहून आलेले नातेवाईक व पाहुणे मंडळी यांना योग्य ती मानाची बिदागी देऊन रवाना केल सर्व काही अत्यन्त आनंदात पार पडल. सिद्धोपंत आणि उमाबाई दोघही खुषीत होते. सारं वातावरण प्रसन्न होतं. ग्राम उपाध्याय व विसोबा चाटी यांच्या मनातील कटुताही मातीच्या ढेकळासारखी जाग्यावरच विरघळून गेली होती. भगवंतान सर्व मंगल करवून घेतल होतं. विठ्ठलपंत आणि लहानगी रुक्मिणी घरांत प्रेमळ, सोज्वळ आणि आनंदी अशा छायेत हांसत खेळत वागत होते. विठ्ठलपंताची नित्यकर्म, जसं इंद्रायणिस्नान, संध्या पूजा, वेदपुराण पठण इत्यादि सर्व व्यवस्थित चालू होतं. त्यांना ह्या सर्व कामात आता रुक्मिणी मदत करीत होती. सर्व तयारी करून देत होती. घरीच विठ्ठलपंतांनी ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद यांचे पारायण केले. गांवातील जनही ऐकण्यास येत. विठ्ठलपंतांच्या विद्वत्तेमुळे त्यांच साऱ्याच लोकांच्या तोंडून कौतुक होत होते.

एक दिवस आपले दैनंदिन कार्यक्रम आटोपून, रात्री विठ्ठलपंत झोपले. निद्राधीन अवस्थेत असतांनाच त्यांच्या तोंडावर दिव्य असा प्रकाशज्योत पडला. त्यांनी डोळे उघडले. प्रकाशज्योत हळूहळू सौम्य होत गेला आणि नंतर त्या जागी विठ्ठलपंतांनी पाहिलं की, एक वटुमूर्ती उभी आहे. अंगावर छाटी, हाती दंड घेऊन हांसत उभी आहे. विठ्ठलपंत उठून बसले आणि त्या मूर्तीला पाहू लागले. त्या बटुमूर्तित त्यांना तीर्थाटणाला घरून निघालेलं स्वतःचच रूप दिसल. विठ्ठलपंत आश्चर्याने डोळे भरून ते रूप पहात होते. मुखावर मंद हास्य फुलवित ते रूप विठ्ठलपंताशी बोलू लागलं :

बटूरूप– **गृहा सोडुनी जासि विठ्ठला पावन यात्रेला ।**
**संसाराचे मोहा धरुनी काय असा रमला ।।धृ।।**

सोडलि यात्रा अर्ध्यावरीती, मातपिता मागे ।
दु:खा गिळुनी आतुर बघती, वाट तुझी दोघे ।
तुझ्याच गेही देव जन्मणे संचित हे भुलला ।।१।।

यात्रेसी त्वा पुरी करावी, सोडुन मोहासऽ ।
मातपित्याच्या जावे नंतर पुण्य दर्शनासऽ ।
काळ ना असा व्यर्थ घालण्या जन्म तुझा झाला ।।२।।

ऊठ ऊठ रे यती विठ्ठला, उष:काल झाला ।
अवताराचा भूवरती या, समय असे आला ।
जे जे ठरले देवलोकिते, घडणे धरतीला ।।३।।

गुरुगहिनीचा प्रसाद ऐसा आला जन्मासी ।
ईश अंश जे जनक तयांचा होणेरे तुजसी ।
जागा हो बा पुन्हा सांगतो, आठव कर्माला ।।४।।

चार देव ते येतिल हांसत कुळात अवतारी ।
ब्रम्हा विष्णू महेश माया, तुझिया संसारी ।
अज्ञ जनांना ज्ञाना देतिल, दावित मार्गाला ।।५।।

卐 卐 卐

विठ्ठलपंतानी ऐकलं, बटुमूर्ती पुन्हा एकदा प्रकाशमय झाली. दिव्य तेजानं विठ्ठलपंतांची दृष्टी पुन्हा पळभर बंद झाली. डोळे उघडले. पाहातात तो मूर्ती अदृश्य झाली होती. प्रकाशही नव्हता तिथं. तेवढ्यात कोंबडा आरवला. विठ्ठलपंत उठले आणि आपल्या नित्य कार्यक्रमाकरता इंद्रायणीकडे चालू लागले भारल्या अवस्थेतच.

प्रातर्विधि उरकले. स्नान संध्या झाली. ते पावन इंद्रायणित उभे राहून पूर्व दिशेकडे पाहात उगवत्या सूर्यनारायणाला अर्घ्य देत होते आणि सूर्यनारायणाची आराधना करीत होते. कानावर आवाज येऊ लागला त्यांच्या "जय जय रामकृष्ण हरीऽऽ" सोबत टाळ मृदंग गरजत होते. आवाज जवळ जवळ येऊ लागला. "जय जय रामकृष्ण हरीऽऽ." आवाजाच्या दिशेकडे विठ्ठलपंत पाहू लागले. त्यांना दिसल की, मानवांचा एक थवा हातात कापाय पताका घेऊन टाळ, मृदंग, वीणा यांच्या तालात "जय जय रामकृष्ण हरी" गात येत आहे. दृष्य पाहून विठ्ठलपंत माहित झाले. आवाज देत लोक गात होते, नाचत होते. वृद्ध होते, वृद्धा होत्या. तरूण होते. तरूण स्त्रिया होत्या. मुलं होते, मुली होत्या. सर्वांनी भालप्रदेशी गोपीचंदनाची मुद्रा धारण केली होती. विठ्ठलपंत भारले गेले आणि तशा भारलेल्या अवस्थेतच त्यांना सामोरे गेले. पूर्ण दिंडीलाच त्यांनी मोठ्या भावानं साष्टांग नमस्कार केला आणि हातात वीणा धरून सर्वापुढं चालणाऱ्या एका वृद्धाला त्यांनी विचारल "बाबा आपण कोण आहात आणि हे असे कुठं जाता आपण सर्व ?"

"जय जय रामकृष्ण हरीऽऽ" अशी एक दीर्घ ललकारी देतच त्या भक्तानं सुरुवात केली सांगायला :

दिंडीतील भक्त— **विठ्ठलाचे दास आम्ही पंढरीस जातो ।।धृ।।**

दया सिंधू पांडुरंग उभा विटेवरी ।
पुंडलिकाकडे पाही चंद्रभागे तीरी ।
सावळि ती कांति कर दोन्ही कटेवरी ।
उभा सदा, वाट जणू, आमुची पाहतो ।।१।।

विठू आम्हा माय बाप बंधू सखा तोची ।
चिंता दीन लेकरांची वाहतो सदाची ।
मनी दया ठेउनिया पाखर मायेची ।
कृपाछत्र आम्हावरी, धरुनी उभा तो ।।२।।

चौऱ्यांशीचा फेरा टळे नाम घेता वाचे ।
अमृताचा घोट पिण्या क्षण हे मोलाचे ।
भक्ती करी भावे होई मोक्षपद त्याचे ।
ब्रह्मरूप होण्या आम्हा, मार्गासि दावितो ।।३।।

पंढरीची वारी आम्हा आनंदाचा क्षण ।
रामकृष्ण हरी नामे पापांचे हरण ।
नाम त्याचे नित्य घेता येई देवपण ।
पुण्यकर्म आम्हा हाती, करुनिया घेतो ।।४।।

चला देवा आम्हासंगे तुम्ही पंढरीला ।
संत संग असा होणे पुण्य लागे त्याला ।
देही दुःख माया मोह क्रोधादि सकला ।
गोड नांव घेता त्याचे, सर्व शांतवितो ।।५।।

卐 卐 卐

विठ्ठलपंतांनी मोठ्या तन्मयतेनं त्या भक्ताचं निवेदन ऐकलं. ऐकून भारावून गेलेत ते. तसेच परत घरी जाण्यास निघाले. अंगावरील ओलं वस्त्र बदलावयाचीही त्यांना आठवण राहिली नाही. घरी पोहोचले आणि तशाच अवस्थेत सिद्धोपंतासमोर उभे राहिले. त्यांना नमस्कार केला आणि सांगू लागले, "तात, मी आपणाला एक सत्कार्य करण्याची अनुमती मागतो. ती आपण मला द्यावी. काही विठ्ठलभक्त वारकरी पंढरपूरला जाण्यास निघाले आहेत. त्यांच्या सोबतच विठ्ठलदर्शनाला जावं अशी इच्छा मनी उपजली आहे. आपली काही हरकत नसली तर रुक्मिणीलाही घेऊन जातो सोबत. तिलाही देवदर्शन घडेल."

"अहो फारच छान विचार आहे. चला मीही सौभाग्यवतीसह आपणाबरोबर येतो. आम्हालाही श्री पांडुरंग दर्शन लाभ मिळेल". सिद्धोपंतांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. ऐकून विठ्ठलपंतांना अतिशय आनंद झाला.

सर्वत्र तयारी झाली. निघण्याचा समय आला. घरातील देव, श्री सिद्धेश्वर, कृष्णस्वामींची समाधी यांचं दर्शन घेऊन ते चारही जण वारीसोबतच पंढरपुरी जाण्यास निघाले. त्यांची यात्रा सुरू झाली. पुढं पुढं जात होते ते. भाविक योगीराज विठ्ठलपंताच्या तीर्थाटणाचं दुसरं पर्व होत ते :

निवेदक– **तीर्थाटण तो करित चालला पहा योगिराज ।।धृ।।**

स्नाने केली दृष्य संगमी मुळा मुठेच्या भक्तीने ।
'कऱ्हा' जलाने अंगे भिजली विधिलिखिताचे उक्तीने ।
'संगमेश्वरी' शिवराऊळी, रमले होता ती सांजऽ ।।१।।

'गडा पुरंदर' निरखित सुंदर, निसर्ग निर्मित सृष्टीला ।
हरिगुण गाता पुढे पुढे तो संत संग चालला ।
'वाल्मिकीचों' समाधि पाहुन प्रसन्न झाली द्वीनयने ।
पुढे येऊनी 'काळज'पुरि घे, श्री दत्त गुरू दर्शने ।
'फलटण' नगरी रात्र निघाली, दिसले नागेश्वर राजऽ ।।२।।

अद्‌भुत रंग आला 'बरडी', भोजन संतासह घेता ।
'माळशिरस'ला थकवा गेला, पडता चरणि हनुमंता ।
मोदे पाहुन 'वेळापुरि'ला अर्धे नारी नटराजऽ ।
वेशीवरती पंढरपुरच्या, उभेऽ योगिराजऽ ।।३।।

卐 卐 卐

विठ्ठल भक्तांचा तो अद्वितीय मेळावा हरिनामाच्या गजरात पंढरपूरच्या वेशीवर येऊन पोहोचला. राऊळाचा कळस दिसू लागला तसे सारे भक्तगण एका अवर्णनीय अशा आनंदाने न्हाऊन निघाले. साऱ्या प्रवासात विठ्ठलपंत तन्मय होऊन मुखानं हरीनामाचा उच्चार करीत होते. जिथं एखादा नास्तिकही नतमस्तक व्हावा असा अद्‌भुत सोहळा पाहून, तिथं विठ्ठलपंतासारखा भाविक माणूस, विठ्ठलनामात दंग व्हावा यात नवल असं नव्हतच. ते पांडुरंग नामी एकरूप झाले. सर्व भाविक दिंडी गांवात आली.

दुसरे दिवशी आषाढी एकादशी. विठ्ठलभक्तांचा पर्वणीचा दिवस. अगदी पहाटेला च सर्वजण उठले. त्यांनी पतीतपावन अशा चंद्रभागेत स्नान केलं आणि विठ्ठलमंदिराच्या राऊळांत येऊन उभे राहिले. तिथे जिकडे तिकडे नंदादीप तेवत होते. त्या प्रकाशात प्रभातसमयी, कटेवर हात ठेऊन उभ असलेलं ते देवाचं सगुण रूप, प्रत्येक भक्ताला मोहित करून टाकीत होतं. देवाचे नेत्रात भक्ताबाबत अपार करुणा दृग्गोचर होत होती. विठ्ठलपंत अगदी तल्लीन होऊन हात जोडीत एकसारखे पांडुरंगाचे नयनांत दृष्टी लावून उभे होते. खोलवर स्थिर चित्तानऽ देवाचं ध्यान पहात होते. देवाला आळवीत होते. त्याच स्थितीत त्यांची प्रतिभा एकाएकी जागृत झाली. ते आपल्या रसाळ अशा आवाजात त्या दयाघन पंढरीनाथाला आळवून जागवू लागले :

विठ्ठलपंत– **ऊठ विठ्ठला रे घननीळा, जग सारे उठले ॥**
**दीन वत्सला तुझ्या गुणाते, गात पहा जमले ॥धृ॥**

सूर्यदेवही क्षितिजावरती, आले पूर्वेसऽ ।
धेनुवासरे पक्षीगणसह तुझिया भेटीसऽ ।
उठुनि झडकरी हे वनमाळी, पहा विश्व आपुले ॥१॥

भक्त तुझे बघ अनवाणीते करताती दारी ।
उभे होउनी स्तुतिचा गजर ऐक चक्रधारी ।
कृपावंत, दे दर्शन त्यांना, पदी तुझ्या नमले ॥२॥

नयन कृपाळू करिती पावन भक्ता ज्या पाही ।
स्नेह प्रीतिचा भाव त्यातुनी त्यांचेस्तव वाही ।
पदकमले तव पुण्य देत से, पडती ज्या हाती ।
पतीत पावन, ईश दयाघन, नाम तुझे सजले ॥३॥

वाटे पावन माझी काया तुझ्या दर्शनाने ।
आज जहाली मानव जन्मी पाहुन या नयने ।
जन्म मृत्युचा नकोचि फेरा, मज ह्या जन्मांती ।
लाग दे मज दान इच्छिले, मी आज पावले ॥४॥

卐 卐 卐

विठ्ठलपंत तन्मय होऊन विठ्ठलाला आपल्या रसाळ वाणीनं गाऊन आळवत होते. सिद्धोपंत, उमाबाई व स्वत: रुक्मिणी, त्यांची ती पांडुरंग चरणी झालेली तल्लीनता अवलोकन करीत होते. विठ्ठलपंतांच्या स्वयंभू प्रतिभेतून उमलणार भक्तिगान पुष्प, मोठ्या अभिमानान आणि भाविकतेनं आपल्या कर्णेंद्रियांत साठवत होते, त्याचा रस ग्रहण करत होते. विठ्ठलपंताचा 'मुखचंद्र' तेजस्वी झाला होता. प्रतिभासंपन्नतेचा प्रकाश, त्यांच्या चेहऱ्यावर ओसरत होता. त्यांची ती तंद्री संपली तेव्हा, आत्मज्ञान पावल्याची छटा त्यांच्या भव्य कपाळावर दिसत होती.

पंढरपूरचा सर्व कार्यक्रम संपला. आळंदीला परत निघण्याची तयारी होत असतांना विठ्ठलपंत आपल्या श्वसुराला म्हणाले, "तात, रुक्मिणी अजून लहान आहे. तिला घेऊन आपण आळंदीला परत जावं. मी माझी अपूर्ण राहिलेली दक्षिण तीर्थक्षेत्राची यात्रा पूर्ण करून परत येतो. मला अनुज्ञा असावी.".

एकून सिद्धोपंतांना एक क्षण वाटलं कीं, आपले जामात संसारातून विरक्त तर होत नाही ना ? पण सर्वच बाबींचा सारासार विचार करून, त्यांनी विठ्ठलपंतांना अनुज्ञा दिली. विठ्ठलपंत रामेश्वर मार्गाला लागले आणि सिद्धोपंत, उमाबाई व रुक्मिणी आळंदीला परत येण्यास निघाले.

सहा वर्षांचा काळ मध्ये गेला. रुक्मिणी आपल्या माहेरी राहून विठ्ठलपंतांची परत येण्याची वाट पहात होती. तो पर्यंत ती पूर्ण स्त्री झाली होती. आणि एक दिवस अकस्मात विठ्ठलपंतांचं पूर्ण पुरूष झालेलं ते सुंदर ध्यान दारावर येऊन उभं झालं. सिद्धोपंत, उमाबाई व रुक्मिणी यांना खूप आनंद झाला. रुक्मिणीला पाहाताच, विठ्ठलपंत तिच्या त्या पूर्ण स्त्री रुपाकडे आकर्षिले गेले. रुक्मिणीही पण निसर्गत:च त्यांच्या व्यक्तिमत्वात एकरूप झाली. दोघेही एकमेकाजवळ येऊन, संसारी जीवनात पाऊल ठेवण्यास आतुर झाले.

सिद्धोपंतांनी रुक्मिणीचा गर्भाधान विधी उरकला. कार्तिक महिना होता. दीपोत्सवही त्यांनी आपल्या घरी मोठ्या थाटात, अद्वितीय असाच साजरा केला. सर्व आळंदीलाच भोजन दिलं. त्यांचा विद्वान असा लाडका जावई, घरी परत आला होता.

आळंदीला श्वसुरगृही संसारी जीवनात मग्न असतांनाच एक दिवस विठ्ठलपंत आपल्या श्वसुरासमोर उभे राहून म्हणाले, "तात, मातापित्याची आठवण येते. रुक्मिणीला घेऊन घरी आपेगावला जावं आणि वृद्धावस्थेत असलेल्या माता-

पित्याची थोडी सेवा करावी अशी इच्छा मनी आली आहे, तरी कृपा करून मला अनुज्ञा द्यावी."

ऐकून सिद्धोपंतांनी थोडा विचार केला आणि त्यांना 'होय' म्हणून "आम्हीही दोघं पोहचविण्यास येऊ" असं सुचविलं. हा प्रस्ताव ऐकून विठ्ठलपंतांना खूपच आनंद झाला. आपेगांवला बैलगाडीतून जाणं ठरलं. निघण्याचा दिवस नक्की झाला. जाण्याची सर्व तयारी झाली आणि ठराविक वेळी जाण्याकरता दारांत बैलगाडी उभी झाली. सर्वांनी श्री सिद्धेश्वर दर्शन घेतल. रुक्मिणी, इंद्रायणीच दर्शन होताच धावत गेली आणि दोन्ही पाय बुडवून पात्रात उभी झाली. दोन्ही हात जोडले आणि मोठ्या भावयुक्त अंतःकरणानं ती माता इंद्रायणीला आळवू लागली :

रुक्मिणी– इंद्रायणि माते मम भाग्य उजळले ।
सासरि मी दुहिता बघ आज चालले ॥धृ॥

तात जणू कण्व मुनी ।
माय असे जगजननी ।
प्रेमे अति घरि त्यांनी ।
मजसि पाळले ॥१॥

शिकवीलें गृहकृत्य ।
वचनातें एक सत्य ।
गृहिणीतें काय पथ्य ।
हेहि दाविले ॥२॥

जन्म जरी तात घरी ।
वाढले तुझ्याच तिरी ।
तीर्थासम या नीरी ।
खूप खेळले ॥३॥

सोडुनिया जात आज ।
सासरला जो रिवाज ।
लेउन सौभाग्य साज ।
दैव पावले ॥४॥

नयनांना येइ नीर ।
जाताना आज दूर ।
स्त्री जन्मा हे जरूर ।
सार यातले ॥५॥

आशिर्वच देइ मला ।
सौख्य सदा सासरला ।
लाडकीच तव बाला ।
माागते भले ।।६।।

माते ह्या नयनांना ।
नीर तुझे लावतांना ।
पावन हो हेचि मना ।
आज वाटले ।।७।।

卐 卐 卐

आणि शेवटी रुक्मिणीन दोनही हातांची ओंजळ केली. त्या ओंजळीत इंद्रायणीचं पवित्र तीर्थ घेऊन ते डोळ्यांना लावलं आणि दोन थेंब तोंडात टाकले. मोठ्या भक्तिनं दोन्ही हात जोडून नमस्कार केला आणि बैलगाडीत येऊन बसली. गाडीवानानं गाडी चालू केली. बैलांच्या गळ्यातील घंटांच्या निनादात सर्वांचा प्रवास सुरू झाला.

मजल दरमजल करीत चाकण, खेड, नेवासे माग पडलं. रस्त्यात प्रवरा–गोदावरी संगमात सर्वांनी स्नान केलं व गाडी पैठणमार्गाला लागली. पुढं पुढं मंदिरासोबतच मशिदी पण दिसू लागल्या. मंदिरात होणाऱ्या घंटानाद, व मंत्रोच्चारा सोबतच, मशिदीतून "अल्लाहो अकबर" हा आवाजही पण ऐकू येत होता. विठ्ठलपंत मशिदीकडे पाहूनही आपले हात जोडत होते. देव शेवटी सर्वांचा एकच, विश्वनिर्मिता, अशी त्यांची मनोधारणा होती. प्रगल्भ विचारधारणेचच ते द्योतक होतं.

गाडी पैठणला आली. गोदावरीमातेच्या पवित्र जलात सर्वांनी स्नानऽ केलीत आणि नंतर गाडी आपेगावकडे जाणाऱ्या रस्त्याला लागली. एक तपानंतर विठ्ठलपंत आपल्या जन्मगावी परत येत होते. जुन्या आठवणी उजळून आल्यात. ज्या मार्गानं ते रोज आपेगावाहून पैठणला विद्यापाठ शिकण्याकरता ये जा करीत, ती वाट पायीच चालण्याचा त्यांनी निश्चय केला. जन्मभूमिकडे त्यांना नेणारी ती काटेरी वाट चालतांना, जणु काही पुष्पलता पत्राप्रमाणे मृदुल काही तरी अंथरलेल्या रस्त्यावरच आपण चालत आहोत असा सुखद भास होत होता. त्या तंद्रीतच ते आपेगावात शिरले आणि गाडी त्यांचे घराचे दारासमोर उभी झाली.

त्यावेळी घरात त्यांचे वडील गोविंदपंत नेहमीप्रमाणे मृत्युंजय मंत्राचा जप करीत होते. "ॐ त्र्यम्बकम् यजामहे सुगन्धि पुष्टिवर्धनम्." ज्या दिवशी त्यांचा विठ्ठल घर सोडून बारा वर्षापूर्वी तीर्थयात्रा करण्याकरिता निघून गेला, त्या दिवसापासून त्याच्या कुशलतेसाठी, हे मृत्युंजय मंत्रजप अनुष्ठाण, त्यांनी अविरत चालू ठेवल होतं.

बैलाच्या गळ्यातील घंटांच्या निनाद ऐकून गोविंद पंत आणि सौ. निराबाई दोघही दारात आले. त्यांचा लाडका विठ्ठल त्यांना बैलगाडीजवळ उभा असलेला दिसला. पाहून दोघांच्याही आनंदाला सीमाच राहिल्या नाहीत. एका तपानंतर त्यांचा विठ्ठल पूर्ण पुरुषोत्तमाचं दिव्य तेज मुखाकर घेऊन, परत आला होता. विठ्ठलपंतानी "तात" अशी मारलेली हाक आणि वडिलांनी "विठ्ठल" हा शब्दोच्चार, सिद्धोपंत, उमाबाई व रुक्मिणी यांनी ऐकला. पितापुत्र भेटीचं ते हृदय हालवून सोडणार दृष्य पाहून त्यांनाही गहिवरून आलं. शेजारी लोक ते दृष्य पाहून. त्याचं वर्णन असं करत होते :

आपेगावचे शेजारी

**"पुत्रासंगे अपूर्व मीलन, जननी जनकाचे ॥धृ॥**

तात म्हणूनी पुत्र धावला ।
पिता बोलती बाळ विठ्ठला ।
आलिंगत त्या हर्ष जाहला ।
दृश्य तें, ऐसे तृप्तीचें ॥१॥

राजा दशरथ श्रीरामासी ।
पार्थ लाडक्या अभिमन्यूसी ।
की, प्रभुराम कुशलवासी ।
भेटती, अंत वियोगाचें ॥२॥

सूर्य भेटण्या ये क्षितिजासी ।
प्रकाश देण्या भूमातेसी ।
वाटे मीलन हे धैर्यासी ।
जणु कीं, अगाध शक्तीचे ॥३॥

रामप्रभू ये सवे जानकी ।
दुष्यंतासह शकुंतला, की ।
विठ्ठल संगे रुक्मिणी नवखी ।
पारणे, फिटले नेत्रांचे ॥४॥

पुत्र पित्याची अशी आगळी ।
भेट पाहतां अमुच्या डोळी ।
आनंदाश्रू येता सगळी ।
कौतुक करिती भाग्याचे ॥५॥

अम्हा वाटली आज धन्यता ।
दोन कुळांची एकरूपता ।
पाहुन ऐसी प्रेमसंहिता ।
यापुढे, क्षण आनंदाचे ॥६॥

□ □ □

सर्व जण यथायोग्य षोडशोपचारानंतर गृहात गेले. विठ्ठलपंतांनी श्वसुर सिद्धोपंत आणि सासुबाई यांची ओळख आपल्या आईबापांना करून दिली. रुक्मिणीसारखी सुंदर, शालीन, सोज्वळ आणि घरंदाज सून पाहून दोघांनाही धन्यता वाटली.

गोविंदपंतांनी आपली विहीण आणि व्याही यांचे सन्मानार्थ मेजवान्या आयोजित केल्या. सर्वांचा एक आठवडा अगदी आनंदात गेला. दिवस कसे निघून गेलेत हे समजलेच नाही त्यांना. सिद्धोपंत व उमाबाई यांना गोविंदपंत आणि निराबाई ह्यांचेमध्यें आपल्या लाडक्या मुलीला मायबापच मिळाल्यासारखं समाधान वाटत होत. तर गोविंदपंत आणि निराबाई यांना सिद्धोपंत व उमाबाई ह्यामध्यें त्यांच्या विठ्ठलाला आईबापाचच प्रेम मिळालेलं दिसत होतं. दोनही कुटुंब ह्या नात्यानं एकरूप झाले होते.

अंती सिद्धोपंतानी आणि उमाबाईंनी परत आळंदीला जाण्याची तयारी केली. योग्य ती व्याही–विहीण भेट देऊन, गोविंदपंतानी त्यांचा सन्मान केला, आणि ते उभयता बैलगाडीत बसून आळंदी मार्गाला लागले. निरोप घेतेवेळी, सिद्धोपंस व उमाबाई यांना, आपल्या लाडक्या कन्येला सोडून जातांना गहिवरून आल. पण ही जनरीत होती. तिचा अव्हेर कुणीच करू शकत नव्हता. शुभचिंतन करून ते निघाले. वेशीपर्यंत गोविंदपंत आणि विठ्ठलपंत, दोघंही बैलगाडीसोबत, निरोप द्यायला आले होते.

विठ्ठलपंताच संसारिक जीवन सुरू झाल. सार घर सुख आणि समाधानान इतक भरून गेल होत की ते पाहून कुणाची दृष्ट लागावी. आणि झालही पण असच. सुखाचे क्षण यावेत आणि अशाच वेळी काही तरी अवचित असं घडून याव व दारुण दु:ख समोर उभ रहाव, असच झाल.

एकाएकी गावात ज्वराची साथ आली आणि लोक पटापट मरू लागले. त्या साथीची शिकार होऊ लागले. हानीला भयानकतेच स्वरूप आल. त्यातच भर म्हणून की काय, भयंकर असा दुष्काळ पडला. अन्नपाण्यावाचून जनांचे जीव पशूंचे हाल हाल होऊ लागले :

निवेदक– आनंदाच्या पर्वारंभीच कालचक्र फिरले ।
संसाराच्या उंबरठ्यावर दु:ख असे आले ।।ध्रु।।

ज्वर पीडेची साथ भयंकर ।
सर्व गावची होई शिकार ।
यमराजाची दृष्टी घरावर ।
मातृछत्र गेले ।।१।।

सहचारिणिचे जाणे अवचित ।
दु:खित वहु हो गोविंदपंत ।
त्याच दिनांती ज्वर त्या ग्रासित ।
प्राणासी त्यागले ।।२।।

पति पत्नीने दोघे मिळुनी ।
जगा सोडिले मागे ठेऊनी ।
पुत्र स्नुषेते एकही दिनी ।
छत्रहीन केले ।।३।।

अंत्यविधीते मायपित्याचा ।
पुत्रे केला सांग विधीचा ।
नाही समयी साथ कुणाचा ।
मनोधैर्य खचले ।।४।।

दुष्काळाचा त्यात भयानक ।
अनर्थ आला क्रूर अचानक ।
जना न उरला कोणी तारक ।
संकट कोसळले ।।५।।

पोटी नाही अन्न मानवा ।
गाय वासरे त्यागति जीवा ।
बघवेना तो मानवि धावा ।
दारुण जे घडले ।।६।।

कळली वार्ता सिद्धोपंता ।
संकटि माझी एकच दुहिता ।
घेऊन येतो सहजामाता ।
पत्नीला बोलले ॥७॥

कन्येच्या घरी पाय टाकता ।
त्यांना दिसली काळ क्रूरता ।
कन्या कृश त्या प्रिय जामाता ।
पाहुनी गहिवरले ॥८॥

卐 卐 卐

आपली लाडकी कन्या आणि जामात अशा भयंकर हाल अपेष्टेत पाहून सिद्धोपंताना गहिवरून आलं. त्याच दिवशी दोघांनाही घेऊन ते आळंदीला येण्यास निघाले. अशा रीतिने विठ्ठलपंत आपल्या पत्नीसह श्वसुरगृही आळंदीस राहू लागले. आईबापाच अकस्मान झालेल निधन आणि दुष्काळामुळे झालेल्या हानीचा मानसिक धक्का, विठ्ठलपंत, सासू सासरे आणि पत्नी यांच्या प्रेमाचे वर्षावामुळे हळुहळू विसरू लागले. त्यांचे नित्य कार्यक्रम चालू होते. समय पुढे पुढे सरकत होता. पण अजून पुत्र प्राप्तीच लक्षण दिसेना. विठ्ठलपंत दिवसेंदिवस विरक्त होऊ लागले. संसारातून त्यांच मन उठल. एकाद्या संन्याश्याप्रमाणे ते राहू लागले आणि एका रात्री ते झोपेतून उठले आणि कुणालाही न सांगता, अंगावरील वस्त्रानिशी घराबाहेर पडले. त्यांचे पाय काशीक्षेत्राकडे वळले.

सकाळी उठताच ही गोष्ट सर्वांच्या ध्यानात आली. त्यांना मानसिक धक्काच बसला. पुष्कळ शोध केला सिद्धोपंतांनी. पण व्यर्थ. रुक्मिणीन त्याच दिवसापासून व्रत म्हणून सकाळ ते संध्यांकाळ, उपाशी राहून सुवर्ण पिंपळाला प्रदक्षिणा घालण सुरू केल. पुष्कळ दिवस गेलेत. अशीच ती एक दिवस सुवर्ण पिंपळाला प्रदक्षिणा घालीत होती एक महासिद्ध योगी समोर दिसले. रुक्मिणीन भक्तीभावानं त्यांच्या पायावर लोटांगण घातल, त्यांनी पाहिले सौभाग्य लेणे ल्यालेली सुहासिनी आहे. आशिर्वाद दिला, "पुत्रवती भव." आशिर्वाद ऐकून रुक्मिणी गहिवरली आणि नयनात अश्रू धरून सांगू लागली :

रुक्मिणी– पुत्रवतीभव शब्द ऐकूनी, रुक्मिणी त्या सांगे ।
यती घ्या आशिर्वचऽ मागे ।।धृ।।

सुहासिनी मी इथे एकले ।
पतिदेवे मम गृहा त्यागले ।
वाट तयांची पाहुन थकले ।
अघटित संयोगे ।।१।।

सदनी नाही ते पतिराज ।
पुत्रप्राप्ति मग कैसी हो मज ।
जीवन ऐसे जाणे हे निज ।
मरण बरें लागे ।।२।।

श्रीरामाविण कैसी सीता ।
विष्णूविण ना लक्ष्मी देवता ।
ह्यांच्याविण हें जीवन आता ।
व्यर्थची मन सांगे ।।३।।

भाग्याने ते मजसि लाभले ।
सोडून जाता ना सांगितले ।
नाही माझ्या ध्याना आले ।
का ? पीडा भोगे ।।४।।

विरक्ति एकच आस तयांची ।
इच्छा अगणित मोक्ष प्राप्तिची ।
मुळिना गोडी संसाराची ।
ना जुळले धागे ।।५।।

अशी अभागी दुहिता तुमची ।
निराश करते खंत मनाची ।
अता आस ही मज मरणाची ।
या शल्यासंगें ।।६।।

आशिर्वच हा परत घेऊनी ।
मुक्त करावे मजसि यातुनी ।
योजित एकच मन हे मानी ।
सत्यच स्त्री अंगे ।।७।।

□ □ □

**त्या** महान पतिव्रता सुहासिनीची अशी हृदयद्रावक कर्मकथा ऐकून ते महासिद्ध संभ्रमात पडले. त्यांनी विचारलं, "कुठं गेलेत आपले पती ?" "संसार त्याग करून संन्यास ग्रहण करते झालेत" रुक्मिणिन सद्‌गदीत होऊन सांगितल. "तुमच्या संमतिशिवाय त्यांना संन्यास दीक्षा कुणी दिली ?" महासिद्धांनी पुन्हा विचारल.

"श्रीक्षेत्र काशीचे महासिद्ध योगिराज श्रीपादस्वामी उर्फ रामानंद स्वामी यांनी," रुक्मिणिनं माहिती दिली. "आपल्या पतीचं नांव कळेल काय मला !" असे स्वामींनी विचारताच, "श्रीक्षेत्र पंढरपूरचा देव. त्यांचं जे नांव तेच आहे इकडच पण." रुक्मिणीनं जबाब दिला. "काय विठ्ठल ;" असं महासिद्धांनी विचारताच, रुक्मिणीच्या नयनावाटे अश्रुधारा वाहू लागल्या. आपलाच पट्टशिष्य "चैतन्य" हाच या बाईचा पती, हे त्यांना म्हणजेच रामानंद स्वामींना समजून आले.

"मुली, आता जा बाळ घरी. आजपासून बरोबर तीन महिन्यांनी तुझा पती परत घरी येऊन, पत्नी म्हणून तुझा स्विकार करील. आता शोक करू नकोस."

असे सांगून ते महासिद्ध सिद्ध बेटाकडे रवाना झाले. रुक्मिणीन सुवर्ण पिंपळाला प्रदक्षिणा करण्यास पुन्हा सुरवात केली.

महासिद्ध रामानंद स्वामी सिद्धबेटावर आपल्या मुक्कामी गेले आणि जाताक्षणीच अत्यंत गंभीरपणे आपल्या सोबत यात्रेला आलेल्या शिष्यगणांना सांगू लागले :

महासिद्ध **चला चला त्वरा करा परत जाऊ काशिला ।**
रामानंदस्वामी **तीर्थ क्षेत्र ना पुढे प्रायश्चित्त हे मला ।।धृ।।**

घोर अशी चूक एक घडली या जीवनी ।
मूढ त्या पतीस तिच्या मंत्र व्यर्थ देऊनी ।
आज भारलो पुरा व्यथा तिची ऐकुनी ।
"पुत्रवती भव' असा आशिर्वाद बोलुनी ।
कार्य अता एकच ते, घेतल्याविणा जला ।।१।।

प्राण तिचे निर्माल्यच सहज तिला वाटती ।
शीलवंत हो कशी पती विणा पुत्रवती ।
ज्ञान सर्व मज वाटे पावले मी, याप्रती ।
व्यर्थ हेच, भ्रष्ट अशी होइ जरी मन्मती ।
परत झणी येइल तो, वर तिजला मी दिला ।।२।।

भोगियले दु:ख अती धैर्यवंत दूहिता ।
कोण धीर देइ अशा भाग्यहीन जीविता ।
मायबाप जरि असले पतिछत्राविणा वृथा ।
मानते सुखी जगी पतीसवे पतींव्रता ।।३।।

पुसतो त्या चैतन्यास काय घोर हे असे ।
पाप स्वये करुन पतित मजसी का करीतसे ।
कृत्ये या तू केले जगि माझे का हंसे ।
पत्नि संमतीविणा संन्यासी हो कसे ! ।
मनास ना शांति अता, परत धाडु त्याजला ।।४।।

आश्रमास चालविण्या पट्टशिश्य योजिला ।
ज्ञानी तो एक तज्ञ प्रमुख असा नेमला ।
समजेना मज अजुनी का असत्य बोलला ।
आत्मघात करून मला काळिमाच लावला ।
संसारी परत हेच, एक कार्य विठ्ठला ॥५॥

चला उठा शिश्यगणा त्रस्त आज मानसी ।
जाणे हें मनि ठरले परत पुण्य काशिसी ।
भाग्यांती जर लिहिले रामेश्वर भेटिसी ।
जाउ पुढे नंतर, घडी पाहुनिया छानसी ।
पाप असे धुतल्याविण, अन्य कार्य ना मला ॥६॥

◻ ◻ ◻

ताबडतोब तयारी करून, त्या ठिकाणी जलही पोटात न घेतां, महासिद्ध रामानंदस्वामी आपल्या शिश्यगणासोबत परत काशिच्या मार्गाला लागले. विठ्ठलाला संन्यासदीक्षा देऊन आपल्या हातून एक मोठा प्रमाद घडला अशीच त्यांची मनोधारणा झाली होती आणि त्याबद्दल प्रायश्चित्त म्हणून त्यांनी रामेश्वर दर्शन यात्रा रद्द केली होती.

ते मजल दरमजल करीत काशिला पोहोचले आणि आश्रमाला भेट देऊन त्यांनी चैतन्य स्वामीला आपल्यासमोर बोलाविले. चैतन्यस्वामी आलेत आणि त्यांनी गुरुवर्यांना मोठ्या भक्तिभावान, समोर लोटांगण घालून नमस्कार केला, व नंतर हात जोडून पुढे उभे राहिले.

"काय विठ्ठलपंत ! आपण संन्यास दीक्षा घेताना, आपणाला पत्नी आहे आणि तिची अनुमती न घेताच आपण संन्यासाश्रम स्विकारण्याला आलात ही गोष्ट आम्हापासून लपवून ठेवली व संन्यास घेतला. हे तुम्ही अधर्माचरण केलत आणि ह्या तुमच्या अधर्माचरणात आपण मलाही भागीदार केलत. कां असं केल तुम्ही ?" रामानंद स्वामींनी गंभीर अशा मेघाप्रमाणे गडगडणाऱ्या आवाजात, 'चैतन्यस्वामी' अर्थात 'विठ्ठलपंत' यांना विचारल. ऐकून विठ्ठलपंत घाबरले, एकदम खजील झाले आणि सद्‌गुरूचरणांना एकदम मिठी मारूनच म्हणाले, "गुरुदेन आपण सर्वज्ञ आहात. मला क्षमा असावी. मी दीन, पतीत आपल्या चरणी लीन झालो आहे. आपणच तारा नाहीतर मारा, पण मला ह्या पायापासून दूर लोटू नका."

"विठ्ठलपंत ! आपल संन्यास ग्रहण करणं शास्त्राला धरून नाही. म्हणून आपण यज्ञोपवीत घालावं आणि घरी परत जाऊन पत्नीसोबत संसार करावा, अशी माझी तुम्हाला आज्ञा आहे. परमार्थ साधण्याकरता भगवी वस्त्र धारण करून संन्यास घेण्याचीच जरूरी नाही. जा तयारी करा. फेका ती सर्व भगवी वस्त्र गंगेत." रामानंद स्वामींनी आज्ञा दिली.

"पण गुरुदेव. एकदा संन्यास घेतल्यानंतर, पुन्हा ग्रहस्थाश्रम धर्माला मान्य होणार नांही." विठ्ठलपंतानी शंका काढली.

"विठ्ठलपंत. जगत्‌निर्मात्या परमेश्वरान मानवाकरता आणि इतर जीवजंतूकरता आवश्यक त्या गोष्टी, जशा हवा, पाणी, प्रकाश, उन, सूर्य, चंद्र, रात्र, दिवस, जेव्हा निर्माण केल्या तेव्हा मुहूर्त काही धर्मपंडिताकडून काढून घेतला नव्हता. धर्म काही ईश्वरान लिहून पाठविला नाही. धर्म तुम्ही आम्हीच लिहिला. धर्माप्रमाणे काही प्रायश्चित्त घेणे असेल ते घ्या. पण तुम्हाला माझी आज्ञा

पाळलीच पाहिजे. उदईक सकाळीच तुमचं आश्रमातून प्रयाण व्हायलाच हव." गुरुदेवांनी निक्षून सांगितल.

त्याप्रमाणे तयारी झाली आणि विठ्ठलपंत सुप्रभातीच आश्रम सोडून आळंदी मार्गाला लागले. सद्‌गुरूंनी आपल्या इतर शिश्यासहित जातीने हजर राहून, त्यांना मोठ्या प्रेमाने निरोप दिला, व सर्व शुभ चिंतिल त्यांच. मार्गात त्यांच्या मनात विचारांच काहूर माजल होत. समोर आपणासाठी कोणत्या समस्या येणार आहेत याविषयी ते कल्पना करत होते मनात :

विठ्ठलपंत– गुरुंनी परतुनिया धाडिले ।
दैवे काय असे योजिले ।।धृ।।

त्यागियलें मी संसारासी ।
विरक्ति येता मनात मजसी ।
झालो मोक्षास्तव संन्यासी ।
परी हें, अवचितची जाहले ।।१।।

संन्यासाची दीक्षा घेउनी ।
यज्ञोपविता दिधले फेकुनी ।
ज्ञानार्जनि मी मती लावुनी ।
सर्वची, बंधनास तोडिले ।।२।।

गुरु आज्ञेने परत चाललो ।
संसाराचे पथी लागलो ।
साध्यसंगरी असा हारलो ।
खेळ हे, दैवाचे चालले ।।३।।

कर्म असें हें धर्मविरुद्धऽ ।
मजला ठावे पूर्ण निशिद्धऽ ।
गुरुवचनांती मी तर बद्धऽ ।
कळेना, काय पुढें ठेविलें ।।४।।

ब्रह्मवृंद या कृत्यानिंदुनी ।
क्रोधे दंडिल बहु मार्गानी ।
अशुभ सर्वची येत मन्मनी ।
पुढचें, जेव्हां मी चिंतिले ।।५।।

विचार नाही दुसरा यावर ।
गृहास आता जाणें सत्वर ।
तारक एकच, सकला ईश्वर ।
होउ दे भाग्यी जे बांधिले ।।६।।

असं उलट सुलट विचार चक्र डोक्यात फिरत होत विठ्ठलपंतांच्या आणि ते मजल दरमजल करीत आळंदीकडे चालत होते. सदगुरुंनी दिलेली आज्ञा वंद्य समजून पुनश्च संसारात जाण्याचा, त्यांचा निश्चय पक्का झाला होता. आता त्यांना रुक्मिणीची ती सोज्वळ प्रतिमा मन:चक्षु समोर दिसत होती. त्यांच्या पायाला घरची, आळंदीची ओढ लागली होती.

वटपौर्णिमेचा दिवस होता. पतिव्रतेची तपश्चर्या यमराजालाही नमित करु शकते अशी त्या दिवसाची महती. त्याच दिवशी, रुक्मिणीनं धरलेल्या "सुवर्ण पिंपळाला एक लक्ष प्रदक्षिणा", व्रताची सांगता होती. तिनं सकाळीच उठून इंद्रायणीचं स्नान घेतल. घरी येऊन तुळशीची पूजा उरकली. वृंदावनासमोर सुंदरशी रांगोळी रेखाटली, शंभर पाकळ्या असलेल्या कमळ पुष्पाची. नंतर घरचं सर्व आवरून, ती सुवर्ण पिंपळाजवळ गेली. तिथं हरीपंतांनी यथासांग पूजा सांगितली आणि व्रताची पूर्णता केली. तेथून इतर सुहासिनींसोबत वटवृक्षाजवळ गेली आणि वटवृक्षाची पूजा करून, वटाभोवती सूत गुंडाळलं व आपल्या सौभाग्यरक्षणाकरिता आराधना केली. सर्व विधी संपताच घरी आली आणि तुळसीवृंदावनासमोर जप करीत बसली. महासिद्धांनी तिला वर दिला होता की तीन महिन्यांनी तुझा पती घरी परत येऊन पत्नी म्हणून स्विकार करील. हा दिवस शेवटचा होता. सूर्यास्तासोबतच तीन महिने पूर्ण होणार होते. ती तुळशी-वृंदावनासमोर ठेवलेल्या बाळकृष्णाची प्रार्थना करीत होती. त्या बाळकृष्णमूर्ती-मध्यें आपल्या पतीचं रूप सांठवून आळवत होती, त्यांना लवकर घरी परत येण्याला :

रुक्मिणी– परतुनी याहो माघारी ।
पाहते वाट अशी दारी ॥धृ॥

सोडुन जाता वर्षे लोटली ।
दैवगती ना अशी चिंतिली ।
विरह वेदने व्याकुळ झाली ।
एकचि आस उरी ॥१॥

व्रतोद्यापने केली अगणित ।
गृहा आपुले येणे वांछित ।
दाह जाहला मनास अविरत ।
जाळी अग्नीपरी ॥२॥

जगणे कैसे सुहासिनीचे ।
मिथ्या पतिविणऽ असे तयांचे ।
अनुभव ज्यांना कळे जयांचे ।
दैवी संसारी ॥३॥

देव तुम्ही मज मी तर दासी ।
सदा राहणे वंद्य पदासी ।
अहो तपस्वी, येउनि मजसी ।
न्यावे सहचारी ॥४॥

एक दुजाते बांधिली गांठ ।
शतऽजन्मीचा हा परीपाठ ।
तुम्हाविणा मज मरणचि श्रेष्ठ ।
वाटत अंधारी ॥५॥

आज व्रताची केली सांगता ।
सावित्रीसमऽ मी पतिव्रता ।
सत्यवान ते ज्यापरि येता ।
दिसले सामोरी ।।६।।

तसेच यावें आपण वेगें ।
नील नभातुन जशी विहंगे ।
घटीपात्रही बुडण्या लागे ।
रवि बिंब अंबरी ।।७।।

卐 卐 卐



परतुनी या हो माघारी ।
पाहते वाट अशी दारी ।।

विठ्ठलपंत गृह त्याग करून संन्यास घ्यायला गेलेत, त्या दिवसापासून या 'सुवर्ण पिंपळाला' सकाळपासून संध्याकाळपर्यंत, मुखांत जलही न घेता रुक्मिणीन प्रदक्षिणा घातल्या. आजही हा सुवर्ण पिंपळ त्या महान साध्वीच्या तपश्चर्येची कहाणी सांगत उभा आहे.

रुक्मिणीनं हात जोडले आणि डोळे मिटून ती देवाची प्रार्थना करु लागली. त्या तंद्रीत असतानाच तिच्या कानावर ते मधुर स्वरातले ओळखीचे शब्द पडले. "रुक्मिणी". तिने मोठ्या आशेनं आपले नेत्र उघडले आणि दाराकडे पाहाताच विठ्ठलपंताचं ते तेजस्वी रूप दिसलं तिला दारात उभं. दृष्टीला दृष्टी भिडली एक क्षणभरच पण एकमेकांना पाहून त्यांना काय आनंद झाला तेच जाणोत. अवर्णनीय अशाच आनंदाचा क्षण होता तो एक. रुक्मिणी उठली आणि तशीच लगबगीन घरात गेली आणि आईवडिलांना ती सुखद बातमी सांगितली.

संस्कृतिनुसार सर्व विधि करून झाल्यावर, विठ्ठलपंत श्वसुर गृहात आले. पुन्हा एकदा त्या घरात आनंद बहरू लागला. सिद्धोपंत आणि उमाबाई यांना एका महान काळजीतून मुक्त झाल्यावत वाटू लागलं. त्यांची लाडकी कन्या पुन्हा सौख्यात बहरू लागली होती. पण ईश्वरी संकेत काही निराळेच होते.

एकदा संन्यास धारण करून, पुन्हा ग्रहस्थाश्रमांत परत आलेल्या व हे अधर्माचरण करणाऱ्या आपल्या जावयाला स्वगृहांत घेऊन, कन्येसोबत संसार करू दिला, हे सिद्धोपंतानी अधर्माचरणच चालवलं हा दोष, आळंदीच्या धर्ममार्तंडांनी सिद्धोपंतावर ठेऊन, त्यांच्यावर बहिष्कार जाहीर करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सिद्धोपंताघरी कुणीही ब्राम्हणाने जाऊ नये व ब्रह्मकर्म करू नये असं सर्व ब्राह्मण ज्ञातीनं सिद्धोपंताना कळविलं. त्यामुळे सिद्धोपंताघरी त्यांच्या पित्याचं श्राद्धकर्म करण्यास कुणीही आलं नाही म्हणून पिंडदान न करताच, सर्व सामुग्री इंद्रायणी जलात विसर्जित करावी लागली. श्री सिद्धेश्वराचं देउळही त्यांना दर्शनाकरता बंद करण्यात आलं. सिद्धोपंत व स्वत: विठ्ठलपंतही मोठ्या काळजीत पडले. ब्रह्मवृंदांचा विरोध दिवसेंदिवस तीव्र होत चालला. यावर उपाय म्हणून, विठ्ठलपंतांनी पूर्ण विचारांती एक कठोर निर्णय घेतला. ते आपले श्वसूर सिद्धोपंत यांना सांगू लागले. "तात माझी आपणास एक विनंती आहे. कृपा करून अनुज्ञा द्यावी,

विठ्ठलपंत—

**बांधतो अता सिद्ध बेटी ।**
**आम्हाला वसण्या एक कुटी ।।धृ।।**

आलो संन्यासाला त्यागुनि ।
गुरुची आज्ञा वंद्य मानुनि ।
प्रायश्चित्तही यथा घेउनी ।
तरी ही उलटी दैवगती ।।१।।

ग्रामस्थांच्या क्रूर नीतिची ।
शिकार झालो ग्रामण्याची ।
तुमच्यावरती वृथा तयांची ।
व्हावी, का अशी वक्रदृष्टी ।।२।।

किती सांगतो ते न मानती ।
अधर्म कर्म हेच सांगती ।
याविण मजला मार्गच पुढती ।
ना सुचे, कठिण अशी ही घटी ।।३।।

ग्रामण्यासी मान्य करून ।
सिद्धबेटि मी कुटीत राहिन ।
भार्येसह प्रिय, असेच जीवन ।
इष्ट हे, जगणे ह्या संकटीं ।।४।।

ज्ञानिताप हा दाहक तुम्हा ।
होणे मजला मुळी रुचेना ।
वृद्धावस्था त्यात आपणा ।
आणि ब्रह्मवृंद वृत्ती थिटी ।।५।।

आपण दोघे इथे रहावे ।
जातिबांधवा सखे करावे ।
वियोग दुःखा विसरत जावे ।
आम्ही जवळी सरिता तटी ॥६॥

मजसी अनुज्ञा द्यावी आपण ।
निग्रह हा मम कठोर दारुण ।
तुम्हा न व्हावे दुर्धर जीवन ।
अकोपल्या ग्रामस्था संगती ॥७॥

□ □ □

तात , कृपा करून मला आशिर्वाद द्यावेत, ग्रामण्य असतांना मी आपल्या घरी राहाणं ह्या आपल्या अशा वृद्धावस्थेंत आपणाला तापदायक होईल. समाजात राहायचं म्हणजे समाजाच्या इच्छेला मान दिलाच पाहिजे. मी व रुक्मिणी आम्ही जवळच असू. चिंता नसावी. "ईश्वरी इच्छाच अशी दिसते". उदईक प्रात:काळीच आम्ही येथून निघू. "ऐकून सिद्धोपंत भारल्या अंत:करणानं म्हणाले, "तथास्तु".

- दुसरे दिवशी प्रात:समयीच विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांनी आईवडिलांना नमस्कार करून त्यांचे आशिर्वाद घेतले आणि आपलं सामान एका गाठोड्यात बांधलं. त्यात एक कुऱ्हाड मात्र घेतली. रुक्मिणीनं देवघरातला बाळकृष्ण सोबत घेतला आणि दोघांनीही घर सोडलं. सिद्धोपंत आणि उमाबाई यांनी गहिवरल्या अंत:करणानं त्यांना निरोप दिला.

वृद्धावस्थेत असतांना, ग्रामस्थाकडून टाकल्या गेलेल्या सामाजिक बहिष्काराची झळ त्यांना लागू नये म्हणून जावई व कन्या यांनी केलेला एक महान त्याग होता तो. विठ्ठलपंत व रुक्मिणी दोघही सिद्धवेटावर आलेत आणि त्यांनी वृक्षराजिच्या छायेतील एक सुंदरशी जागा पाहून तिथं राहाण्याला कुटी उभारण्यास सुरवात केली. विठ्ठलपंतांनी सोबत आणलेल्या कुऱ्हाडीच्या साहाय्याने, वृक्षाच्या फांद्या पत्र वगैरे तोडले आणि दुपारपर्यंत, त्यांची झोपडी तयार झाली. समोर सुंदर अंगण तयार केलं. ती त्यांची झोपडी म्हणजे, तीन वृक्षराजिच्या कुशीत स्थिरावलेला तो एखाद्या महाऋषीचा आश्रमच जणू वाटत होता. तेथील व्यवस्था आणि निसर्ग सौंदर्य पाहून एखाद्या राजप्रासादालाही त्याचा हेवा वाटावा असाच तो आश्रम होता.

निवेदक– **वृक्षराजिच्या शीतल छायी, कुटिर उभे दिव्यऽ ।**
**आश्रम भासे महाऋषीचा, जणू एकलव्य ।।धृ।।**

परिसर पुरता साफ करविला ।
आखणिनंतर खांब रोविला ।
मुहूर्त पूजा विधी उरकला ।
धर्माप्रती सव्य ।।१।।

वृक्ष डेळिचे स्तंभ रोविले ।
तृण त्यावरती घट्ट बांधिले ।
लता पत्रही पसरुन शिवलें ।
समजुनी संभाव्य ।।२।।

कुटि विभागली भिंत घालून ।
एक पाक गृह देवा आसन ।
पुढती बसण्या निद्रा पठणऽ ।
अशी योजना भव्य ।।३।।

पुढे अंगणी लाविली तुळस ।
वृंदावनि तो सुंदर कळसऽ ।
दीप ठेवण्या नियमित आरस ।
रांगोळीत काव्य ।।४।।

पारीजातक वृक्ष लाविला ।
शुद्ध भाव तो मनी ठेविला ।
बहरून पुष्पे येतिल त्याला ।
पवित्र समऽ गव्य ।।५।।

कुटी समोरच सिद्धेशाचे ।
मंदिर पावन इंद्रायणिचे ।
घरात बसता दर्शन त्यांचे ।
घडणे हे द्रव्य ।।६।।

पुनीत असल्या कुटीत वसती ।
विठ्ठल रुक्मिणी ईशा स्तवती ।
नाही अंतरी कधी कल्पिती ।
ते आत्मयज्ञ हव्य ।।७।।

ग्रामण्याते टाकुनि मानव ।
मानवावरी, झाले दानव ।
देवाजवळी ना परीभाव ।
करण्या कर्तव्य ।।८।।

□ ▣ □

आळंदीच्या धर्म मार्तंडांनी टाकलेल्या कठोर अशा बहिष्काराची शिकार झालेलं जोडपं, सिद्धबेटावर बांधलेल्या झोपडीत राहून, आपल्या संसारात मग्न झाल. विठ्ठलपंतानी पंचकोशीतील कोण्या गावी जाऊन कोरान्न भिक्षा मागुन आणावी. रुक्मिणीनं मोठ्या प्रेमानं अन्न ब्रह्म शिजवाव आणि दोघांनीही ग्रहण करावं. इंद्रायणिस्नान, पूजा, पठणादि नित्य कार्यक्रम आनंदात चालू होते त्यांचे. काही धर्ममार्तंडाच्या दाराशी विठ्ठलपंत भिक्षेला जात व "ओम् भवती भिक्षां देहि ओम् स्वस्ति" म्हणून साद घालीत, पण त्यांना शिव्या, शाप, कटुवचन, मानहानि या शिवाय काही मिळत नसे. पण इतर ज्ञातिजन मात्र त्यांची चौपदरी झोळी भरून देत. ज्ञातिबांधवांनी आपली कवाडे त्या विद्वान, शीलसंपन्न आणि स्थितप्रज्ञ ब्राह्मणाकरता बंद करून घेतली होती पण इतर ज्ञातिजनांनी माणुसकी सोडली नव्हती. ब्राह्मणांनी याचकास भिक्षा देणं हे धर्म-कर्तव्य त्यागलं होतं पण इतर ज्ञातीय मात्र त्या ब्राम्हणाची झोळी भरून देत व दान देण्याचं आपलं कर्तव्य बजावीत होते. ज्ञातिबांधवांनी आपला कोंबडा झांकून ठेवला म्हणून सूर्यनारायण काही उगवण्यासाठी वाट पहात बसले नाहीत. अन्य ज्ञातिजनांच्या दातृत्वाच्या प्रकाशात, विठ्ठल–रुक्मिणी संतुष्ट होते. रुक्मिणीला दिवस गेल्याची लक्षणऽ दिसू लागली. विठ्ठलपंत तिची खूप काळजी वाहू लागले. पावसाळ्याचे दिवस आले.

एक दिवस असेच विठ्ठलपंत भिक्षाटणाहून परत येत होते झोपडीकडे. हातात झोळी होती. पाऊसाची सर येत होती आणि इंद्रायणि दोनही थडया भरून वाहात होती. त्यांना दिसले की भर पावसात एक मानव देहधारी व्यक्ती नदीच्या काठावर उभी आहे. त्या व्यक्तीन एका घटकेत आपला देह नदीच्या पात्रात झोकून दिला. विठ्ठलपंतांनी पाहिल ते एकदम धावले आणि खांद्यावरील झोळी खाली फेकीतच त्यांनी नदीत उडी घेतली. पाणी कापीत ते मध्यभागी प्रवाहात गेले आणि प्रवाहाबरोबर वाहात जाणाऱ्या त्या देहाला त्यांनी धरलं. पाहातात तर तो तरुण, सुंदर, कोमल असा एक स्त्री देह होता। त्यांनी सांभाळून, मोठ्या कष्टानं तिला काठावर आणलं, आणि चांगलीशी जागा पाहून जमिनीवर निज-विल. ती स्त्री बेशुद्ध होती. प्रयत्न करून तिला शुद्धीवर आणल. तिन नेत्र उघडले. विठ्ठलपंताना पाहून ती गहिवरली आणि, "मला का वाचवलत आपण पंत ?" असं म्हणून ती आपली कर्मकहाणी सांगू लागली, "माझं नाव लक्ष्मी. मी गावकुंभाराची सून. आळंदीची. महादेव शास्त्र्यानं आज मला भ्रष्ट केलं. मी पतीत झालेहो पंत.

लक्ष्मी– "मी अशी पतित एक विधवा ।।धृ।।

अती दुर्दैवी स्नुषा गांवची ।
तमा अंतरी पति निधनाची ।
चाड ठेऊनी स्वजन रुढीची ।
होते कंठित दिन देवा ।।१।।

श्वसुरांनी मज आज धाडिले ।
परळा घेऊन अशी निघाले ।
शास्त्रिबुवांचे घरास गेले ।
प्रथा जी एक नित्य सेवा ।।२।।

पत्नी त्याची नव्हती घरांतऽ ।
पापी होता वाट पहातऽ ।
मजला बघुनी आला धांवत ।
ठेउनी, भ्रष्ट मनी कावा ।।३।।

मजसी धरिले कवटाळूनी ।
राक्षस जैसा दो हातांनी ।
नेले मंचकी मग उचलोनी ।
भ्रष्टिला देह पुण्य ठेवा ।।४।।

सोडुनि नंतर कामांधानें ।
हांसत म्हणुनी दुष्ट जिभेनें ।
येत जा अशी याच कारणें ।
सौख्य ते होइल तव जीवा ।।५।।

आक्रंदत मी आले येथे ।
लज्जित होऊनी त्या दुष्कृत्ये ।
भीती घडणे असे सदाते ।
कल्पना सहवेना भावा ।।६।।



वृक्षराजिच्या शीतल छायी कुटिर उभे दिव्य ऽ।
आश्रम भासे महाऋषीचा जणू एकलव्य।

हीच ती वृक्षराजी, ज्यांच्या शीतल छायेत, ग्रामस्थांनी बहिष्कृत केल्यानंतर, विठ्ठलपंतांनी आपली कुटी उभारली आणि ज्या कुटीत निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताई ह्यांचा जन्म झाला. आजही ही वृक्षराजी त्या पावन स्मृतिची जोपासना करीत सिद्ध बेटावर उभी आहे.

निग्रह केला मी मरणाचा ।
घेऊन आश्रय इंद्रायणिचा ।
मार्ग एकची सन्मानाचा ।
पुढती दिसला मम दैवा ।।७।।

आपण येऊन व्यर्थ जिवंत ।
काढुन मजला कशासऽपंत ।
दिधली दाहक मनासऽ खंत ।
कुणाचा, करू अता धावा ।।८।।

卐 卐 卐

लक्ष्मीन सांगितलेली ही चित्तथरारक अशी कहाणी ऐकून विठ्ठलपंतांना मनस्वी संताप आला. ते मनाशी म्हणाले, "काय हा घोर अन्याय ? तोही एका व्युत्पन्न अशा समाज धुरीणाकडून व्हावा ? कोण त्याला ह्या निंद्य कर्माबद्दल प्रायश्चित्त देणार ? क्षणभरात ते शांत झाले आणि लक्ष्मीला म्हणाले, "लक्ष्मी तुझ मन विटाळलेल नाही. काया ही नाशवंत आहे. तिला तोपर्यंत विटाळ नाही, जोपर्यंत मन पवित्र आहे. तू पवित्र आहेस. चल मी तुला तुझ्या घरी पोहोचवितो." त्यांनी लक्ष्मीला बरोबर घेतल आणि तिच्या घरी गेले. तिच्या सासऱ्याला झालेली हकीकत सांगितली व तिची नीट काळजी घेण्याची सूचना देऊन परत कुटीवर येण्यास निघाले. रस्त्यात एकच विचार त्यांच्या भाविक मनात थैमान घालीत होता की, हा असा अन्याय गरीबांवर करणाऱ्यांना कोण दंड देणार ? परमेश्वर अवतार घेऊन हे दीनांच दुःख निवारतील काय ? सामाजिक नीतिमत्तेचे रक्षण करणारेच जर असे नीतिभ्रष्ट झाले आहेत तर मग जनांनी दाद फिर्याद कुणाकडे करावी ? कोण त्यांची फिर्याद ऐकील आणि कधी ?" ह्या विचार तंद्रीतच ते आपल्या कुटीसमोर आले. कुटीच्या दारांत रुक्मिणी त्यांची वाट पाहातच उभी होती. तीच ओटीपोट बरच वर आल होत. त्यांनी पाहिल. पण त्यावेळी त्यांना कल्पनाही आली नाही की जगाचा उद्धारकर्ता त्याच वर आलेल्या रुक्मिणीच्या उदरातच विराजमान झाला आहे आणि बाहेर येण्याची वाट पहात आहे. ते कुटीत आले व त्यांनी सर्व वृत्तांत रुक्मिणीला सांगितला.

त्या दिवसापासून ती कुंभाराची विधवा सून त्या उपेक्षित जोडप्याला देवच मानू लागली. गांव ब्राह्मणांची तमा न बाळगता धैर्यवान लक्ष्मी कुटीवर येऊ लागली आणि त्या जोडप्याला सर्व प्रकारे मदत करू लागली. गर्भवती रुक्मिणीची काळजी घेऊ लागली.

शके ११९५ माघ वद्य प्रतिपदा उगवली. रात्रीपासूनच रुक्मिणी प्रसूती वेदनेन तळमळत होती. लक्ष्मी तिचे पाय चुरत, धीर देत होती. रुक्मिणीची ती प्रथम वेळ आणि तीही लग्नानंतर खूप उशिरा. त्यामुळे निसर्गतःच तिच्या शरीराची नाडी नाडी आवळून गेली होती. विठ्ठलपंत बाहेर अंगणात येरझारा घालत होते आणि मुखान श्री महिम्न स्तोत्र म्हणत होते.

" महिम्नः पारं ते परमविदुषो यद्य सदृषी ।
स्तुतिर्ब्रह्मा दीनामपि तदवसन्नास्त्ययि गिरः ।।"

विठ्ठलपंत जोरजोराने स्तोत्र म्हणून भगवान श्री शंकराची करूणा भाकत होते. त्या शिवस्तोत्राचे प्रतिध्वनि वातावरणात पसरून त्यात पावित्र्य आणि शांतता निर्माण करीत होते. पूर्व क्षितिजावर लाली आली. भगवान सूर्यनारायण उगवत असल्याची ती नांदीच होती आणि त्याच वेळी कुटीत बाळाच्या रुदनाचा ध्वनी घुमला. विठ्ठलपंत कुटीच्या दाराजवळ आले. लक्ष्मी आतून दारात आली आणि म्हणाली, "पंत मुलगा झाला. डाव्या दंडावर त्रिशूळ आहे."

प्रत्यक्ष शिवशंकरच जन्माला आलेत असच वाटल विठ्ठलपंतांना. संन्यासातून गुरु आज्ञेन पुन्हा संसारात आल्यामुळे मनात खोलवर जी संभ्रमाची खंत होती, ह्या सुलक्षणी पुत्र जन्मामुळे, तिची निवृत्ती झाली म्हणून त्यांनी पुत्राच नांव ठेवल "निवृत्ती."

लक्ष्मी त्या पुत्र जन्मामुळे, त्या तिघांनाही झालेला आनंद सिद्ध बेटातील वृक्ष, लता, पक्षीगण आणि इंद्रायणी माता यांना वर्णन करून सांगत होती :

लक्ष्मी– **आळंदीचे भाग्य उजळले मांगल्ये आजऽ।**
**महेश महिमा घेत जन्मले योगि बाळराज ॥ धृ ॥**

बाळ पाहिले असे सुलक्षणी।
दंडावरती त्रिशुळ निशाणी।
जणू सांगते भविष्य वाणी।
घेत ये, शिवऽशंकर काज ॥१॥

डोहाळ्यांती माता रुक्मिणी।
शिवलिंगाच्या दृढ आलिंगनी।
बोलत मजसी तृप्त होऊनी।
काढली काल तिने सांजऽ ॥२॥

बाळ गोमटे योगिच भासे।
सिद्ध कुणी हे विरक्त ऐसे।
दृष्टीमाजी करुणा विलसे।
मुखावर दिव्य असे तेजऽ ॥३॥

भाग्यवंतची पिता तयाचा।
माता पावन जिचे कुशीचा।
सुपुत्र ऐसा अंश प्रभूचा।
भूवरी स्वये स्वर्ग द्वीजऽ ॥४॥

जवळि न कुणिही करण्या कौतुक।
ग्रामण्यास्तव सखा न एक।
विहंग वृक्ष नी लता भाविक।
पाहती, प्रेमभरे त्याजऽ ॥५॥

संसाराते संन्यासातुनी।
पुनरपि येता संभ्रम जो मनि।
निवृत्ती अशी झाली मानुनि।
ठेविले नाम निवृत्तीराजऽ ॥६॥

卐 卐 卐

निवृत्तीच त्या कुटीत जन्माला येण विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांना अपरिमित सुखावह झाल. असा शांत बाळ तो की, रडण नाही, ओरडण नाही. जिथे टाकल तिथेच पडून राहायचा, आपल्या हाताची मूठ चोखीत. बाहेर अंगणात, सकाळचे वेळी टाकल तर तो दृष्टी स्थिर ठेऊन वर पाहत राही, वर उडणारे पक्षी आणि हलणारे वृक्ष. जणू ते सगळे त्याचे ओळखिचेच. रुक्मिणी त्या दरम्यान आपली घरची गृहकृत्यें करून टाकी. आनंदात दिवस चालले होते त्यांचे. दैनंदिन कार्यक्रम चालू होते. एक वर्ष पाहाता पाहाता निघून गेल. निवृत्ति आता रांगू लागला होता आणि तोंडातून अस्पष्ट अक्षरही काढू लागला होता. पुढ पुढ त्यान बोबड बोलणही सुरू केल आणि उभ राहणही पण.

अंगणात लावलेल्या प्राजक्ताला फूलऽ आलीत. रोज सकाळी अंगणात फुलांचा सडा पडू लागला. त्या पुष्प सुगंधान कुटीचा सारा परिसर दरवळून जाऊ लागला. विठ्ठलपंतांनी एक दिवस सकाळीच अंगणात एक खड्डा खणला आणि त्यांत वेलीमोगऱ्याच एक रोपट लावल. त्यावेळी निवृत्ती बाजूलाच एका दुपट्यावर पडला होता. योगायोग, त्यान 'सूं' केली आणि तो प्रवाह वाहत जाऊन मोगऱ्याचे खड्डयात स्थिरावला. ह्या अवचित क्रियेत विठ्ठलपंतांना एक शुभशकूनच दिसला. रोपट्याला पूर्णत्व देणारा बाजूलाच पडलेला आहे अशी त्यांची मनोधारणा झाली.

रुक्मिणीला दुसऱ्यांदा गर्भधारणा झाल्याची लक्षणऽ दिसू लागली. गर्भ वाढत गेला. तोपर्यंत निवृत्ती दोन वर्षाचा झाला होता. तो विठ्ठलपंताच बोट धरून चालतही होता हळूहळू.

श्रावण मास, शके ११९७, कृष्ण पक्षातील अष्टमी आली. भगवान विष्णू, श्रीकृष्ण रुपात अवतार घेऊन देवकीच्या कुशीत जन्माला आले ती रात्र. पाउस पडत होता. इंद्रायणी दोन्ही थडया भरून वहात होती. सकाळपासूनच रुक्मिणीला प्रसूति वेदना जाणवू लागल्या होत्या. रात्रीचे नऊ वाजले. जवळच आळंदीतील विष्णु मंदिरांत हरीदास, श्रीकृष्ण जन्मावर कीर्तन करीत होते. एक एक प्रसंग रसाळ शब्दात वर्णन करून सांगत होते. तिकडे देवकी प्रसूति वेदनेन अनिचेष्ट पडली होती. इकडे कुटीत रुक्मिणिची तीच अवस्था होती. विठ्ठलपंत बाहेर येरझारा घालीत होते व मुखान आद्य शंकराचार्यांची विष्णुस्तुति म्हणत होते.

" अविनय मपनय विष्णो दमय मनः शमय विषय मृग तृणाम् ।
भूतदया विस्तारय तारय सागरतः ॥

दु.ख भीति, यांच साम्राज्य नष्ट होऊन सुख मिळाव म्हणून विठ्ठलपंत विष्णुपदी नमत होते. तिकडे हरिदासाची कथा रंगात आली. ते सांगू लागले की, कोणत्या तरी दैवी प्रहारान कंसाच्या बंदीशाळेची कुलपऽ एकाएकी गळून पडली आणि त्याच वेळी देवकी प्रसुत झाली. अगदी मध्यरात्रीचा क्षण होता. त्याच शुभमुहुर्तावर आकाशांतून एक दिव्य प्रकाश ज्योत आली आणि कुटीत शिरली. ती अचेतन अवस्थेत असलेल्या रुक्मिणीच्या मुखावाटे शरीरात गेली आणि त्याच वेळी रुक्मिणी प्रसूत झाली. दिव्य असा द्वितीय पुत्र जन्माला आला. आनंदीआनंद झाला विठ्ठलपंतांना. मुलाच नांव त्यांनी 'ज्ञानदेव' अस ठेवल, कारण अंगणात लावलेल्या प्राजक्ताला फुल आलीत आणि मनात रुजलेल्या श्रद्धेचा विकास झाला अशी विठ्ठलपंतांची धारणा झाली होती म्हणून ज्ञान हेच नांव त्यांना पसंत पडल.

त्या बाळाच्या जन्माबाबत आणि त्याच्या बाळरुपाबाबत वर्णन सिद्धबेटातील वृक्ष, लता, पशू आणि पक्षीगण ह्यांना कौतुकानं सांगत होती लक्ष्मी आणि त्यांना बाळ पहायला बोलावत होती :

**साद घालते तुम्हा विहंगा उतरा क्षणभर ।**
**जन्मले देवचि भूवर ऽ ॥ धृ ॥**

पावन झाली कुटी आजला ।
ईश अंश हा बाळ जन्मला ।
कृष्णाष्टमिच्या मध्यरात्रिला ।
सांगते, घटी सर्व सारऽ ॥१॥

बाळ जन्मला प्रभा पसरली ।
दिव्य तेजमय भूमी झाली ।
चंद्रसूर्य जणू येउन खाली ।
पाहती, बालक हे गोजिरऽ ॥२॥

वृक्षलताची सखे सोयरे ।
तुम्ही विहंगा सहपरिवारे ।
कौतुक बघण्या अशीच यारे ।
बाळ हा, प्रभुचा अवतारऽ ॥३॥

ज्ञातिजने तर दाविली पाठ ।
धर्म नांव परी कपटी नाठ ।
क्रूर वृत्तिचे अंध नि कर्मठ ।
हृदयी, दुष्टताहि फारऽ ॥४॥

बाळ रुपाने देवे येउनि ।
धरतीवरती कार्य घेउनि ।
अज्ञा करण्या पावन ज्ञानी ।
ज्ञान हा, करुणेचा सागरऽ ॥५॥

卐 卐 卐

ज्ञानदेव कुटीत वाढू लागला. त्याच रांगण सुरू झाले. पुढे हळूहळू तो उभा होऊ लागला आणि नंतर चालू पण लागला. विठ्ठलपंतांनी निवृत्ती जन्मानंतर अंगणांत लावलेल्या मोगऱ्याला बहरून फुले आलीत. त्या फुलांचा मधुर सुगंध आसमंतात दरवळू लागला. निवृत्ती जवळ जवळ चार वर्षांचा होत आला होता. ज्ञानदेवाला आता खोड्या करायला अंगणही थिटे पडू लागले होते. त्याच्या खोड्या, बोबड बोबड बोलणे, चौकस वृत्ती आणि कमळासारखे सुंदर असे तेजस्वी नेत्र पाहून रुक्मिणी व विठ्ठलपंत दोघेही भारावून जात. त्यांना धन्यता वाटे, ती दोनही गोजिरवाणी बाळऽ पाहून. निवृत्तीच मात्र सारच वेगळ होत. तो एकदम शांत. खेळण नाही. जास्त बोलण नाही. सदा आपला वृक्षाखाली जाऊन बसलेला एखाद्या ध्यानस्थ योग्यासारखा. एकाग्र चित्त करून तासन तास बसायचा, जणु काही जगाशी त्याला कर्तव्यच नाही.

एक दिवस विठ्ठलपंत इंद्रायणी स्नानाला गेलेत. त्यांनी बरोबर निवृत्तीलाही पण घेतल होत. त्याला कांठावर बसवून त्यांनी नदीत उडी घेतली. स्नानादि कर्म उरकून ते नदीबाहेर आले तो त्यांना निवृत्ती दिसला नाही. ते जरा घाबरले आणि ओल्या वस्त्रानिशीच त्याला हाका मारू लागले, "निवृत्ती ऽऽऽऽ, अरे बाळा. निवृत्ती राजा ऽऽऽ." पुष्कळ हाका मारल्या पण कुठुनही उलट आवाज आला नाही. पितृ हृदय विदीर्ण झाले. गहिवरल्या अवस्थेतच ते नदीच्या किनाऱ्यान त्याचा शोध करत चालू लागले उगमाकडे. थोडेच ते पुढे गेले असतील आणि ते अनुपम दृष्य त्यांना दिसले. एक ईश्वरी चमत्कारच होता तो. एका वट वृक्षाखाली एक शिवलिंग वर आले होते. त्या शिवलिंगावर निवृत्ती आसनस्थ झाला होता. दोनही नयनकमळ बंद होती त्याची. मुखचंद्रावर प्रखर असे तेज आणि गळ्यामध्ये मेरुमणी असलेले एक नागराज, निवृत्तीच्या शीरावर फणा उभा करून, त्याला छाया देत डोलत होते. विठ्ठलपंतांना क्षणभर असाच भास झाला की, साक्षात् भगवान शिवशंकरच ध्यानस्थ बसले आहेत :

निवेदक— पाहिले दृष्य भावयुक्तऽ ॥
आसनी शंकर ध्यानस्थ ॥ धृ ॥

वटवृक्षातळी सिद्ध आसनी ।
शिवलिंगावर बसले ध्यानी ।
नागराज शिरि फणा धरुनी ।
डोलती मायेचे आप्त ॥१॥

धरली छाया फणिंद्रराजे ।
प्रभावंत मणि तिथे विराजे ।
निवृत्तीमुख तळपे तेजे ।
भासले महेश ते सुप्त ॥२॥

बघुनी मानव येत त्यास्थळी ।
सर्पराज ये पुढती जवळी ।
नयनी मिळता खूण जिव्हाळी ।
झाली ओळख मग प्राप्तऽ ॥३॥

एक दुजाते बघता भरुनी ।
संभ्रम मनिचा मिटला नयनी ।
नागराज ये भावे नमनी ।
तयांचे जाणुनी पितृत्व ॥४॥

फणा ठेविला पूज्य पदावरी ।
विठ्ठलपंता नमिले यापरि ।
अपुल्या मार्गी फिरले सत्वरी ।
होउनी कार्यातुनी मुक्तऽ ॥५॥

निवृत्तीचे ध्यान उतरले ।
नेत्र उघडिता पुढती दिसले ।
पिता तपस्वी, त्यांच्या रमले ।
प्रेमे आलिंगनि तृप्त ॥६॥

निवृत्तीचे ते आलिंगनऽ ।
पित्यास वाटे योग सुलक्षण ।
शिवशंकर जणु स्वर्गामधुन ।
उतरले भूमिवर गुप्त ॥७॥

□ □ □

ते सर्व दृष्य पाहून विठ्ठलपंतांना गहिवरून आले. त्यांनी ते स्वयंभू शिवलिंग जमिनीतून काढून आपल्या डोक्यावर घेतले, आणि निवृत्तीसह ते कुटीवर आले. सर्व वृत्तांत त्यांनी रुक्मिणीला सांगितला. पुत्र भाग्याची ती नांदीच समजून तिलाही खूप आनंद झाला. विठ्ठलपंतांनी पारिजातक वृक्षाखाली सुंदरशी जागा तयार केली आणि शिवस्तुतीच्या मंत्रोच्चारात त्या शिवलिंगाची स्थापना आपल्या अंगणांत केली. ग्रामस्थांनी ग्रामण्य आहे म्हणून श्री सिद्धेश्वर मंदीर त्या व्युत्पन्न आणि भाविक जोडप्याला दर्शनाकरिता बंद केले होते, पण त्या शिवलिंग रुपांत प्रत्यक्ष शिवशंकरच त्यांच्या अंगणात मुक्काम करायला आले होते. ईश्वरी संकेतापुढे मानवी बंधनाला काहीच किमत नाही या सिद्धांताचे ते एक जिवंत प्रतीक होते. निवृत्ती मग नेहमीच त्या शिवलिंगासमोर जाऊन तासन तास बसू लागला.

रुक्मिणीला तिसऱ्यांदा दिवस गेल्याची लक्षणे दिसू लागली. ती झोपेतच ॐकार म्हणू लागली. तिचा मुखचंद्र दिवसेंदिवस तेजःपुंज होत चालला. तिला जिकडे तिकडे ॐकार ध्वनीच ऐकू येऊ लागला. वाऱ्याच्या लहरीबरोबर हलणारे लता वृक्षही ॐकार ध्वनिच प्रसवू लागले. माता इंद्रायणिचा खळखळणारा ॐकाररुप आवाज तिचे श्रवणेंद्रियांत जाऊ लागला. एवढेच काय पण प्राजक्ताची पडलेली फुलऽ सुद्धा शिवलिंगापुढे ॐकार रेखीतच भूमीवर पडत होती. पक्षीगण ॐकारच गात होते. सर्वत्र परिसर ॐकारमय झाला होता. वातावरणही ॐकारयुक्त वाटत होते.

कार्तिक मासातील पौर्णिमा आली. रुक्मिणीला प्रसुती वेदना जाणवू लागल्या. लक्ष्मी तिची काळजी घेत होती. तिचे पाय चोळून देत होती. तिला धीर देत होती. बाहेर अंगणात निवृत्ती–ज्ञानदेवाला आपल्या मांडीवर घेऊन, विठ्ठलपंत दोन्ही मुलांचे पाठीवर प्रेमाने हात फिरवीत मुखाने ॐकार मंत्राचा जप करीत होते. कार्तिक मासातील थंडी. पक्षीगण आपापल्या घरट्यात एकमेकाच्या उबेत विसावले होते. पौर्णिमेचा पूर्णचंद्र आकाशात मध्यावर आला आणि जिकडे तिकडे ॐकार घुमला. रुक्मिणी प्रसूत झाली :

निवेदक–

**पौर्णिमा चंद्र नभावरऽ ।**
**गर्जला गगनी ॐकार ।। धृ ।।**

ॐकाराचा अगाध महिमा ।
विश्वसार हे एकच प्रतिमा ।
'ब्रह्मतत्व' ना अन्य ऊपमा ।
साठले यात चराचरऽ ।।१।।

देहा त्यागुनी तेथे जाणे ।
ब्रह्मरुप त्या कर्मे होणे ।
मोक्ष प्राप्तिची आस ठेवणे ।
जन्मी सुकृत यावरऽ ।।२।।

ॐकाराच्या मंगल ध्वनितऽ ।
नीर धावते इंद्रायणितऽ ।
लता वृक्षही सादती त्यात ।
पक्षीगण ही तरुवरऽ ।।३।।

परिसर सारा ओंकारांती ।
निनाद घुमवी दशदीशांती ।
अर्पण सर्वचि ब्रह्मपदांती ।
येउनी जन्मा धरणीवरऽ ।।४।।

ॐकारात्मक पावनतेची ।
वेळ साधली येण्यास्तवची ।
अगास करण्या ब्रह्मरूपची ।
घेती ब्रह्मच अवतार ।।५।।

तिसरा पुत्र जन्माला आला. विठ्ठलपंताना तो मोक्षाकडे नेणारा सोपानच वाटला, म्हणून त्या पुत्राचे नांव त्यांनी 'सोपान' ठेवले.

लक्ष्मी तृतीय पुत्राची बातमी देण्याकरता सिद्धोपंताकडे गेली आणि रडत रडतच कुटीवर परत आली, सिद्धोपंतांना देवाज्ञा झाल्याची बातमी घेऊनच. मोठ्या धीरान तिने हे वृत्त विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांना सांगितले. दोघांनाही अतिशय दु:ख झाल. रुक्मिणीचे सांत्वन करणे तर फारच कठीण झाले. पण कोण होते तिथे लक्ष्मीशिवाय सांत्वन करायला ? लक्ष्मी आणि विठ्ठलपंतांनी तिला धीर दिला. दु:खातिरेकाचा भर ओसरला.

इंद्रायणीकाठी चंदनाची चिता रचण्यात आली होती आणि तीवर सिद्धोपंतांचा पार्थिव देह ठेऊन ब्राह्मण अंतिम अग्निसंस्काराची तयारी करत होते. गहिवरलेल्या मन:स्थितीतच विठ्ठलपंत जवळ गेले आणि तिथे उपस्थित असलेल्या विसोबा चाटी, ग्राम उपाध्याय, हरिपंत, मुदगल शास्त्री इत्यादि ब्रह्मवृंदास विनवू लागले, "सिद्धोपंत माझे श्वसूर. त्यांना पुत्र नाही. धर्मानें त्यांची उत्तरक्रिया करण्याचा अधिकार मला दिला आहे. तरी मला उत्तरक्रिया करण्याची अनुमति द्यावी. श्वसुरांना मुक्ती मिळेल."

ब्राह्मणांनी साफ नकार दिला. कठोरतेचा अतिरेक झाला होता. रुढीच्या आणि धर्माच्या नांवाखाली मानवता आणि मानवी जीवनाची मुल्य गाडल्या गेली होती. हीन वृत्तीची परमावधीच होती ती. ग्रामोपाध्याय म्हणाले, "विठ्ठलपंत आपण केलेल्या पापामुळे आपले ब्राह्मणत्व हिरावून घेतले आहे. आपण आता ब्राह्मण राहिला नाहीत. तुम्ही प्रेताला आणि चितेला स्पर्शही करू शकत नाही."

ब्राह्मणांनी चिता पेटविली आणि त्या ब्रह्मदेहाला भडाग्नी दिला. विठ्ठलपंत दूर बसून पहात होते. डोळयांतून अश्रूधारा वहात होत्या. ब्रह्मवृंदांना त्या मानवी अश्रूंची काहीच खंत नव्हती. कुणातही साधी माणुसकी पण राहिली नव्हती. प्रेत दहन सपले. सर्व लोक इंद्रायणीत देह बुडवून परत गेले. विठ्ठलपंत बसले होते, पहात होते आणि म्हणत होते :

विठ्ठलपंत– **अग्नि लागता चिता पेटली ज्वाला गगनात ।।**
**शोक सागरी बसुनी रडती प्रिय ते जामात ।। धृ ।।**

काय शृंखला अंध रुढीची ।
विटंबना ही मानवतेची ।
की परिसीमा असुर वृत्तिची ।
की हा धर्म अध:पात ।।१।।

मम श्वसुराते नव्हता पुत्रऽ ।
जवळी नाही कुणीच गोत्रऽ ।
देण्या अग्नि म्हणता मंत्रऽ ।
विधिविण काया ज्वालेत ।।२।।

धर्माचरणी पावन असता ।
प्रेताशीही अशी दुष्टता ।
स्वजने दाविली नीतिभ्रष्टता ।
सांगुनी धर्मचि तो यात ।।३।।

अधिकारी मी अंत्य क्रियेचा ।
लेख असाची धर्म विधीचा ।
वंचित करुनी मजसी त्याचा ।
ठेवणे क्रौर्य किती यात ? ।।४।।

तात क्षमेसी मला करावे ।
घडले हे जे योजित दैवे ।
नसावि चिंता सांगत भावे ।
लाडकी रुक्मिणी मज दैवत ।।५।।

□ □ □

सोपान एक वर्षाचा झाला. ज्ञानदेवाला तीन पूर्ण झालीत आणि निवृत्ती पाच वर्षाचा झाला. विठ्ठलपंत रोज प्रातःकाळी आणि संध्याकाळी निवृत्तीला संथा देत, ती तो शिकत होता, तोंडाने म्हणत होता, पाठ करत होता, अंतर्हृदयांत आकलन करून ठेवत होता. त्या पवित्र अशा कुटीत, नव्हे महाऋषीच्या आश्रमात सोज्वळता, भाविकता आणि संपन्न असे आनंदाचे गोकुळच नांदत होते.

आणि रुक्मिणीला चवथ्यांदा गर्भधारणा होऊन गर्भ वाढीला लागल्याची चिन्ह दिसू लागली. दिवसामागून दिवस जात होते. लक्ष्मी प्रेमाने आप्तवत तिची काळजी घेत होती. विठ्ठलपंत सकाळ संध्याकाळ मुखाने आदीमाया जगदंबेची प्रार्थना करीत होते. देवी जगज्जननीला आळवीत होते. आश्विन शुद्ध प्रतिपदा उगवली. प्रातः समयीच विठ्ठलपंतांनी विधिनुसार घटस्थापना केली आणि निवृत्ती-ज्ञानदेवास समोर बसवून ते आदिमाया देवतेची संथा त्यांना देत होते. दोघांच्याही तोंडून म्हणवून घेत होते. त्या आदिमाया स्तोत्राचे गंभीर आवाजातून एक विलक्षण अशी तेजोमय ज्योत साकार झाली. त्याच वेळी आकाशात प्रचंड कडकडाट झाला. ती ज्योत दैदिप्यमान प्रकाशात आकाशातून आली आणि कुटीत शिरून, प्रसूती वेदनेन तळमळत असलेल्या रुक्मिणीच्या मुखावाटे शरीरात शिरली. रुक्मिणी क्षणभर कंपित झाली. अचेतन झाली. अचेतन स्थितीतच तिच्या मुखावाटे शब्द निघू लागले. "अहो ! पहा ते. अष्टभुजा जगदंबादेवी व्याघ्रावर आरूढ आहे. हाती त्रिशूळ, खड्ग, गदा आहे. काय तेजःपुंज मुख. पहा पहा. सूर्य रथातून धरतीवर येत आहे. मला नमस्कार करू द्या. मी तिला कुंकू लावते. तुम्ही निवृत्ती, ज्ञान, सोपान, तिला दंडवत घाला." अस बोलतच तिने हात जोडले. विठ्ठलपंत आदिमाया स्तोत्र म्हणतच होते. त्याच एका क्षणी प्रसूती वेदनांच्या अतिरेकातच रुक्मिणी प्रसूत झाली कन्या रत्न जन्माला आले. शके १२०१, आश्विन शुद्ध प्रतिपदा. घरातील बाळंतपणा नंतरचे सर्व कामकाज आटोपल्या नंतर रुक्मिणी छोट्या कन्येला घेऊन पडली होती. विठ्ठलपंत तीनही मुलासोबत कुटीत गेले. मोठ्या प्रेमाने त्यांनी तिच्या भालप्रदेशावर हात ठेवला आणि तिला सांगू लागले :

**विठ्ठलपंत–** **जीवन अपुले सार्थक केले विश्वदेवतांनी ।**
**आदीमाया जन्मा आली अमृत घेउनी ॥ धृ ॥**

आश्विन शुद्ध आज प्रतिपदा ।
घटस्थापना सुदिन संपदा ।
जगदंबा ये घेत आयुधा ।
दया क्षमा भुवनी ॥१॥

अष्टभुजा ही मंगल देवी ।
हस्ती खड्ग गदा शोभवी ।
मळवट मंगल भाल भूषवी ।
कन्या रूपऽ योनी ॥२॥

वाहन व्याघ्रा स्वर्गि ठेविले ।
प्रकाश रुपा दिव्य घेतले ।
असुर मर्दिनी भाव निमाले ।
गोंडस ही योगिनी ॥३॥

तुजला स्वप्नी रुप दाविले ।
जगदंबेला असे पाहिले ।
येत माय ही तूच बोलले ।
विश्वाची स्वामिनी ॥४॥

तेज दिव्यसे जणू भासले ।
नभोमंडळी अगणित जमले ।
सूर्यचंद्र तिज देण्या आले ।
निरोप शुभ चिंतुंनी ॥५॥

(चाल) पावन झाली अपुली काया, सार्थक या जन्मी ।
स्वर्ग देवची चालत आले, अपुल्या अंगणी ।
महेश विष्णू ब्रह्माऽ माया, आत्मज होउनी ।
मांगल्याची हीच सांगता, कृतार्थ जीवनी ॥६॥

卐 卐 ■

घट स्थापनेच्या शुभ दिनी जन्म झाला आणि मानव जन्मात गृहस्थाश्रम धारण करून कर्तव्यमुक्त झाल्याची नांदी असच समजून विठ्ठलपंतांनी कन्येच नांव ठेवले 'मुक्ताई'.

त्या कुटीराश्रमात विठ्ठलपंतांचा संसार तृप्ततेन चालला होता. जणु ते एक गोकुळ होत त्यांच. होता होता निवृत्ती आठ वर्षांचा झाला. विठ्ठलपंतांनी त्याला शास्त्र, वेद, संहिता इत्यादि शिकवण सुरू केले. सरस्वती तर प्रसन्न होतीच त्याला. वडिलांनी शिकवलेले सर्व ज्ञान तो आकलन करून घेत होता. त्या ब्रह्मज्ञानाच तेज दिवसेंदिवस त्याच्या मुखावर दृग्गोचर होत होते. तो व्युत्पन्न होऊ लागला. तोपर्यंत ज्ञानदेवही पण संथा घेऊ लागला होता. जेव्हा बाप आणि अग्रज निवृत्ती, एखाद्या गूढ विषयावर चर्चा करीत, तेव्हा ती चर्चा तो मोठ्या तन्मयतेन लक्ष देऊन ऐकी आणि मधून मधून त्याबाबत प्रश्नही करीत राही. त्याची तीव्र बुद्धी आणि जिज्ञासा विठ्ठलपंतांच्या ध्यानांत यायला वेळ लागला नाही.

ते मनात मात्र नेहमी चिंता करीत. "आपली मुल अतिशय कुशाग्र बुद्धीची आहेत. त्यांचे उपनयन संस्कार व्हावयास पाहिजे. पण आपणावर ग्रामण्य असतांना ब्रह्मवृंद हे कसे करून घेतील ? अंती कस होईल मुलांच ?" अशा कल्पना त्यांच्या मनांत येत आणि याच एका विवंचनेत ते सदा दुःखित असत. पण कधीही त्यांनी हे आपल दुःख मुलांच्या किंवा पत्नीच्या निदर्शनास येऊ दिले नाही.

एक दिवस ते असेच व्यथित मनस्थितीत असता त्यांना निद्रा लागली. ते गाढ निद्रेत असतांनाच एक तेजस्वी योगी त्यांचे समोर स्वप्नामध्ये आला आणि सांगू लागला :

स्वप्नांत आलेला योगी– **बाळ विठ्ठला व्यथा जाणुनि आलो मी येथे ।**
**झालो पाहुन तुज कुलदीपा धन्य असे वाटे ॥ ध्रु ॥**

त्रिंबक मी तव पितृपिताची ।
जाणली चिंता सर्व मनाची ।
खंत न करणे वृथा कशाची ।
सांगण्या तेच आज प्रगटे ॥१॥

सर्वासह जा नाशिक क्षेत्री ।
पतीतपावन गोदातीर्थी ।
गौतम ऋषिच्या आश्रम निकटि ।
योजिला मार्ग उभा तेथे ॥२॥

ब्रह्मगिरीच्या प्रदक्षिणेला ।
सुरू करावे घेउनी सकला ।
कुलगुरु गहिनी तिथेच बसला ।
भेटण्या अपुल्या शिष्याते ॥३॥

निवृत्तीला अनुग्रह देउनी ।
सद्‌गुरु जातिल मुक्त होउनी ।
योजित शिष्या नाथ करुनी ।
त्यांच्या अमोल दिव्य मंत्रे ॥४॥

ज्ञानब्रह्म ते घेउनी बाळ ।
देइल पुढती अनुजा प्रबळ ।
ज्ञानदेव मग योगी सबळऽ ।
होउनी, अग्रज गुरु त्याते ॥५॥

यावे आळंदीला परतुन ।
कार्य आपुले होईल पूर्ण ।
प्रयाग तीर्थी दोघे अर्पण ।
जाउनी करा स्वदेहाते ।।६।।

मी त्या पावन संगमांतरी ।
वाट पाहतो तुमची तोवरी ।
जाऊ मोक्षा मिळुनी सारी ।
जीविता आत्मशांति जेथे ।।७।।

卐 卐 卐

विठ्ठलपंत स्वप्नावस्थेतून जागे झाले. त्यांनी पडलेल्या स्वप्नाचा विचार केला. आपल्याला पितामहांनी मार्गदर्शन केले अशी त्यांची ठाम धारणा झाली. खोल विचार करण्यात प्रातःकाळ पर्यंतचा समय जाऊ दिला. सकाळ झाली. रुक्मिणी आणि मुलेही उठली. नाशिक, त्र्यंबकेश्वर, ब्रह्मगिरीच्या दर्शनार्थ यात्रेला निघण्याची कल्पना त्यांनी पत्नीला व मुलांना सांगितली. निवृत्ती आणि ज्ञानदेव तर आनंदाने उड्याच मारायला लागले. यात्रेत येणाऱ्या अनुभवांची आणि दिसणार असलेल्या नयन मनोहर निसर्ग दृष्यांची कल्पना करूनच ते भारावून गेलेत. येणारी पुढची प्रातःकाळ ही निघण्याची वेळ ठरली.

सर्व तयारी झाली. सिद्धोपंताच्या निधनानंतर उमाबाई ब्रह्मवृंद रोषाची तमा न बाळगता कुटीतच राहावयास आल्या होत्या. लक्ष्मी आणि उमाबाई यांना देवपूजा, वृक्षलतांना पाणी घालणे वगैरे सर्वच गोष्टींची काळजी घेण्यास सांगून पुढचे प्रातःकाळीच श्री सिद्धेश्वर मंदिराचा कळस, अंगणातील शिवलिंग, माता इंद्रायणी यांचे दर्शन सर्वांनी घेतले आणि प्रसन्नतेन आळंदी सोडली. आता योगिराज विठ्ठलपंतांचे सहकुटुंब सहपरिवार असे तीर्थाटण सुरू झाले होते. त्यांची ती तिसरी तीर्थयात्रा होती. पण तिचे महत्व आणि महात्म्य ते एकटेच जाणत होते :

**निवेदक– तीर्थाटण तो करित चालला पहा योगिराज ।। धृ ।।**

आळंदीची कुटी सोडली, कुटुंब भाविक पथावरी ।
पुत्र तीनही कन्या मुक्ता, सती रुक्मिणी सहचारी ।
निसर्ग मोहक शेते हिरवी, मनें भारली तृप्तीने ।
पवित्र मानस अंतरिचा त्या ठेउन हृदयी भक्तीने ।
पशुजिवांना बघता परिसत, गाती पक्षीगण गुंजऽ ।।१।।

भीमाशंकर दर्शन झाले सांगति पुत्राते महिमा ।
ज्ञानदेव करि वाद पित्याशी, विषया उघडित अध्यात्मा ।
मुक्ताबाला स्कंधि पित्याचे, कधी मायच्या ती हाती ।
हांसत खेळत मोदे गोकुळ, पुढच्या मार्गाला धरती ।
रात्र निघावी मंदिर निकटी, जिथे जाहली की सांजऽ ।।२।।

असे चालता यात्री भाविक, आले नाशिक तीर्थाला ।
स्नाने करुनी गोदाजळि मग, पुढच्या बघती चढणीला ।
वंदन केले त्रिंबकेश्वरा इच्छित साध्यासी स्मरुनी ।
पूर्ण कराया तिथेच रमले चिंतन कुलगुरुचे करुनी ।
कार्य समाप्ती स्मरता दिसली, दिव्य प्रभा त्याजऽ ।।३।।

卐 卐 卐

त्या पवित्र क्षेत्राचा परिसर पाहून विठ्ठलपंतांच्या जुन्या स्मृती जागृत झाल्या. ते मुलांना व पत्नीला सर्व ठिकाणांची माहिती निवेदन करत होते. ऐकतांना सर्वांची मने मोहून जात होती. सर्वांनी परिसरातील मंदीर व इतर पवित्र स्थळांना भेट देऊन दर्शन घेतले. त्र्यंबकेश्वरी राउळातच त्यांनी आपला मुक्काम ठोकला.

ब्रह्मगिरीची संपूर्ण प्रदक्षिणा करण्याचा निश्चय झाला. पहिल्या रात्रीच कुशावर्तावर सर्वांनी स्नाने उरकली. लहान मुक्ताईला तर ज्ञानदेवाने तीर्थात बुडवूनच काढले. ती पण आनंदाने हसत होती. टाळ्या वाजवीत होती. त्र्यंबकेश्वराचे दर्शन घेतले आणि सर्वांनी ब्रह्मगिरीचे प्रदक्षिणेकरता पाय पुढे टाकले. संपूर्ण प्रदक्षिणा अती कठीण आहे अशी कल्पना विठ्ठलपंतांनी सर्वांनाच आधी दिली होती.

प्रदक्षिणा सुरू झाली. धाकटा सोपान बापाचे खांद्यावर तर मुक्ताई मायच्या कडेवर, असे ते चालत होते. निवृत्ती सर्वांच्या पुढे होता. आकाशांत चांदण्या चकाकत होत्या. वनमय अशा त्या ब्रह्मगिरीच्या परिसरांत असंख्य काजवे उडत होते आणि त्यांच्या देवदत्त प्रकाशाची उघडझाप करीत होते. रस्ता कठीण आणि काटेरी असल्यामुळे ते सर्व मंद गतीनेच पुढे पुढे सरकत होते. निवृत्ती सर्वांत पुढे चालून मार्गातील काटे, काटेरी वेलीं वगैरे बाजूला सारून, सर्वांच्या करता मार्ग साफ करून ठेवत होता. विठ्ठलपंतानी मग चालताना पत्नीला आणि मुलांना ब्रह्मगिरी, गौतम ऋषी, गोदावरी नदीचा उगम यांचे विषयी वर्णन व महत्व सांगण्यास सुरवात केली :

विठ्ठलपंत– पहा रुक्मिणी पहा मुलांनो पहा हा निसर्ग भू लोक ।
वनराजीने भूषित केले विश्व कसे मोऽहकऽ ।। धृ ।।

उजवीकडचा ब्रह्मगिरी तो ।
हिरवा शेला अंगी धरतो ।
या वरची मी कथा सांगतो ।
आहे अतिशयची सात्विकऽ ।।१।।

आश्रम यावर गौतम ऋषिचा ।
योगी पुतळा दिव्य शक्तिचा ।
कठिण तपाने प्राप्त सिद्धिचा ।
तसाची गूढ अस्त्रधारक ।।२।।

कृषीत तेथे फक्त एकरी ।
साळी उपजे अमाप यापरी ।
एक वर्षभर सकला ते पुरी ।
फेकुनी बीज मूठ एक ।।३।।

तशीच महती ऋषि तेजाची ।
अपूर्व शक्ति आत्म सिद्धिची ।
प्रगटवि जे जे इच्छित तेची ।
म्हणुनी देव मंत्र मूक ।।४।।

प्रात:काळी संध्या करिता ।
दिसली अवचितची गोमाता ।
चरण्या अद्‌भुत साळित जाता ।
क्रोध ये मुनिते क्षण एक ।।५।।

सहज म्हणूनी दर्भ उचलिला ।
गोमाते प्रती तदा फेकला ।
लागत पशुने प्राण सोडिला ।
हा असा अस्त्रांचा लौकिक ।।६।।

घडली हत्या पतीत हस्ते ।
खेद तयाचा अती मुनीते ।
पश्चातापे हळहळ त्याते ।
जाणुनि प्रायश्चित्तवत् पातक ॥७॥

नारद पाहुन आले भूवर ।
सांगे शंकर तपची यावर ।
महेश भोळे करुणा सागर ।
प्रसन्न होता मागा इच्छिक ॥८॥

गंगा त्यांनी धरली जटेत ।
सोडा तिजला ब्रह्मगिरीत ।
वर हा मागा, जनहित यांतऽ ।
जलाने शमेल भूऽ भूकऽ ॥९॥

गौतम ऋषिची पुढे चालली ।
घोर तपस्या शांत निर्जली ।
अन्न नीर ना आसन बदली ।
त्यागिले सर्वचि ऐहिकऽ ॥१०॥

श्री शंकर मग प्रसन्न झाले ।
जसे योजिले ते मागितले ।
ब्रह्मगिरीवर जटे झाडिले ।
वाहिली गोदावरी सेवकऽ ॥११॥

卐 卐 卐

अशा रीतीने बोलत बोलत ते पुढे पुढे जात होते. मधूनच मयूरांच केकाटण कानावर येई, तर कधी एखादी कोकिळा आपल्या मंजुळ आवाजात गाऊन आपले अस्तित्व जाहीर करी. पर्वतराजीला वळसा घालून ते कुटुंब मध्यावर आले. रानटी वेली कधी कधी रस्ता बंद करून ठेवीत त्यांना बाजूला करूनच पुढे जावे लागे. सर्वांपुढे चालणारा निवृत्ती हे काम करत होता. तो अगदी एखाद्या योग्या-सारखा पुढे चालत होता. ज्ञानदेव निसर्ग सौंदर्य न्याहाळीत, त्या विश्वनिर्मित्याची प्रशंसा करी आणि वडिलांना त्या महान शक्तीच्या अस्तित्वाविषयी प्रश्न विचारी. विठ्ठलपंत उत्तर देऊन; त्याच्या शंकांचे निरसन करीत. मध्येच एके ठिकाणी, थकवा जावा म्हणून त्या सर्वांनी थोडी विश्रांती घेतली, व नंतर पुन्हा पुढचा मार्ग आक्रमू लागले. पुढे चालणाऱ्या निवृत्तीला एकाएकी समोर चकाक-णारे दोन गोल दिसले. त्या पाठोपाठ भयानक अशी एक व्याघ्र डरकाळी सर्वांच्या कानावर आली. ती डरकाळी ऐकताच सर्वच जण घाबरले. व्याघ्रराज हळूहळू समोर येताना सर्वांनी पाहिले. विठ्ठलपंत पत्नी आणि मुलांना घेऊन माघारी धावत सुटले. निवृत्तीही पळाला परंतु तिकडे की, जिकडून व्याघ्रराज येत होते. काही काळ असाच निघून गेला. व्याघ्रराज परत गेले अशी खात्री झाल्यानंतर, विठ्ठलपंत मुलांसहित आड सोडून त्याच जागेवर आले. पाहातात तो निवृत्ती तिथे नव्हता. सर्वांनाच काळजी लागली निवृत्तीच्या सुरक्षिततेबाबत. विठ्ठलपंत, रुक्मिणी, ज्ञानदेव, जोरजोराने हाका मारुन त्याला सादवू लागले. "अरे निवृत्तीराजाऽऽऽ' अरे बाळा निवृत्ती, "अरे दादा ऽऽऽ." सर्वांनी किती तरी आवाज दिले, पण निवृत्ती काही त्यांना दिसला नाही. तोपर्यंत पहाट झाली. खिन्न मनाने आणि निवृत्तीबाबत काळजीतच ते सर्व मुक्कामावर परत आले. रुक्मिणीने त्र्यंबकेश्वराला बिल्वपत्र वाहाण्याची व्रत उपासना आरंभिली. त्याच दिवसापासून विठ्ठलपंत मृत्यूंजय मंत्राचा जप करू लागले. सकाळ दुपार ते ज्ञानदेवाला घेऊन, हरविलेल्या निवृत्तीला शोधण्याकरिता परिसरात भटकत आणि कुठेच शोध न लागल्यामुळे उदासीन होत परत येत.

आणि असेच शोध करीत असताना त्यांना एक दिवस, सूर्यास्ताचे वेळी, जंगलात एका शिळेवर बसलेला निवृत्ती दिसला. विठ्ठलपंत आणि ज्ञानदेव मोठ्या हर्षाने त्याचे जवळ गेले. जवळ जाऊन पाहातात तर तो निवृत्तीच होता, पण पूर्ण बदललेला, अगदी वेगळाच. अतिशय तेजःपुंज चेहरा, पाणीदार डोळे, त्यांत करूण भाव, ध्यानस्थासारखा त्या शीळेवर बसलेला, कुणी आसनस्थ योगीच जणू, किंवा एखादा पूर्णज्ञानी सिद्धच, असा दिसत होता. एखाद्या प्रभा-वंत दीपकाप्रमाणे त्याचे मुखाभोवती प्रकाश वलय पसरले होते. विठ्ठलपंत आणि ज्ञानदेव दोघेही त्याच्याकडे भावनाभरल्या दृष्टीने पहात होते, आणि ज्ञानदेव बापाला निवृत्तीच्या त्या स्थितीचे वर्णन करून सांगत होता :

ज्ञानदेव–

**निवृत्ती बसला शिळेवरी ।**
**भासला गुरुवरची अंतरी ।।धृ।।**

पाही ही जी समोर मूर्ती ।
पूर्ण ज्ञानी सदगुरु स्फूर्ती ।
मुखी विलसते साधन तृप्ती ।
पौर्णिमा चंद्र जणू अंबरी ।।१।।

बदले पुरता माझा अग्रज ।
मातपित्यांचा पहिला आत्मज ।
वनांत भुलला ना हा मनुजऽ ।
योगि हा दिव्य मंत्रधारी ।।२।।

दादा ऐसा नऊ वर्षांचा ।
स्वरुप सावळा दीप कुळाचा ।
रहिवासी तो आळंदीचा ।
भाग्यची घेई अपुल्या करी ।।३।।

अनुग्रहाचे घडले पर्वऽ ।
ज्ञानामृत भरि गंगा सर्वऽ ।
जणु हा प्याला अदभुतपूर्व ।
संग्रही ब्रह्मज्ञान ईश्वरी ।।४।।

वंधू मजहा स्वयेचि पूर्ण ।
लाभे सद्गुरु योग सुवर्ण ।
अधिर जाहले दोनही कर्ण ।
परिसण्या अमृत वच शांकरी ।।५।।

जीवासहची परमात्माजे ।
आसनि ऐक्यातची विराजे ।
हृन्मंदिरि ओंकारच गरजे ।
यशस्वी भेदाभेद संगरी ।।६।।

卐 卐 卐

ज्ञानदेवाने निवृत्तीच्या दोनही पदांना हात लावून वंदन केले. विठ्ठलपंतांनी त्याचे शिरावरून प्रेमाने हात फिरविला. निवृत्तीने आपले नेत्र उघडले, आणि इकडे तिकडे पाहू लागला, "बाळा निवृत्तीराजा तू इतके दिवस वनात कुठं भटकला होता ? आम्ही पुष्कळ शोधले तुला, पण तू आम्हाला कुठेच दिसला नाही. कुठ होतास तू आतापर्यंत ? भुलला होता का वनांत ?" विठ्ठलपंतांनी विचारले. त्याने एक दोन वेळा बापाकडे आणि भावाकडे आलटून पालटून पाहिलं आणि मग काही तरी आठविल्यासारखे करून बोलू लागला "मीऽ भुऽलऽलोऽऽ होऽऽ तो. कधी ? नाही नाही. मी तर कधीच भुलत नाही." आणि असेच काही तरी असंदिग्ध बोलू लागला आणि चारही दिशांना पाहू लागला. तेव्हां ज्ञानदेव म्हणाला, "अरे दादा कसे तुला आठवत नाही ? आपण ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा करत असता एक व्याघ्रराज आले. त्यांनी डरकाळी दिली. ती ऐकून आपण सर्व घाबरलो आणि पळालो. त्या पळापळीत तू भलतीकडेच गेलास आणि भुललास. हे आठवत नाही तुला ? आम्ही तेव्हापासून तुझ्याकरता किती काळजी करत आहोत ! माय तर दुःखाने अगदी हताश होऊन बसली आहे. चल लवकर आता मुक्कामावर."

ज्ञानदेवाचे हे बोलणे ऐकून निवृत्ती बोलू लागला, "होऽऽ होऽऽ एक व्याघ्रराज आलेऽऽ मी त्यांचेऽ मागेऽ मागेऽऽऽ गेलोऽऽऽ." आणि मग मुखावर हास्य आणून तो हकिकत सांगू लागला :

निवृत्ती–

**कसे वर्णु मी काय जाहले ।**
**गुरुंचे अनुग्रह मज लाभले ।।धृ।।**

अता आठवे घडले जे ते ।
ब्रह्मगिरीच्या प्रदक्षिणाते ।
परवा असता मध्य रात्रीते ।
मार्गी व्याघ्र राजऽ आले ।।१।।

डरकाळीला देता त्यांनी ।
तुम्ही पळाले मजला सोडुनी ।
ज्वलंत बघता त्यांच्या नयनी ।
भानची सारे मम हरले ।।२।।

व्याघ्रराज मज आले जवळी ।
पदा हुंगले रीत आगळी ।
पटली ओळख त्यांना सगळी ।
ते पुढे वन मार्गी लागले ।।३।।

भुरळी पडता असाच मागे ।
गेलो विसरुन त्यांच्या संगे ।
अतिशय अवघड अरुंद मार्गे ।
जयाला संते भूषविले ।।४।।

काय सांगु मी तिथली महती ।
सुगंध घुमला प्रपात वरती ।
वाटे चालत जणू आरती ।
ऐकण्या देव सर्व जमले ।।५।।

पुढे आणखी दिसले जाता ।
गुहा द्वार ते अशी रम्यता ।
निर्गुण शक्ती मला ओढिता ।
माझे पायऽ पुढे चालले ।।६।।

ग्रंथ संग्रहालय
2369
22592
शाखा

दिसले "गहिनीनाथ" परात्पर ।
धूनी जवळी मृगाजिनावर ।
वज्रासनि श्रीसद्गुरु सागर ।
मुखावर दिव्य तेजऽ भरले ॥७॥

जाणिव त्यांना अंतर्ज्ञाने ।
होता माझी अस्तित्वाने ।
उघडलि त्यांनी ज्वलंत नयने ।
मजला नेत्रभरे पाहिले ॥८॥

वज्रासनि ते अधांतरीच ।
बसले भूमीपासुनी उंच ।
दृष्टीमधुनी तेज दीपचऽ ।
ऐसे, प्रज्वलीत गमले ॥९॥

पुत्रा येरे भेटीस्तव मी ।
वाट पहातो मानव जन्मी ।
याच कारणे मजला स्वामी ।
सद्गुरु मत्सिद्रे ठेविले ॥१०॥

आले आसन गुरुचे भूवर ।
उभे राहिले पुण्य पदावर ।
आलिंगनि मज प्रेमे सत्वर ।
स्व दक्षिण बाहूने घेतले ॥११॥

मम शीरावर ठेवुनी हस्तऽ ।
मंत्रामाजी मी ध्यानस्थ ।
नयन उघडिता समोर अस्तऽ ।
होता सूर्य देवऽ दिसले ॥१२॥

'सद्गुरु देव दत्त' म्हणूनी ।
जाऊ लागले सद्गुरु गहिनी ।
धन्य जाहलो दृश्य पाहुनी ।
किरणपथे अंबरि तें गेले ॥१३॥

भारलो असा सांगु मी कसे ।
वर्णन करण्या वच ना गवसे ।
हृदयामाजी तृप्ती विलसे ।
जीवनी सौख्य असे आले ॥१४॥

卐 卐 卐

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा

विठ्ठलपंत आणि ज्ञानदेव दोघांनीही त्याला सांभाळून त्र्यंबकेश्वर मंदिरात मुक्कामावर आणले. त्याला पाहाताच माय रुक्मिणीने गहिवरून त्याला पोटाशी धरले. तिच्या नयनावाटे अश्रुपूर वाहू लागला. धाकटा सोपान व मुक्ता त्याच्या भोवती फेरे घालून नाचू लागले. दुसरे दिवशीच मुलगा परत येण्याकारणे, सुरू केलेल्या व्रतांची विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांनी, षोडषोपचारे पूजा अर्चा करून, समाप्ती केली. आणखी काही दिवस तिथेच राहून, एक दिवस ते सर्व परत आळंदी मार्गाला लागले. प्रवासात ज्ञानदेव निवृत्तीचे मागे मागे सावलीप्रमाणे रहात होता, त्याची काळजी घेत होता. त्याला जाणीव झाली होती की निवृत्तीनाथाकडे आता लक्ष पुरविले पाहिजे. निवृत्ती बसायला लागला की ज्ञानदेव ती जागा साफ करी. तो पहुडायला लागला की त्याचे शीराखाली उशीप्रमाणे आपली मांडी देई.

एकदाचे ते कुटुंब इंद्रायणीकाठी आळंदीला येऊन पोहोचले. कुटीवर जाताच दिसले की, कुटी मोडतोड झाली. तिथे लक्ष्मी नाही की उमाबाई नाही. सर्वांना तिथेच ठेऊन विठ्ठलपंत गांवात गेले त्यांना समजले की, उमाबाईंना स्वर्गवास झाला. लक्ष्मी आपले घरी कुंभारवाड्यात अंथरुणावर खिळून पडली होती. विठ्ठलपंतांना पहाताच तिला भरून आले, आणि उमाबाईच्या आजारपणाची आणि नंतर स्वर्गवासाची हकिकत तिने रडत रडतच विठ्ठलपंतांना सांगितली. ती ऐकून विठ्ठलपंत खिन्न झाले, पण धीराने म्हणाले, "लक्ष्मी चिंता करू नकोस. ईश्वरी इच्छा तसे झाले. सर्वत्र ठीक होईल. आपत्ती ह्या पूर्व संचिताप्रमाणे येतात आणि जातात. त्यांची खंत मानवाने करू नये." एवढे बोलून त्यांनी कुटीचा मार्ग धरला. तिथे येताच त्यांनी घडलेल्या गोष्टी रुक्मिणी आणि मुलांना सांगितल्या. मातृनिधनाच्या बातमीने रुक्मिणी व्यथित झाली. विठ्ठलपंत व मुले यांनी तिचे सांत्वन केले.

लगेच सर्व जण कुटी उभारण्याचे कामात दंग झाले. आता विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांच्या चार हातांच्या मदतीला आणखी आठ हात झाले होते. पहाता पहाता कुटी उभी झाली. त्यांचा संसार पुन्हा सुरू झाला. तोच नेहमीचा कार्यक्रम. चारही बालके मोठी मोठी होत होती व ज्ञान प्राप्त करून घेत होती. पण विठ्ठलपंत बेचैन होते. मुलांचे उपनयन संस्कार झाल्याशिवाय त्यांना ब्राह्मणत्व येणार नाही आणि आपण बहिष्कृत असल्यामुळे त्यांचे उपनयन करवून घेण्यास आळंदीचा ब्रह्मवृंद तयार होणार नाही, याचीही त्यांना पूर्ण कल्पना होती. पण ब्रह्मसभेपुढे जाऊन एक वेळा हा प्रश्न धर्मपंडितांपुढे ठेवण्याचा त्यांनी मनाशी निश्चय केला. गाव पाटलाला भेटून त्यांनी सर्व निवेदन केले. गांव पाटील त्यांना ह्या कामात सहयोग देण्यास तयार झाले. एक दिवस श्री सिद्धेश्वर मंदिराचे समोरील पटांगणांत ब्रह्मसभा भरली आणि विठ्ठलपंत अती नम्रतेनं हात जोडून समोर उभे झाले आणि आळंदीच्या ब्रह्मवृंदास मुलांच्या भविष्याची भिक्षा मागू लागले :

विठ्ठलपंत— **सभेपुढे मी आलो भावे पावन चरणातऽ।**
**संस्कारुनी आत्मज घ्यावे ब्राह्मण ज्ञातीत ऽ।**

संन्यासाला त्यागुन आलो।
संसारी मी पुनरपि झालो।
गुरु आज्ञेला पाळुन बसलो।
सत्य हे भूदेवा सांगतऽ॥१॥

गुरुवर्ये जे स्वये दाविले।
प्रायश्चित्तही पुरे घेतले।
पत्नीसह मी जरी भोगिले।
तरीही घडले विपरीत॥२॥

ग्रामण्याची क्रूर शिकार।
झालो तरि ना मनी विकार।
नाही माझा रोष कुणावर।
मानुनी हेच दैवदत्त॥३॥

संतति होणे ईश कृपाही।
बालक करिना पातक काही।
दंड तयांना न्याय्यच नाही।
लेख हा नीती शास्त्रात॥४॥

निर्दोषी मम बालक उजवा।
घेऊनी जवळि पंगति बसवा।
मजला आपण मार्ग दाखवा।
देव व्हा दीन कृपावंत॥५॥

आज उभा मी अपुल्या शरणी।
मागित भीक्षा,हीच अंगणी।
करा ब्रह्म त्या उपनयनांनी।
मी सदा अपुल्या आज्ञेत॥६॥

□ □ □

सद्गतीत अंतःकरणाने विठ्ठलपंतांनी, दोन्ही हात जोडून, उभ्यानेच ब्राह्मणसभेसमोर आपले निवेदन सादर केले, आणि "माझ्या दोन पुत्रांचे उपनयन संस्कार करवून त्यांना ब्राह्मण जातीत स्थान द्यावे", अशी सभेला विनंती केली. त्या ब्राह्मण सभेत गांवातील सर्वच ब्राह्मण उपस्थित होते. ग्राम उपाध्याय, मुदगलशास्त्री, हरीपंत, विसोबा चाटी हे प्रामुख्याने चर्चा करीत होते. विठ्ठलपंतांचे निवेदन ऐकून त्यांनी विचार विनिमय केला आणि शेवटी सर्वांचा एकमुखी निर्णय, ग्रामउपाध्याय विठ्ठलपंतांना सांगू लागले. विठ्ठलपंत, ब्रह्मवृंद मुखातून निघणारी ती वाणी अधिरतेने ऐकत होते, एक एक शब्द हृदयात साठवीत होते :

ग्राम उपाध्याय (संतापून) **काय सांगणे अता निराळे ! ।**
**तोंड तुझे कर पहिले काळे ।।धृ।।**

पाखंडी तू महा अधर्मी ।
पतीत केली अमुची भूमी ।
प्रजोत्पादनें, कां बर आम्ही ।
कराबि चित्ता, हेचना कळे ? ।।१।।

संन्यासातुन ग्रहस्थ झाला ।
महापाप हे धर्म भ्रष्टला ।
संतति झाली अशात युगुला ।
आम्ही व्हावे पापी कां बळे ? ।।२।।

असे कर्म नी वरति सांगतो ।
नीतीमत्ता न्याय शास्त्र तो ।
मूढासम का व्यर्थ बरळतो ।
श्रीमुख वदता का न ते जळे ? ।।३।।

तुजला नाही लाज थोडकी ।
अता सांगतो तेच परिसकी ।
इथुनी काळे मुख तू करकी ।
पाहू पुढती आम्ही सगळे ।।४।।

जा कोठेही नरकपुरीचा ।
मार्ग एकची तुज मरणाचा ।
विचार आम्ही करु पुत्रांचा ।
तुज मागे जे संयोग जुळे ।।५।।

卐 卐 卐

विठ्ठलपंतानी ऐकले. त्यांनी आपले जोडलेले दोनही हात वर उचलले आणि ब्रह्मवृंदाला वंदन करीत ते म्हणाले; "जशी भूदेवांची आज्ञा आपल्या तोंडातून निघणारी वाणी मी देवांचीच आज्ञा मानतो. तसेच होईल. मुलांना मात्र सांभाळून घ्यावे." पितृहृदयच ते. पुन्हा एकवार सभेला नमस्कार करून ते कुटीच्या मार्गाला लागले. घरी जाताच रुक्मिणीने अधिरतेने विचारले, "काय झाला निर्णय." ? "काळजी करू नकोस. सर्व ठीकच होईल." एवढेच उत्तर देऊन ते आपल्या नित्य कार्यक्रमाला लागले.

त्या दिवशी संध्याकाळी ते आपल्या चारही मुलांसोबत झाडावर सूर–पारंब्याचा खेळ खेळले. तो सर्व दिवसच त्यांनी खूप आनंदात घालविला. संध्याकाळी त्यांनी मुलांना संथा सांगितली. सुंदर सुंदर सुभाषितऽ सांगून मुलांना रमविले. काही हास्य विनोदही केले. रात्र झाली. "जा माझ्या बाळांनो, जा झोपा आता, रात्र झाली." असे म्हणत त्यांनी लहानग्या मुक्तेला खांद्यावर उचलूनच कुटीत आणले आणि तिच्या नेहमीच्या जागी झोपविले. सर्व झोपले. गाढ निद्रेत होते. मध्यरात्र झाली. विठ्ठलपंतांना झोप आलीच नाही. कारण का कोण जाणे, ज्ञानदेव त्या रात्री त्यांचे जवळच येऊन झोपला होता. ते उठले आणि हळूच त्यांनी रुक्मिणीला जागविले. तिला घेऊन ते कुटी बाहेर आले आणि तिथे तिला दिवसा सिद्धेश्वर मंदिरासमोरील पटांगणात झालेल्या ब्रह्मसभेचा वृतांत सांगितला, आणि म्हणाले, "रुक्मिणी पुत्रांचे भवितव्याकरिता मला हे केलेच पाहिजे. तू मागे राहून मुलांचा सांभाळ कर. सर्व ठीक होईल." रुक्मिणीला दाटून आले व ती बोलली, "नाथ जिथे तुम्ही तिथेच मी. सिद्धेश्वराला साक्ष ठेऊन आपण माळा टाकल्या होत्या एकमेकांच्या गळयात आणि बद्ध झालो होतो. आजही त्यांच्याच शिरावर हा भार टाकून, त्यांच्याच साक्षीने मी आपणासोबत येते. माझी मुक्ता आता मोठी झाली आहे. करील ती सांभाळ आपल्या तीन भावांचा." विठ्ठलपंताचा यावर काहीच इलाज चालला नाही. त्यांनी रुक्मिणीला अनुमती दिली. दोघांनीही त्याच क्षणी निघण्याची तयारी केली. चारही अपत्ये सुखनिद्रेत विसावली होती. मायबाप दोघेही त्यांना सोडून जात होते. काय होते आहे हे आकाशातील चंद्र व तारेच फक्त पाहात होते. देवच साक्षी होते त्या निस्पृह-योगी युगुलाच्या आत्मयज्ञ प्रयाणाला ः

निवेदक– **चार चिमुकल्या चिमण्या जीवा सोडुन निद्रांकितऽ।**
**देह विसर्जन करण्या जाती माय बाप दैवतऽ ॥धृ॥**

मुक्ताईचे घेऊन चुंबन सोपानाचे शिरी।
हस्ता ठेवित बघता छकुल्या हृदयी हो घावरी।
ममता अवचित जागृत होता पद झाले कंपित ॥१॥

नयनी सहजच अश्रू आले मातेच्या प्रेमळऽ।
विचलित होता कानी पडली गुरुवाणी मंजुळऽ।
"रुक्मिणि ओळख चार स्वर्गसुर हे मनु योनितऽ ॥२॥

चिंता त्यांची मुळि ना कर ते अवतारच ईश्वरी।
जग उद्धारा भूवर आले 'वैभव हे शांकरी'।
सोडी माया इहलोकीची धर पथ संयोजितऽ" ॥३॥

कानीं पडता अमृत वच हे धैर्ये मन भारलें।
शुभमंगल त्या सर्व चितुनी, पद पुढती टाकले।
अंगणि शिवलिंगाते वंदुनि, पतिदेवा साथितऽ ॥४॥

"चिरंजीव भव' वचना लिहिलें, शिवलिंगाचे पुढे।
सोनुल्याप्रती रांगोळीनें, आशिर्वचऽ एवढे।
इंद्रायणिचें तीर्थ प्राशिले, सिद्धेशा वंदितऽ ॥५॥

पतिपत्नी ते हस्ता धरुनी, मार्ग पुढे चालले।
प्रयागतीर्थी त्रिवेणीसंगम लक्ष्य मनी योजिलें।
'हव्य आत्मयज्ञाचे' दोघे, गत जीवन गुंफित ॥६॥

卐 卐 卐

पहाट झाली. निवृत्तीची झोप उघडली. त्याला मायबापाची दररोजप्रमाणे चाहूल लागली नाही. तो संभ्रमातच कुटीचे दार लोटून अंगणात आला. मायबापाचा पता नव्हता. तशाच स्थितीत शिवलिंगासमोर आला, "चिरंजीव भव" हे रांगोळीत शिवलिंगापुढे रेखाटलेले वाक्य वाचले आणि काय झाले ते त्याच्या लक्षात आले. ज्ञानदेवही कुटीबाहेर आला आणि निवृत्तीला पाहाता धांवतच त्याचेजवळ गेला आणि विचारू लागला, "दादा माय बाप दिसत नाही." निवृत्तीने त्याला आपल्या आलिंगनात घेतले आणि त्याचे पाठीवरून हात फिरवीत "ज्ञाना हे पहा" असे म्हणून शिवलिंगापुढे रांगोळीने रेखाटलेले "चिरंजीव भव", हे वाक्य दाखविले. तेवढ्यातच सोपाना आणि मुक्ताही उठून कुटीच्या बाहेर आले. त्या दोघांना आपल्या हृदयी लावीतच निवृत्ती म्हणाले, "ते दोघेही आपले कर्तव्य करून गेलेत. कुणीही रडायचे नाही. मायबापांनी दिलेला हा त्यागमय जीवनाचा पुण्य वारसा आता पुढे आपणाला चालवावयाचा आहे."

पळभरातच ती समंजस लेकरे शांत झालीत आणि आपल्या नित्याचे उद्योगाला लागलीत. रुक्मिणी मायच्या तालमीत वाढलेली लहानगी मुक्ताई एखाद्या सुग्रण गृहिणीप्रमाणे घरची कामे आटपायला लागली. ज्ञानदेव निवृत्ती आळीपाळीने माधुकरी मागायला जात आणि मुक्ताई आपल्या तिनही भावांना स्वयंपाक करून घाली.

त्यांचे माय बाप जरी धर्म मार्तंडाचे आज्ञेनुसार देह विसर्जनाला गेलेत, तरी त्या उघडे पडलेल्या लेकरावर सुद्धा ग्रामण्य चालूच राहिले. गावकीचा सारा कोप ती निष्पाप लेकरे मुकाट्याने सहन करीत होती. निवृत्ती व ज्ञानदेव माधुकरी मागण्याला जात, तर त्याच्या झोळीत शेण्या, चिंध्या, उतारे आणि इतर घाणेरड्या वस्तू टाकीत, पण त्या मुलांनी याबद्दल कधीच राग दाखविला नाही. ते म्हणत "ज्याचेजवळ जे आहे ते तो देतो. दात्याने दिल्यावर याचकाने ते आनंदानेच स्विकारले पाहिजे. त्याचा राग कशाला ?"

एक दिवस असाच ज्ञानदेव भिक्षेहून परत कुटीवर आला तो तांबडा लाल होऊनच. झोळी खाली टाकली आणि बिल्व वृक्षाखाली ध्यानस्थ बसलेल्या निवृत्तीला नमस्कार करून, रागातच कुटीत गेला आणि योगासन घालून आपले प्राण आकर्षण करीत बसला. निवृत्तीनाथ धांवतच मागे गेलेत पण तोपर्यंत ज्ञानदेवाने आतून ताटी लावून घेतली होती. निवृत्तीनी विचारले, "अरे ज्ञानदेवा काय झाले तुला आज एवढा कोप यायला ?

ज्ञानदेव आंतूनच त्यांना सांगू लागले :

ज्ञानदेव– **नका आड येऊ दादा क्लेश बहू जाहले ।**
**शल्य खोल मर्मावरती हृदय पुरे भंगले ।।धृ।।**

तुम्ही बंधु मजला तैसे सद्गुरू जगी ही ।
अंतरिचा आत्मा देह आज पदी वाही ।
पूज्य मायबापा माझ्या जने अती निंदिले ।।१।।

वृथा जरी छळले त्यांनी नसे केली खंत ।
धर्मदंड मानुनि केले देह विसर्जीत ।
त्यागमूर्ति ऐशा दोघा भ्रष्ट असे बोलले ।।२।।

कटू वचा नाही वदले कुणा ते कधी ही ।
ज्ञातिजने दिधलें दुःखा तरी क्रोध नाही ।
शांत योगि ऐश्या दोघा बळे पाप लाविले ।।३।।

भग्न होय माझे कर्ण जीव पाणी पाणी ।
निंदकांची भेदक ऐसी ऐकुनिया वाणी ।
व्यर्थ जन्म वाटे न्याया जिथे अम्हा वंचिले ।।४।।

क्षमा करा मजसी आता त्यागणेच प्राणऽ ।
मातपिता निंदा भरले असे शब्द बाणऽ ।
ऐकणे न पुढती एक हेचि मनी योजिले ।।५।।

卐 卐 卐

याप्रमाणे ज्ञानदेवाने आपली यातना निवृत्तीला सांगितली आणि आसनस्थ स्थितीतच आपले प्राण आकर्षण करीत बसला. निवृत्तीने त्याला खूप समजाविले पण तो काही ऐकेना. लक्ष्मी आली तिनेही पुष्कळ समजाविले, विनविण्या केल्यात, पण ज्ञानदेव आपला निश्चय सोडीना. शेवटी लक्ष्मीने मधली ताटी तोडावी असे सुचविले. पण ताटी तोडण्याचे नांव काढताच, लहानगी मुक्ता ताटीशी आली आणि म्हणाली, "नाहीगे आत्या हे, दार मायबापांनी लावले आहे. ते तोडायचे नाही. थांबा मीच ज्ञानदेवाला समजाविते. माझे तो नक्कीच ऐकेल." आणि एवढे बोलून ती आपल्या गोड आवाजात ज्ञानदादाला सादवू लागली, "अरे ज्ञानदादा विसरलास काय मायचे शब्द ? ती म्हणाली होती, की ही सारी लेकरे तुझ्याच पदरात घातली आहेत. मग आम्हाला असेच वणव्यात सोडून जाणार काय ? अरे ज्ञानदादा आपले घराणे नाथपंथी. आपण योगी आहोत. आपले मायबाप योगी. आपण असे रागावू नये. अरे जग जरी आपणाला जाळायला निघाले, तरी आपण पाणी होऊनच ती आग विझवावी. अरे तू ज्ञानी. आम्हास तू शिकवावे. जर तू स्वयेच असा वागलास तर मग आम्ही काय बरे करावे ?" अशा शब्दात त्याला विनविता मुक्ताईचे तोंडून स्वयंभू काव्यपंक्ती बाहेर येऊ लागल्या. ती आपल्या रसाळ अशा वाणीने ज्ञानदादाला विनवू लागली :

मुक्ताई– ॥ ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥धृ॥

योगी पावन मनाचा ।
साहे अपराध जनांचा ।
विश्व रागें झाले वन्ही ।
संती सुखे व्हावे पाणी ।
शब्द शस्त्रे झाले क्लेश ।
सं ी मानावा उपदेश ।
विश्वपट ब्रह्म दोरा ।
ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥१॥

अरे दादा तूच आम्हाला शिकवत होतास ना की, संत कोणास म्हणावे. ज्याचे अंगी दया व क्षमा आहे तोच खरा संत असे तुझेच म्हणणेना ? मग तुला अशी उलटी बुद्धी का बरे झाली ? अरे दादा तुझा उपदेश आम्ही वंद्य मानतो. मग तूच आज स्वतःचा तो उपदेश कसा अव्हेरीत आहेस ;

संत तोचीं जाणा जगी ।
दया क्षमा ज्याचे अंगी ।
वरी भगवा झाला नामे ।
अंतरी वश केला कामें ।
त्याला म्हणू नये साधू ।
जगी विटंबना बाधू ।
आप आपणा शोधून घ्यावे ।
विवेक नांदे त्याचे सवे ॥२॥

अरे दादा ! आपणास जर आपलाच हात लागला तर कुणी हात छाटून टाकला नाही. आपली जीभ जर दाताखाली आली तर कुणी आपली बत्तीशी पाडली आहे काय ? तर मग स्वतःला हे शासन का बरे देत आहेस ?

हात आपुला अपणा लागे ।
त्याचा करू नये खेद ।
जीभ दातांनी चाविली ।
कोणी बत्तिशी पाडिली ? ।
चणे खावे लोखंडाचे ।
मग ब्रह्म पदी नाचे ॥३॥

अरे ज्ञानदादा किती सांगावे तुला. अरे ही सर्व तुझीच तर शिकवण आहे आम्हाला. मग आता तुलाच हा असा उपदेश करावयाची पाळी तुझ्या लाडक्या मुक्तेवर यावी हे कसे ? अरे दादा मी तुझी लडिवाळ ना ? अरे तिच्यासाठी तरी स्वतः तरून सर्व विश्वाचाच उद्धार का बरे करीत नाही ?

शुद्ध ज्याचा भाव झाला ।
दुरी नाही देव त्याला ।
तेथे कवणे शिकवावे ।
सार काढुनिया घ्यावे ।
लडिवाळ मुक्ताबाई ।
जीव मुद्गल ठायीचे ठायी ।
आपण तरुनी विश्व तारा ।
ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥४॥

ती मग्न होऊन गात होती. आर्त स्वरात गात होती. तिचे करुण स्वर आसमंतात घुमू लागले. सर्व परिसरच करुणामय झाला. मुक्ताईच्या करूण आणि आर्त अशा सुरात निवृत्ती, सोपान आणि लक्ष्मी यांनीही आपले स्वर मिळविले होते. "आपण तरुनी विश्व तारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा" हे उच्चार सर्वांच्या तोंडून बाहेर पडत होते. आणि अशाच वातावरणात एकाएकी ज्ञानदेव ताटी उघडून बाहेर आला, एखाद्या सुसाट पवन लहरीसारखा. त्याने मुक्ताईला पोटाशी धरले. सर्वांच्याच डोळयातून आनंदाश्रू वाहू लागले. निवृत्ती डोळे मिटून उभे होते. ज्ञानदेवाने धावत जाऊन त्यांच्या पायाला मिठी मारली. दोनही बंधू एकमेकाच्या आलिंगनात बद्ध झाले. दु:खाची छाया मिटून गेली आणि सर्वच जण मग नाचत नाचत हरीनामाचा गजर करू लागले.

त्या दिवसापासून कुटीत एक दिव्य असे काव्य चैतन्य बहरू लागले. ज्ञानदेवाची प्रतिभा जागृत झाली. मुक्ताईचा गळा आणि स्फूर्ती दोनही खुलून गेलीत. ओव्या, अभंग, गीत यांची भाविक बरसात तिथे होऊ लागली. सर्वत्र वातावरण आनंदमय झाले. ह्या बालकांच्या दैनंदिन कार्यक्रमाची कीर्ती पंचक्रोशीत पसरू लागली. लोकांना त्या लेकराविषयी कुतुहल वाटू लागले. पण त्यांना मात्र त्याचे काहीच नव्हते. ते आपल्याच नित्यकर्मात मग्न होते. सर्व जणू स्थितप्रज्ञ असेच.

पौर्णिमेचा दिवस आला. चतुर्दशीचा चंद्र मावळत होता, तेव्हाच निवृत्तीनाथ जागे झाले झोपेतून आणि उठून बसले. त्यांनी इंद्रायणीवर जाऊन स्नान आटोपले आणि नेहमीप्रमाणे,अंगणातील विल्ववृक्षाखाली जाऊन ध्यानस्थ बसले.थोडया वेळाने त्यानी साद घातली, "बाळा ज्ञानदेवा स्नान उरकून लवकर इथे ये." ज्ञानदेव "जी" म्हणून उठला पण चकित झाला. आज सकाळीच दादांनी काय काम काढले या विचारातच तो इंद्रायणीवर गेला आणि स्नान करून परत आला. निवृत्तीनाथासमोर जाऊन त्याने त्यांना पदस्पर्श केला. सोपान आणि मुक्ता दोघेही तुळशीजवळ बसून कौतुकाने पहात होते आपल्या दोनही वडील भावाकडे.

निवृत्तीनाथ आपले आसन सोडून उभे राहिले. त्यांनी ज्ञानदेवाकडे स्नेहार्द्र आणि करुण अशा दृष्टीने पाहिले आणि मग आपल्या आलिंगनात बद्ध केले. हृदयाशी हृदय भिडले ।

निवेदक— ज्योतिस जैसी ज्योत लागता प्रकाश अंधारी ।
ज्ञानदेव जाहले आजला दिव्य शक्तिधारी ।।धृ।।

शिवशक्ती बिज असे अलौकिक ।
गुरू दत्तात्रय त्याचे धारक ।
आदिनाथ जे विश्व पालक ।
गुरुकृपे सिद्ध त्रिलोकांतरी ।।१।।

क्षीर सिंधुचे परिसरि शीवऽ ।
शक्ती महिमा अद्वय शांभव ।
उमा देवते विश्व वैभव ।
सांगती गूढ तत्व शांकरी ।।२।।

श्रवण साध्य त्या मत्स्याउदरी ।
शिरले विष्णूदेव सत्वरी ।
गर्भरुपाने श्रवले यापरी ।
अवतरे मत्सिंद्रच भूवरी ।।३।।

मत्स्येंद्रे ते गोरक्षासी ।
देऊनी केले नाथ तयासी ।
गोरखनाथे ते गहिनीसी ।
नाथ ही परंपरा सारी ।।४।।

गहिनींकृपेने निवृत्तीला ।
ज्ञान लाभले ब्रह्मगिरीला ।
ज्ञानदेव ते घेत आजला ।
अग्रज सद्‌गुरु अनुजांतरी ।।५।।

ज्ञानदेव गुरू पुढती आले ।
भक्तीभावे पदा वंदिले ।
आलिंगनि मग बद्ध जाहले ।
शिष्य तो गुरुचे सामोरी ।।६।

सद्‌गुरु हृदयातुनी निघाली ।
दिव्य चेतनाशक्ती तिथली ।
ज्ञाना हृदयी पूर्ण निमाली ।
ज्ञान तो तळपे अंतरी ॥७॥

अष्टसात्विक भाव प्रगटले ।
ब्रह्मानंदा हृदयी ठेविले ।
रोमांचित अती देह जहाले ।
रवीप्रभा तेज रोम रंध्री ॥८॥

निवृत्तीनें हस्ता धरुनी ।
त्यास बसविले सिद्ध आसनी ।
दक्षिण हस्ता शिरी ठेऊनी ।
केले अनुग्रही शिष्यापरी ॥९॥

अयमात्माऽ ब्रह्मऽ सांगती ।
ज्ञानाकर्णी गुरु निवृत्ती ।
ज्ञानदेव त्या स्वयेच वदती ।
भारुनी ज्ञान सुप्त संगरी ॥१०॥

हृदयी गुरुने हस्त ठेविता ।
ज्ञानोबा ये भान अवस्था ।
अंतर्बाह्यची दिसे उजळिता ।
प्रतिभा सरिता जिव्हाग्री ॥११॥

□ □ □

ज्ञानदेवाने नेत्र उघडले. अद्वितीय अशा प्रकाश वलयाने त्याचे मुखकमल सूर्यप्रकाशासारखे तळपत होते. मुखावरून दिव्य प्रकाश किरण बाहेर ओसरत होते. अपरंपार अशा योगसिद्धी प्राप्तीचे ते एक प्रतीकच झाले होते. त्याने हंसत-मुखाने सद्‌गुरू निवृत्तीनाथांना दंडवत घातले आणि स्वयंभू प्राप्त प्रतिभेतून उपजलेली ओवी त्याचे मुखाबाहेर आली. रसना काव्यरुपात उतरून वाहू लागली :

ज्ञानदेव–

अनुपम्य तेजे धवळले ब्रह्मांड ।
विश्वरुपी अखंड तदाकार ।
रसीरस मुरे प्रेमाचे स्फुंदन ।
एकरुपी घन हरी भासा ।
नाद आणि ज्योती परिपूर्ण आत्मा ।
परेसी परमात्मा उजेडला ।
झाला अरुणोदयो उजळले सूर्य तेज ।
त्याहुनी सतेज तेज आले ।
हरपल्या रश्मी देहभाव हरी ।
ऋद्धी सिद्धी कामारी झाल्या कैश्या ।
निवृत्ती उपदेश ज्ञानिया लाभला ।
तत्वी तत्व बोधला ज्ञानदेवो ।।

卐 卐 卐

निवृत्तीनाथांनी अनुग्रह देऊन ज्ञानदेवास पूर्णत्व दिले. त्या दिवसापासून ज्ञानदेव आत्मशक्तीधारी असा एक दिव्य तेजःपुंज सिद्धच झाला. त्याचे बोलण्यात, वागण्यात गांभीर्य आणि पक्वता दिसून येऊ लागली. ज्ञानदेवात झालेला बदल पाहून निवृत्तीनाथांना धन्यता वाटली. त्या छत्रहीन लेकरांचे कार्यक्रम पूर्ववत चालू होते. निवृत्ती व ज्ञानदेव माधुकरी मागायला गावात जात आणि लहानगी मुक्ताई घरची कामे सांभाळी. मायसारखीच ती गृहकृत्यदक्ष झाली होती.

एक दिवस सकाळीच निवृत्तीनाथांनी मुक्ताईला हाक मारली आणि म्हणाले, "मुक्ते, माय गेल्यापासून मांडे खायला मिळाले नाही. आज मांडे खाण्याची इच्छा झाली आहे, तरी मांडे कर आणि खाऊ घाल." ज्ञानदेवाने ही निवृत्तीनाथाची सूचना ऐकली आणि पुढे येऊन मुक्ताईला विचारले "कायग मुक्ते, घरात सर्व सामुग्री आहे की नाही मांडे करायला." मुक्ताई बोलली "अरे ज्ञानदादा घरात सर्व आहे पण फक्त परळच नाही. मी आताच गावात जाते आणि लक्ष्मी आत्याचे घरून परळ घेऊन येते पटकन." आणि परकर खोचून तुरुतुरु गावाकडे चालू लागली. कुभाराचे घराकडे जात असता तिला रस्त्यातच विसोवा चाटी भेटले. मुक्ताईला गांवात पाहाताच विसोबानी विचारले, "कायगे संन्याशाचे पोरी, भटकभवानी! कुठे निघालीस सकाळी सकाळी गांवात?" "निवृत्ती दादाला मांडे खायची इच्छा झाली आज. मांडे करायला परळ लागतोना! तो नाही म्हणून परळ नेण्यास आली मी." मुक्ताईने विसोबाला सांगितले आणि कुंभाराचे घरात शिरली. लक्ष्मीकडून तिने एक परळ घेतला आणि रस्त्यावर येऊन कुटीकडे चालू लागली. विसोबा तिची वाट पहातच उभे होते. मुक्ताईला पहाताच त्यांनी तिला अडविले आणि हातातील काठीने तिच्या हातातील परळावर एक दणका मारून ते फोडून टाकले. मुक्ताई अतिशय दुःखित झाली व रडू लागली. ती परत कुंभाराचे घरी गेली आणि घडलेली हकीकत लक्ष्मीला सांगितली. लक्ष्मीने तिचे सांत्वन केले आणि दुसरा परळ आणायला घरात गेली. तितक्यात विसोबा चाटी तिथे आले आणि हातातील काठीने लक्ष्मीच्या घरातील सर्वच परळ त्यांनी फोडून टाकले. लक्ष्मी बिचारी भीतीमुळे चूप राहिली. लहानगी मुक्ता हताश झाली आणि रित्या हातानेच कुटीकडे जाण्यास निघाली. आता काय होते ती गंमत पाहाण्याकरता विसोबा चाटीही तिच्या मागे मागे गुपचूप चालू लागले. मुक्ता कुटीवर आली आणि घडलेली सर्व हकीकत तिने निवृत्ती-ज्ञानदेवाला सांगितली. विसोबा कुणालाही न दिसता कुटीचे मागे गेले आणि एका फटीतून कुटीतील गंमत पाहू लागले :

**निवेदक–** **शिवशक्तीच्या अनुपम दिव्य साक्षात्कारातऽ ।**
**मांडे करण्या योगबळाने अग्नी पाठीतऽ ।। धृ ।।**

दुष्ट विसोबा परळ फोडिता ।
रडतचि परते दु:खित मुक्ता ।
कुटीत येउन सांगे वार्ता ।
आपुल्या बंधुस रुदनात ।।१।।

ज्ञानदेव अति कंपित झाले ।
मुक्ता लडिवाळेला छळले ।
पळभर योगी संभ्रमि पडले ।
बोलले निश्चयि वचनात ।।२।।

'करगे मुक्ते तयारि सर्व ।
मांडे खाण्या आजच पर्व ।
ऐसा घेण्या भोज अपूर्व ।
होउनी उभे ओणव्यात ।।३।।

योगसिद्धिचा प्रत्यय आला ।
पाठीचा तो परळचि झाला ।
उष्ण लाल जणु अग्नि चेतला ।
मांडे मुक्ताई शेकितऽ ।।४।।

मुक्ताबाई मांडे करते ।
दोन बंधुना स्वये वाढते ।
सोपानासह निवृत्तीते ।
जेवती मांडे तृप्तीत ।।५।।

म्हणती मांडें उत्तम झाले ।
तृप्तीने मन खाता भरले ।
वचनासी या जसे ऐकिले ।
विसोबा पाहे कुटिरात ।।६।।

दृष्य पाहता दृष्टी दिपली ।
कुटीत ईश्वर लीला भरली ।
दंभाची मग धुंद उतरली ।
जाहला दुष्टमती अन्तऽ ।।७।।

कुटीमागची जागा सोडुनी ।
आले धांवत पुढे अंगणी ।
पडले मुर्छित ज्ञानाचरणीं ।
म्हणे 'मी अज्ञ मतीभ्रष्ट' ।।८।।

卐 卐 卐

कुटीत होत असलेला चमत्कार पाहून विसोबा चाटी थक्क झाले. कर्मठ-पणाचा त्यांच्या मनात असलेला दंभ पुरता नाहिसा झाला. हा एक ईश्वरी चमत्कार आहे असे म्हणून ते धावतच कुटीमागून अंगणात आले आणि, "ज्ञानदेवा, अरे मी मूढ अज्ञानी आहे, मला क्षमा करा" असे म्हणतच ज्ञानदेवाचे चरणी पडले. ज्ञानदेवाने त्यांना मोठ्या प्रेमाने उभे केले आणि आपल्या आलिंगनात बद्ध केले. "भूदेव आपण व्युत्पन्न आहात. आम्ही आपली लेकरे आहोत, आपल्याविषयी आमच्या हृदयात प्रेम आहे, आदर आहे. मागचे सर्व विसरून जा आणि आम्हाला मार्गदर्शन करा. उपनयन संस्काराशिवाय ब्राह्मणत्व नाही असे बाप नेहमी म्हणत होते. त्यांनी याच काजा करता येथील ब्रह्मवृंदाची आज्ञा पाळून आपले देह विसर्जित केलेत. आम्ही उघडे पडलो या भूमीवर. आपण आता कृपा करून ज्ञातिबांधवांना सांगून येवढे करवून घ्यावे आमचे." अशा शब्दांत ज्ञानदेव विसोबांना विनविते झाले.

विसोबांनी सर्व ऐकले आणि ते म्हणाले, "बाळांनो, तुम्ही तर स्वयेच पूर्ण द्विज आहात. तुम्हाला उपनयन संस्काराची जरूरीच नाही. पण ब्रह्मधर्म रूढी-प्रमाणे उपनयन संस्कार झाल्याशिवाय समाज तुम्हाला ब्राह्मण म्हणून मान्यता देणार नाही."

"आळंदीचा ब्रह्मवृंद धर्मनीती शास्त्रात एवढा प्रविण नाही. ही समस्या सोडवून तुम्हाला मुक्त करून घेण्याची पात्रता व तसा अधिकार येथील ब्राह्मणांना नाही. ते या बाबतीत काहीच करणार नाहीत हे मला माहीत आहे. म्हणून मी त्यांची मने वळविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे पालथ्या घागरीवर पाणी ओतल्यासारखे होईल. मी तुम्हाला एक मार्ग दाखवितो. त्या मार्गाने तुम्ही जा. तुमचे कल्याण होईल. तुम्ही सर्वजण प्रतिष्ठाण नगरीला जा आणि तुमची समस्या तेथील ब्रह्मसभेपुढे ठेवा. ती ब्रह्मसभा तुम्हाला खचितच पावन करून घेईल असा मला विश्वास आहे."

विसोबा– तुम्ही जा पैठण नगरीला ॥ धृ ॥

तुम्ही तपस्वी श्रेष्ठ भूवरी ।
किंकर आम्ही मूढ यापरी ।
नाहि पाहिले सत्य जोवरी ।
पाळले ज्ञाति बंधनाला ॥१॥

एक सांगणे तुम्हास आज ।
जावे आपण सर्व आत्मज ।
पैठण नगरी घेउनि काज ।
मिळविणे धर्म निर्णयाला ॥२॥

आळंदीचे आम्ही ब्राह्मण ।
नाही आम्हा इतुके ज्ञान ।
करण्या तुम्हा ज्ञातिसमान ।
प्रश्न हा कठीण या घटिला ॥३॥

ब्रह्मवृंद ते प्रतिष्ठानिचे ।
महान ज्ञानी धर्मनीतिचे ।
अधिकारी जे बोलुन वाचे ।
तोडिल अवघड ही शृंखला ॥४॥

वाट पाहीन तोवर येथे ।
परतुनि यावे यशमालाते ।
गळा घालुनी आळंदीते ।
मोदे येऊ स्वागताला ॥५॥

卐 卐 卐

विसोबांनी त्यांना सुचविले. "तुम्ही सर्व पैठणला जा, तेथील ब्रह्मवृंदसभेपुढे उभे व्हा आणि त्यांना तुमच्या भविष्याबाबत निर्णय मागा. त्यांना हेही सांगा की, आळंदीचा ब्रह्मवृंद इतकी कठीण समस्या सोडवून त्यावर निर्णय देण्याप्रत स्वत:ला समर्थ समजत नाही, म्हणून त्यांनीच आम्हाला तुमचे पुढे पाठविले आणि त्याप्रमाणे आम्ही आलो. जा, तुमच्या उज्वळ भविष्यासाठी माझी ईश्वरास प्रार्थना आहे." विसोबा एवढे बोलले व डोळयात अश्रू आणून त्यांनी दोघांनाही नमस्कार केला आणि गावच्या वाटेला लागले.

थोडा विचार करून निवृत्ती, ज्ञानदेवास म्हणाले, "अरे ज्ञानोबा कशाला आपणास उपनयनाची जरूरी आहे ? एवढा खटाटोप कशासाठी करायचा ? आम्हाला जात नाही. आपणाकरता कुळ, वर्ण, अधिकार वगैरे काहीच अस्तित्वात नाही. आपण ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र यापैकी काहीच नाही. तसेच देव, दैत्य, यक्ष, किन्नर, ऋषी वगैरे कशातच आपली गणना होत नाही. असे जर आहे तर मग पैठणला जाऊन ब्रह्मवृंदासमोर उभे राहाणे ते कशाकरता ? आपण अविनाशी, अव्यक्त, निरंजन. सदाकरता आपण येथेच राहाणार." असे गंभीरपणे बोलून ते उठले आणि अंगणात औदुंबराखाली जाऊन आसनस्थ झाले. त्यांचे ध्यान सुरू झाले तिथे नेहमीप्रमाणे.

ज्ञानदेव त्यांचे मागे मागे गेला. सत्‌गुरू निवृत्तीनाथाच्या चरणांना स्पर्श करून त्याने वंदन केले आणि भावपूर्ण गंभीर वाणीत त्यांना विनवू लागले :

ज्ञानदेव– **देवचि आपण निर्मळ निखळ निश्चल सुखसागरऽ ।**
**अद्वितीय हो सद्‌गुरुनाथा आम्ही अज्ञ फारऽ ॥धृ॥**

नाहि बोलणे स्तुती आपली ।
काहि न करणे पूजा इथली ।
मौनाविण ना वाचे बदली ।
तुम्ही हो एक निरंकारऽ ॥१॥

मर्यादेला घालुनि द्यावे ।
पुढच्यासाठी सुकृत भावे ।
इष्टफलाप्रति योग्य करावे ।
जीवनी धर्म पथाचेवरऽ ॥२॥

आम्हासंगे यावे आपण ।
स्वयेचि बंधू नगरी पैठण ।
ज्ञानी तिथले देव ब्राम्हण ।
आपुला करतिल उद्धारऽ ॥३॥

तुमचे माझे तारू तरले ।
मुक्ता सोपानास्तव बोले ।
दोघे ते तर अती धाकुले ।
लावणे त्यांना मार्गावरऽ ॥४॥

म्हणू नये हे पुढती त्यांनी ।
अग्रज कर्तव्याला त्यागुनी ।
गेले रस्त्यावरती सोडुनी ।
बोल हा येणे आपणावर ॥५॥

उद्या सकाळी वेळा मंगल ।
पैठण मार्गी जाण्या सकलऽ ।
भविष्य उदरी जीवन सफलऽ ।
करविण्या सन्माने पारऽ ॥६॥

卐 卐 卐

ज्ञानदेवाने विनवून निवृत्तीनाथाना सांगितले आणि त्यांचे पाय धरले. निवृत्तीने आपले नेत्र उघडले. अतिशय स्नेहार्द दृष्टीने ज्ञानदेवाकडे पाहून ते म्हणाले, "ज्ञानदेवा तुझी इच्छाच आहे तर ठीक आहे. मी तुम्हासवे येतो. आपण उदईक प्रात:काळी पैठणला जाण्यास निघू, पण एक गोष्ट मात्र ध्यानात असू दे की, यापुढे आमचा सर्वांचा पुढारी तूच. तू जे मार्गदर्शन करशील त्याप्रमाणे आम्ही वागू. आता झाले तुझे समाधान! निवृत्तीनाथ मंद हंसले आणि ज्ञानदेवाचे पाठीवर हात ठेविला. दुसऱ्या दिवशी सकाळी पैठणला जाण्याची तयारी सुरू झाली.

अगदी पहाटेला चारही भावंड उठलीत. प्रात:स्नानादी कर्मे आटोपून शुचिर्भूत झालीत आणि "रामकृष्ण हरी" म्हणतच पाय पैठणचे मार्गाला लागले.

रस्त्यात इंद्रायणी भीमा संगमावर आले. इंद्रायणी–भीमा संगमावर येऊन सर्वांसोबत स्नान करण्याची बापाची इच्छा होती, ही गोष्ट ज्ञानदेवाला आठवली. भावपूर्ण हृदयाने, निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ता यांनी संगमाकडे पाहात हात जोडले. त्या स्थितितच ज्ञानदेवाचे मुखातून स्वयंस्फूर्त काव्य-पंक्ती बाहेर पडल्या. ज्ञानदेव म्हणू लागले. निवृत्तीनाथ सोपान व मुक्ता ऐकत होते :

"देवाचिया दारी उभा क्षणभरी ।
तेणे मुक्ती चारी साधियल्या ।।
हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा ।
पुण्याची गणना कोण करी ।।
असोनि संसारी जिव्हे वेगुधरी ।
वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ।।
ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणे ।
द्वारिकेचे राणे पांडवाघरी ।।"

ज्ञानदेवाचे म्हणणे संपले. मुक्ता म्हणाली "अरे ज्ञानदादा, आता काय म्हणत होतास ? बहू सुलभ आहे ते. पुन्हा एकदा म्हण की." ज्ञानदेव पुन्हा म्हणू लागला. मुक्ता आणि सोपान ऐकतानाच कंठस्थ करून घेत होते. याप्रमाणे प्रतिदिन मार्गी चालता चालता ज्ञानदेवाने एक एक कवन रचावे आणि मुक्ता सोपानाने ते म्हणावे व कंठस्थ करावे. याप्रमाणे ती लेकरं मोठ्या आनंदात आपला मार्ग आक्रमित होती, पुढे पुढे जात होती. सत्तावीस दिवसाच्या

प्रवासात सत्तावीस अभंगाची एक माला तयार झाली. त्या मालिकेस ज्ञानदेवाने 'हरीपाठ' असे नांव दिले. सोपान आणि मुक्ता दोघांनीही तो 'हरीपाठ' तोंडपाठ म्हणून दाखविला.

सत्ताविसाव्या दिनाअंती ते गोदावरी काठी पोहोचले. नदीत त्यांनी स्नाने केली आणि नदी पार करून पैठण नगरीत पाय टाकले. पैठण हे जुन्या काळापासून नांदत असलेले शहर. मोठमोठे वाडे, देऊळऽ पाहात पाहात ती लेकरं आपल्या वडिलांच्या मामाचे, म्हणजेच देवकुळयांचे वाडयासमोर आली. दारात उभे राहून समोर कुणी दिसते काय म्हणून पाहू लागली. लहान लहान, गोजिरवाणी अशी सुंदर लेकरे पाहून देवकुळचांचे शेजारी पाजारी तसेच रस्त्यावरून जाणारे येणारे कुतुहलाने उभे राहिले "आजी, अहो आजी" म्हणून वाडयात समोरच दिसलेल्या एका बाईला हाक मारली ज्ञानदेवाने. त्या देवकुळे बाईच होत्या. त्या दाराशी आल्या व तेथील गडबड पाहून त्या लहान लेकरांना विचारू लागल्या. तेवढयात देवकुळेही घरातून दारात आले. त्या मुलांना बघून त्यांनी विचारले, "बाळांनो तुम्ही कोण आहात आणि तुम्हाला काय पाहिजे ?"

ऐकून ज्ञानदेव पुढे झाला आणि सांगू लागला ।

ज्ञानदेव- आपुलेच पौत्र आम्ही दैवगती ऐसी ।
ब्रम्हसभेपुढती आलो धर्म निर्णयासी ।।धृ।।

हे निवृत्ती माझे अग्रज ।
तसेच सद्‌गुरु आहेती मज ।
मुक्ता सोपाना हे अनुज ।
नाम हे ज्ञानदेव मजसी ।।१।।

विठ्ठलपंतऽ पिता आमुचे ।
सत्‌शिल पालक धर्मनीतिचे ।
करिता पालन ब्रम्हाज्ञेचे ।
त्यागुनी गेले आम्हासी ।।२।।

ग्रामण्याची कठोर दाहक ।
शिक्षा दिधली त्यांना नाहक ।
क्रोध मोह ना होता ठाऊक ।
भोगिले अगणित कष्टासी ।।३।।

आळंदीच्या ब्रम्हजनांनी ।
येथे येण्या अम्हा सांगुनी ।
ब्रम्हसभेच्या पुढती होऊनी ।
मागण्या भविष्य आज्ञेसी ।।४।।

याच कारणे आलो येथे ।
ताताकडुनी कळले होते ।
हेचि मातुल गृह आम्हाते ।
तरी द्या आशिर्वचनासी ।।५।।

आम्हास्तव ना ताप तुम्हाला ।
वाटे होणे हेचि मनाला ।
विपरित ऐश्या गूढ क्षणाला ।
करावे मार्ग दर्शनासी ।।६।।

卐 卐 卐

ज्ञानदेवाने देवकुळे व त्यांच्या पत्नी यांना आपण कोण आणि कशाकरता पैठणला आलोत हे सांगितले "अग बाई! ही तर तुमच्या बहिणीची नातवंड. अहो त्यांना आत यायला सांगाना," सौ. देवकुळे यांनी अगत्येने आपल्या पतीला सांगितले. स्वत: देवकुळे मात्र संभ्रमात पडले. "अहो घाई करू नका. जरा घरात चला. ही मुले ग्रामण्याखाली टाकलेली आहेत आळंदीकर ब्राम्हणांनी. मला तुमच्याशी सविस्तर बोलले पाहिजे" असे म्हणून देवकुळे घरात गेले व सौ. देवकुळेही त्यांचे मागे गेल्यात. ती चारही लेकरं काय उत्तर मिळणार या विवंचनेत दारातच उभी होती आणि भोवती बघ्यांची गर्दी जमली होती. थोडयाच वेळात देवकुळे कुटुंब घरातून बाहेर आले आणि, "या बाळांनो आत या घरात, इथेच आमचे घरीच मुक्काम करा," असे म्हणत देवकुळे बाईंनी चिमुकल्या मुक्ताईला स्वत:च उचलून घेतले. सर्वजण आत गेलेत. त्यांना राहाण्याला देवकुळचांनी एक स्वतंत्र खोली दिली. सर्वांनी आपल्या आजी व आजोबा यांना नमस्कार केले.

तेवढयातच देवकुळयाकडे गिरीपंडीत आले. त्यांना देवकुळचांनी त्या मुलांच्या विषयी संपूर्ण माहिती सांगितली आणि त्यांच्या पैठणला येण्याच्या उद्देशाबाबत कल्पना दिली. गिरीपंडीतांना ऐकून ते मुलाविषयी कौतुकही वाटले आणि त्यांची दया पण आली. ते म्हणाले, "आजपासून चवथ्या दिवशी पौर्णिमा आहे. त्या दिवशी प्रतिष्ठाणेश्वर मंदिराचे सभामंडपी ब्रह्मसभा बसणार आहे. त्या सभेपुढे ठेवू हा प्रश्न आपण. आपण काळजी करू नका. मी स्वत:च त्याची पूर्वतयारी करतो. मुलांनो तुम्ही चिंता करू नका. ईश्वर सर्व काही ठीक करून घेईल," असे सांत्वनपर बोलून ते निघून गेलेत. त्यांनी ताबडतोब इतर प्रतिष्ठित ब्राम्हणांच्या भेटी घेतल्या आणि त्या लेकरांची समस्या सर्वांच्या कानावर घातली आणि त्यांना मदतीची याचना केली.

चार दिवसात ती लेकर पैठणकरांच्या कौतुकाचा आणि चर्चेचा विषय झाली. त्या बालकांचे नित्य कार्यक्रम चालू होते. तिकडे देवकुळे आजोबा, गिरीपंडीत आणि इतर सहानुभूती असलेल्या ब्रह्मवृंदाच्या मदतीने, त्या समस्येवर उपाय शोधत होते. चर्चा करीत होते. आधार चाचपडत होते :

निवेदक– **ब्रह्मजनांची वाणी सुचवी सूर निराशेचा ।**
**काय दैव हे कुठे दिसेना किरणहि आशेचा ।।धृ।।**

संतति होणे संन्याश्याला ।
अन्य दुजे यासम भूमीला ।
नाही घडले कली युगाला ।
शास्त्रांतरि ना लेख समस्येचा ।।१।।

ब्राम्हण येती दिसती दुःखी ।
म्हणे प्रश्न ना कवण्या लेखी ।
मार्ग यावरी नसे पुस्तकी ।
खेळ हा विपरित दैवाचा ।।२।।

पोथ्या ग्रंथ अगणित आले ।
गिरिपंडित त्या वाचुन थकले ।
निराश होता परत धाडिले ।
त्यात ना शब्द निर्णयाचा ।।३।।

मनुस्मृति प्रायश्चितेंदुशेखर ।
यमस्मृति अन् वृद्धपराशर ।
धर्मशास्त्र संवर्त मिताक्षर ।
भार हो सर्वेचि ग्रंथांचा ।।४।।

कुणी दयाळू वृद्ध आगळे ।
बघता त्यांना बहू हळहळे ।
म्हणती मिथ्या यांस जे छळे ।
घेत ते शाप बालकांचा ।।५।।

किती जनांची सहानुभूती ।
पुष्पासम त्या बालकाप्रती ।
सुंदर गोंडस लेकुरें किती ।
परी हा पेला मदिरेचा ।।६।।

卐 卐 卐

अशी उलट सुलट चालणारी चर्चा ती लेकरें ऐकीत. निवृत्ती तर आधीच उदासीन. मुक्ताई सोपानाला दु:ख होई आणि विरक्ती वाटे. पण ज्ञानदेव मात्र निश्चयाचा मेरू ऐसा दिसे. गिरीपंडीत म्हणत, "बाळांनो धीर सोडू नका. ईश्वरी लीला अगाध आहे. कोण जाणे, वेळेवर काही आश्चर्य घडेल व तुम्हाला न्याय मिळेल." ऐकून मुलांनाही धीर येई.

गिरीपंडीतांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. ते काही धर्ममार्तंडांची सहानुभूती त्या बालकाप्रती मिळविण्यास यशस्वी झाले होते. संन्यासातून गृहस्थाश्रमात आल्याचे आणि नंतर संतती झाल्याचे उदाहरणच जिथे घडले नव्हते तिथे धर्मग्रंथात त्यावर उपाय कसा असणार ?

पौर्णिमेचा दिवस उजाडला. पैठणेश्वर मंदीर सभामंडपात ब्रह्मसभा होती. चारही बालके प्रात:काळीच उठली. त्यांनी प्रातर्विधी, स्नानादी नित्यकर्मे आटोपली आणि ब्रह्मसभेपुढे जाण्याच्या तयारीत बसले. ठराविक वेळी गिरीपंडीत आले. मुलांनी त्यांना व आजोबा आजी आणि इतर वडील मंडळी यांना साष्टांग नमस्कार केलेत. गिरीपंडीत पुढे निघाले व त्यांचे मागे ती बालकेही चालू लागली. देवकुळयांच्या वाडयापासून पैठणेश्वर मंदीरापर्यंत रस्त्यावर दोन्ही बाजूला लोक त्या बालकांना पाहाण्यास उत्सुकतेने उभे राहिले होते आणि पाहून त्या बालकाचा छळ करणाऱ्या धर्ममार्तंडांना शिव्या शाप देत होते.

गिरीपंडिताचे मागे मागे ती बालके अंती पैठणेश्वर मंदिराचे महाद्वारावर पोहोचली. तिथे एवढी भीड होती की आत प्रवेश करणेही कठीण झाले होते. गिरीपंडीतानी महाप्रयासाने लोकांना बाजूला केले आणि मुलाना घेऊन ते सभामंडपात गेले. ती चारही मुले जिथे बायामंडळी बसल्या होत्या त्या भागात जाऊन उभे राहिले.

सभामंडपात उच्चासनावर ज्ञानी व व्युत्पन्न अशा ब्रह्मवृंदाचा मेळावा तक्के आणि लोड यांना टेकून आरामात बसला होता. सर्वांच्या डोईवर पगडया, भालप्रदेशी गंध, कानामध्ये पाणीदार मोत्यांच्या भिकबाळया, अंगावर उंची वस्त्रे, अशी त्यांची वेषभूषा होती. सर्व गंभीर दिसत होते. ती लेकरे सभामंडपात येऊन उभी होताच, सर्वांचेच लक्ष त्यांच्यावर स्थिर झाले. त्यांची गोरी गोमटी कांती, मुखावरील दिव्य असे तेज, अंगावरील मोजकीच योग्याप्रमाणे वस्त्रे आदि पाहून प्रत्येकाला त्या मुलाविषयी कुतुहल निर्माण झाले होते. काही त्यांना पाहून गहिवरत होते, हळहळत होते. सर्वच वातावरण त्या बालकाप्रती सहानुभूतीचे दिसत होते.

प्राथमिक षोडशोपचार झालेत आणि ब्रम्हसभेचे कामकाज सुरू झाले, तसेच गिरीपंडीत हात जोडून उभे झाले. ब्रह्मवृंदाना त्यांनी मोठ्या लीनतेने अभिवादन करून अत्यंत उच्च अशा सन्मानदर्शक वचनात त्यांना संबोधून म्हणाले, 'श्रूयतां तावत्:'

गिरीपंडीत– व्युत्पन्नांचा हा मेळावा ज्ञानी कीर्तिचा ।
न्याय करावा आपण येथे मानविजीवांचा ।।

तुमचे पुढती चार अर्भके ।
कोमल ऐसे कळी सारखे ।
श्रीमुख त्यांचे तेजे चमके ।
दोष परि विपरित भाग्याचा ।।१।।

काय म्हणावे 'वंध्यापुत्र'ऽ ।
शशशृंग की नभास पत्रऽ ।
उभ्या ऊपमा समोर चित्रऽ ।
सुचेना शब्द योग्यतेचा ।।२।।

अल्पवयाचे हे निर्दोषी ।
चारही बालक जणू तापसी ।
अनुपम ज्ञानी ठावे मजसी ।
सोडवा प्रश्न भविष्याचा ।।३।।

जीव कोवळें चालत आले ।
दिन सत्ताविस कष्ट सोशिले ।
भविष्य निर्णय मनी इच्छिले ।
शब्द ह्या न्याय देवतेचा ।।४।।

आज प्रश्न हा नवीन पुढती ।
संन्याश्याची अशी संतती ।
अद्भुत यासम लेख न ग्रंथी ।
दया हो, बिंदु न्यायाचा ।।५।।

卐 卐 卐

गिरीपंडीत अशा वचनात कथन करून त्या लेकरांची बाजू ब्रह्मवृंदसभे-पुढे मांडू लागले. पण त्यांचे कथन पूर्ण होण्यापूर्वीच एक वयस्क सभासद उठून उभे झाले आणि गिरी पंडीतांना उद्देशून म्हणाले.

"अहो प्रत्यक्ष जे डोळ्यासमोर दिसत आहे त्याला उपमा, दृष्टांत आणि अलंकार यांनी सुशोभित करून व्यर्थ वेळ का वाया दवडत आहात ? मूळ प्रश्न काय आहे आणि सभेकडून काय पाहिजे, तेवढे मुद्याचे बोलाना."

हे तिखट वक्तव्य ऐकून गिरीपंडीत जरा गडबडले. त्यांच्या तोंडून स्पष्ट शब्द निघू शकेना. ज्ञानदेवाने ही परिस्थितीं पाहिली आणि एकदम थोडे पुढे येऊन गिरीपंडितांना म्हणाला, "भूदेव आपण कृपा करून बसावे. आमचा प्रश्न मी स्वयेच मांडतो ब्रह्मसभेपुढे, जर मला तशी अनुज्ञा मिळाली तर."

एवढे बोलून ज्ञानदेव एकदा चौफेर नजर फिरवून उपस्थित ब्रह्मवृंदाकडे पाहू लागला. सभेतील मंडळींनी "हूं" असे म्हणून ज्ञानदेवाचे विनंतीला संमती दर्शविली. ज्ञानदेव थोडा पुढे झाला आणि उपस्थितांना दोन्ही हात जोडून त्याने वंदन केले. ब्रह्मवृंद सभा एकदम शांत आणि गंभीर झाली. ज्ञानदेव अती नम्र, रसाळ आणिं भावपूर्ण अशा शब्दांत सांगू लागला. तो खळखळ वाहणाऱ्या सरितेपणाने बोलत होता आणि सभा अती शांत आणि गंभीरतेने त्याचेकडे कौतुकाने पहात, त्याच्या तोंडून निघणारी वाणी ऐकत होती.

ज्ञानदेव– **अन्यायाचे झालो आम्ही पारध या भूवरी ।**
**ऐका देवा म्हणुनी आलो न्यायाचे मंदिरी ।।धृ।।**

तात आमुचे संन्यासाला ।
त्यागुन आले परत गृहाला ।
मानित सद्गुरुच्रे आज्ञेला ।
स्वेच्छा तिळही ना अंतरी ।।१।।

कृच्छे चांद्रायणे दोनही ।
प्रायश्चित्त घे मायसवेही ।
धर्मवाह्य ना गेले कधिही ।
नीतिचे पालन ऐसे जरी ।।२।।

तरिही स्वजने वहिष्कारिले ।
क्रौर्ये त्या वनवासी केले ।
दाहक ते ही असे भोगिले ।
ठेविना पाउल बाहेरी ।।३।।

असे धर्मभिरु अमुचे तात ।
दु:खित अमुच्या व्रतबंधाप्रत ।
म्हणता वालक मम निष्पाप ।
विनविले ब्रह्मवृंद यापरी ।।४।।

हस्ता जोडुनी अश्रु ढाळले ।
उपनयनास्तव बहू विनविले ।
तरिही नाही ब्राह्मण द्रवले ।
ठेविला निर्णय दृढ आसुरी ।।५।।

वदले "कर तू काळे अपुले ।
श्रीमुख येथुन पाहू उरले ।
पुत्रांचे तव जैसे सुचले" ।
पाळिले आज्ञेला सत्वरी ।।६।।

त्या आज्ञेप्रत सोडुनि गेले ।
देह विसर्जित अपुले केले ।
जीवन सौख्या तुच्छ मानिले ।
जळाले चंदन ज्वालांतरी ।।७।।

सहाभुनूती नकोच भिक्षा ।
न्यायाविण ना अन्य अपेक्षा ।
हीच अंतिची भाग्य परिक्षा ।
देवहो आज्ञा द्या ईश्वरी ।।८।।

卐 卐 卐

शेवटी शेवटी अगदी गहिवरलेल्या आवाजात ज्ञानदेवाचे कथन संपले. सभामंडपात ती शांतता की भूमीवर तीळ पडला तरीही आवाज यावा. सभेत ज्ञानदेवाचे कथन चालू असताना कित्येक जणांनी हुंदके दिलेत. हृदयद्रावक अशी त्यांची कर्मकहाणी ऐकून कित्येकांच्या डोळयातून आसवे गळालीत. मायमाउल्या तर धाय मोकलून रडायच्याच बाकी राहिल्या. सर्वजण त्या तेज:पुंज बालकाच्याकडे मोठ्या प्रेमळ आणि करूण दृष्टीने पाहात होते.

तेवढयात एक कर्मष्ठ, डोईवर जटाभार वाढलेला, भालप्रदेशी शेंदूर आणि भस्माचे पट्टे धारण केलेला, डोक्यावरील केशभार खांद्यापर्यंत रुळलेला, एक सद्ग्रहस्थ, एकदम क्रोधात आल्याप्रमाणे चौफेर डोळे गरगरा फिरवीत उभा राहिला आणि बोलू लागला, "ही तर नुसती पोकळ अलंकारित वटवट, निव्वळ शाब्दिक गारुडखेळ. ह्या जिव्हामाधुर्याचा परिणाम येथे होणे नाही."

त्या ब्रह्मवृंदाचे ते वचन ऐकून ज्ञानदेव सर्वाकडे पाहून बोलू लागला, "भूदेव ! आम्हाला सहानुभूती नको असे मी प्रथमच आपल्या चरणी कथन केले आहे. आमचे भविष्य काय हा निर्णय मागण्याला आम्ही धर्मसभेपुढे आलो आणि तेही आळंदीकरांनी हा मार्ग दाखविला म्हणून." ज्ञानदेवाचे हे कथन पूर्ण झाले आणि मग चर्चा सुरू झाली. धर्मग्रंथ उघडल्या गेलेत. मिताक्षर, यमस्मृती, चांद्रायण, वृद्ध पराशर, प्रायश्चित्तेंदुशेखर, संवर्त इत्यादि सर्वच ग्रंथाची पाने उलटल्या गेलीत. खूप चर्चा झाली. पूर्वपक्ष उत्तर पक्ष झालेत. आधार सापडेना व निर्णय काही लागेना. शेवटी सर्वात वयोवृद्ध आणि विद्वान गणल्या गेलेले असे एक ज्ञानी पंडीत उभे झाले. सर्वत्र जनसमुदाय स्तब्ध झाला. पंडितानी बोलण्यास सुरुवात केली. "श्रुयतां तावत् :

वृद्ध पंडीत- **आधार मिळे ना कुण्या धर्मग्रंथी ।**
**कुंठित यास्तव अमुची झाऽली मती ।।धृ।।**

प्रायश्चित्त ते काय यावरी ।
आले नाही लेखी नजरी ।
प्रश्न न आला कधी यापरी ।
कुण्याही धर्म सभे पुढती ।।१।।

"शास्त्रात् रुढी बलीयसी" ।
ओलांडुन या सद्वचनासी ।
जाणे नाही हेच अम्हासी ।
सांगते ब्रह्मधर्म नीति ।।२।।

तद्वत उपनयना अधिकार ।
प्रदान यांना करणे यावर ।
समर्थ नाही आम्ही पामर ।
कुणी घे स्मृतिकारच हाती ।।३।।

तरी सांगणे या बाळाते ।
सहा पहावे जगदीशाते ।
भूताभूती देवच वसते ।
धारणा धरूनी हृदयांती ।।४।।

बालक चारहि सत्प्रवृत्त ।
ऐहिक सौख्याप्रत निवृत्त ।
म्हणुनचि आले ते आम्हाप्रत ।
भाविकऽ श्रद्धाळू दिसती ।।५।।

सभा तया दे आशिर्वादऽ ।
होईल अंती मंगल सुखदऽ ।
निर्णय हाची यात न वादऽ ।
जन हे शुभ त्यांना चितती ।।६।।

卐 卐 卐

त्या व्युत्पन्न ब्रह्मश्रेष्ठाचे हे कथन सर्वांनी ऐकले. सभामंडपात एकदम शांतता स्थिरावली. चारही बालके, हे कथन ऐकल्यावर खाली वाकली आणि त्यांनी माथा जमिनीवर टेकवून ब्रह्मसभेला वंदन केले. ब्रह्मसभेतर्फे त्या ब्रह्मश्रेष्ठाने दिलेल्या आज्ञेचा त्यांनी स्वीकार केला.

पण त्या ब्रह्मवृंदापैकी एका अतिरेकी गटाला हा निर्णय मंजूर नव्हता. त्या गटाचा मुखंड कोपिष्ट होतच सभेत उभा झाला आणि गर्जून बोलला, "आम्ही ह्या कुपात्रांना आशिर्वाद देणे मान्य करीत नाही. ते धर्म बाह्य आहे. याला आमचा विरोध आहे." एवढे बोलून तो आपला मुद्दा पुढे मांडू लागला :

विरोधी मत देण्याचा असे आम्हासही अधिकार ।
मुखंड आशिर्वच या भ्रष्ट मुलांना नाही आम्ही देणारऽ ।।धृ।।

म्हणे लेकरे संन्याश्याची ।
कवणे श्रवली अशा तऱ्हेची ।
कधी वाच्यता यासम हीची ।
अशाने धर्म भ्रष्ट होणार ।।१।।

धर्म सनातन पुरा बुडविला ।
आळंदीकर मूढ जाहला ।
ज्यांनी हा विष वृक्ष पोशिला ।
सहन हे आम्ही कसे करणार! ।।२।।

पहा तरी हे कपटी जालऽ ।
गुरु आज्ञेची घेउनी शाल ।
इथे सांगतो असत्य फोलऽ ।
पाप हे कोण गुरू करणार ?।।३।।

काशीक्षेत्र पावन भुवनी ।
कालभैरवें दंड घेऊनी ।
धर्म रक्षिला कठोरतेनी ।
कसे हे पाप तिथे घडणार ? ।।४।।

आम्हा नाही मान्य येथले ।
भ्रष्टप्रजेला आशिर्वचले ।
जे धर्माने त्यजीत झाले ।
दया ना, धर्म पैल जाणार ।।५।।

卐 卐 卐

विरोधी गटाच्या त्या मुखंडाने अशा प्रकारे आपला विरोध नोंदविला आणि मग आपल्या अनुयायाकडे संकेतात्मक दृष्टीने पाहिले. त्यांनी ताबडतोब "हूं हूं, बरोबर आहे" असे म्हणून आपली संमती दर्शविली त्या विरोधास. तो मुखंड आणखी उत्तेजित झाला व पुढे बोलू लागला, "हा पोरगा जे बोलला त्यावर आपण विश्वास ठेवता काय ?" "नाही. नाही. कदापि नाही. त्रिवार नाही. आम्हास ते सर्व असत्य आणि अशक्य दिसते." त्याचे अनुयायी जोराने ओरडले.

तो मुखंड पुन्हा बोलू लागला, "आणि ह्या पोरट्याचे धैर्य तरी पहा ! इतक्या विद्वान ब्रह्मवृंदासमोर मोहिनी टाकणारे भाष्य करून हा आपला स्वार्थ साधू पहात आहे. नावे तरी काय ठेवली या कुपात्रांची त्याच्या भ्रष्ट बापाने ? म्हणे निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई ! काय तरी नावे आहेत ? तुझे नाव ज्ञानदेव, नाहीरे ? ज्ञानदेव, कवण्या ज्ञानाचा देव रे तू किटकुल्या ?

"देवाचे अस्तित्व सर्व प्राणिमात्रात आहे या ज्ञानाचा." ज्ञानदेव शांतपणे उत्तरला. हे ऐकताच तो मुखंड चिडून वाकुल्या दाखवित बोलला, "हॅं हॅं हॅंऽऽ. देवऽऽ सर्वत्रऽऽऽ आहे ह्या ज्ञानाचा ! पहा तो बाहेर पखाल पाठीवर घेऊन रेडा चालला आहे, त्यातही पण तोच देव आहे कायरे, जो तुझ्यामध्ये आहे ?"

ज्ञानदेव गंभीरपणे बोलला, "होय भूदेव, आहे. ज्याप्रमाणे नरसिंह अवताराचे वेळी प्रल्हाद म्हणाला होता की, होय या खांबातही देव आहे, आणि जसे हिरण्यकश्यपूने खांबावर खड्गाचा वार केला आणि खरोखरच परमेश्वर नरसिंह अवतारात प्रगट झाले, त्याचप्रमाणे या रेड्यातही देव आहे. असा माझा विश्वास आहे." हे ऐकून तो मुखंड चिडला आणि तावातावाने मंडपाबाहेर गेला आणि त्या रेड्याचे मालकाच्या हातातून आसूड घेतला आणि त्या आसुडाने तीन फटके त्या रेड्याच्या पाठीवर मारले. काय चमत्कार ! :

निवेदक– आसुड फटके महिषापाठी वळ ते ज्ञानाला।
सभामंडपी जन हळहळती बघता ही लीला ॥ धृ ॥

आसुड फटके तीन हाणले।
महिषापाठी जनें पाहिले।
ज्ञानाअंगी परि वळ उठले।
अघटित दर्शन दृष्टीला ॥१॥

ताडण महिषा आत कळवळे।
ज्ञानदेव जरि शांत आगळे।
बघुनी जनता बहू तळमळे।
बोलती चमत्कार झाला ॥२॥

घटना यासम पाहुनि म्हणती।
बाळा अंगी ईश्वर वसती।
छळू नका रे सोडुनि नीती।
तडा हो ब्राह्मण एकिला ॥३॥

सर्व विरोधक लज्जित झाले।
बघुनी या अघटीता थिजले।
तरिही हट्टा नाहि सोडले।
मुखंडे मांडित दाव्याला ॥४॥

"म्हणे वंगदेशाची जादू।
इथे दावितो संधी साधू।
कुणी गारुडी या भुतबांधू।
शक्य हे त्या सम भटक्याला ॥५॥

□ □ □

विरोधी पक्षाचा मुखंड, ज्ञानदेवाचे पाठीवर उठलेले तीन वळ आणि सभामंडपातील लोकांचा कोलाहल पाहून जरी स्वयेंच हादरला तरी तो आपली जिद्द सोडायला तयार नव्हता. लोक ओरडत होते. विरोधी गटाला शिव्या शाप देत होते. ब्रह्मवृंदऐक्याला तडा जाणार अशी चिन्हे दिसू लागली. पण तो हट्टी मुखंड माघार घेईना. तो म्हणाला, "असे जादूचे चमत्कार तर कोणीही रस्त्यावरचा गारुडी किंवा भूत पिशाच्च बांधणारा मांत्रिक पण करू शकतो !" नंतर ज्ञानदेवापुढे येऊन तो म्हणाला, "तू म्हणतोस की, ईश्वरी चैतन्य सर्व ठिकाणी आहे. आम्हाला नृसिह अवताराचा दृष्टांत देऊन धूळ फेकतोस काय आमच्या डोळ्यांत ? जर तूझ्या म्हणण्याप्रमाणे ह्या रेड्याच्या अंगी ईश्वरी चैतन्य असेल, तर ह्या रेड्याला वेद म्हणावयास सांग. जर रेडा वेद बोलला तर आम्ही मानू की, तू म्हणतोस ते खरे आहे. लाव रेड्याला वेद म्हणायला ! माहीत होऊ दे या जनांना ईश्वरी चैतन्य आणि तुझे गारुडी खेळ. हं, चल सांग रेड्याला !" एवढे बोलून तो मुखंड मोठ्या अभिमानाने सर्व सभामंडपात आपली दृष्टी फिरवू लागला. त्याचे पाठिराखे पण त्याला "हां. हां." म्हणून पुष्टी देऊ लागले.

ज्ञानदेवाने ऐकून घेतले. स्तब्ध झाला तो एक क्षण. त्याने निवृत्तीनाथाकडे पाहिले. निवृत्तीनाथ मंद हंसले. ज्ञानदेव बोलू लागला :

"भूदेव आपण व्युत्पन्न आहात. देवासमान आहात. आपली जशी इच्छा त्याप्रमाणेच होईल. आपण जर इच्छिता की, रेड्याने वेद म्हणावेत, तर रेडा जरूर वेद म्हणेल आपल्या आज्ञेनुसार. आपण निश्चित असावे. आपली इच्छा पूर्ण होणारच.

ज्ञानदेव– **आपण ब्राह्मण देवच भूवर आज्ञा मोलाची ।**
**ऐका महिषा मुखातुनी हो वचने वेदाची ।। धृ ।।**

मंद हासुनी ज्ञान बोलले ।
"शिव वाणींसम शब्द आपुले ।
पुरते करणे व्रता घेतले ।
नसावी छाया चिंतेची" ।।१।।

चालत आले मंडप दारी ।
आणि बदलली प्रतिमा सारी ।
प्रकाश वलये बाह्य शरीरी ।
भासले मूर्ति सूर्याची ।।२।।

जनही बघता उभे राहिले ।
आश्चर्याने मुग्ध जाहले ।
अद्‌भुत दृष्ये नयन दीपले ।
पाहता करणी बाळाची ।।३।।

हस्त ठविला महिषा भाळी ।
झणी उजळली कांती काळीं ।
स्थित्यंतरता दिसली डोळी ।
योगसिद्धिच्या शक्तीची ।।४

सांगे ठेउनि माथी हस्ता ।
भूदेवांची आज्ञा आता ।
तुवा म्हणावी वेद संहिता ।
पाळीवा महिषा ही त्यांची ।।५।।

आज्ञा ऐसी अनुपम भव्य ।
पालन करणे तव कर्तव्य ।
ऐकू दे त्या पावन श्राव्य ।
बोलरे वेदवाक्य सुरुची ।।६।।

卐 卐 卐

"'हां म्हणा बाळा माझ्यासोबतच" असे महिषाला सांगून ज्ञानदेव स्वतःच म्हणू लागले,

"ॐ अग्निमिळे पुरोहितम्" आणि काय अघटीत ! रेडा त्याचप्रमाणे वेदसंहिता म्हणू लागला.

"यज्ञस्य देवमृत्विजम् । होतारम रत्न धातमम् ।
अग्निः पूर्वेभि ऋषिभिरीड्यो नूतनैरुत ।
स देवां एह वक्षति । अग्निना रयिमश्नवत्पोषमेव दिवे दिवे ।।

आणि या प्रमाणे महिषमुखांतुन घडघडा वेद संहितेचा उच्चार बाहेर येऊ लागला. एकामागून एक पंक्ती, आकाशातून मेघ गडगडाट व्हावा, त्याप्रमाणे रेड्याचे मुखातून स्पष्ट बाहेर पडू लागल्या, आणि वातावरणात घुमू लागल्या. त्या वेद घोषाचे प्रतिध्वनी चारही दिशातून लोकांच्या कानावर आदळत होते. सर्व जनसमुदाय थक्क होऊन उभा होता. पहात होता डोळ्यांनी, आणि ऐकत होता कानांनी, रेड्याचे मुखातून होत असलेला तो वेदघोष. किती तरी काळ हा असा वेद घोष चालू होता. कुणालाच भान राहिले नव्हते. सर्व ब्रह्मवृंद धडपडत जाऊन ज्ञानदेवाचे पायावर स्वतःला समर्पित करीत होता. म्हणत होता, "ज्ञानदेवा, क्षमा करा आम्हाला. आपण साक्षात् ईश्वर आहात. आम्ही सर्व अज्ञ आहोत. आपण खरेच 'ज्ञानेश्वर' आहात."

सर्वत्र जनसमुदायाचे स्वरूपच पालटून गेले होते. लोक मुक्त कंठाने "जय ज्ञानेश्वर जय परमेश्वर" म्हणून त्यांचा जयजयकार करीत होते. सारा परीसरच त्या जयजयकारात बुडून गेला होता.

समाजाने बहिष्कृत केलेली ही संन्याश्याची मुले, दिव्य अशा ईश्वरी शक्तीचे साक्षात पुतळेच आहेत, ईश्वरी अवतारच आहेत हे लोकांना पटले आणि मग त्या पैठण नगरीने त्यांची पूजा करण्यात कोणतीही कसर ठेवली नाही. त्या दिवसापासून प्रथम देवकुळेच्या घरी, पण तिथे जागा अपुरी पडू लागल्यामुळे, प्रतिष्ठाणेश्वराचे मंदीरात, आणि तिथेही जनसमुदाय मावेनासा होऊ लागल्यामुळे, नंतर गोदावरीच्या वाळवंटात, ज्ञानदेवाची भजने, कीर्तने, प्रवचने होऊ लागली. खेड्यापाड्यातून दूरदूरून लोक त्या योग्यांच्या दर्शनाला आणि त्यांची वाणी ऐकावयास येत आणि मोहित होऊन परत जात. ज्ञानेश्वर मुखातून त्यांची स्वयंपूर्ण प्रतिभा एखाद्या सरितेसारखी बाहेर पडत होती आणि रोज नवनवीन अभंग, ओव्या, भजने ह्यांचा वर्षाव होत होता. श्रोतेगण न्हाऊन निघत होते. त्यांची कीर्ती चारही दिशामध्ये पसरत होती. प्रतिष्ठाणच्या साक्षात्काराबद्दल ऐकून लोक आश्चर्य प्रगट करीत होते, त्यांना ईश्वरी अवतार मानीत होते :

निवेदक– पैठणी जनता हो सारी ॥
बुडाली भाविकता सागरी ॥ धृ ॥

पुण्य सोहळे असे चालले ।
ईशस्तवनीं मग्न जाहले ।
जनास ज्ञानें वेड लाविलें ।
उजळुनी दीपच अंधारी ॥१॥

भजन कीर्तनी निशा रंगल्या ।
भक्ती बोधामृतात भरल्या ।
ज्ञानेश्वर जयकारी सरल्या ।
नवनव्या रोज काव्य लहरी ॥२॥

सरस्वतीची सरिता मोहक ।
ज्ञानेशामुखी वाहे सात्विक ।
ब्रह्मानंदी जनता भाविक ।
हो नत चरणी ज्ञानेश्वरी ॥३॥

दुर्मिळ पोथ्या ग्रंथ पुराण ।
भावे वदतीं आणुनि ब्राह्मण ।
पुनीत होतिल लावा आपण ।
हस्त ते पावन परमेश्वरी ॥४॥

आजोळी तर कौतुक फार ।
म्हणे जाहला कुलं उद्धार ।
निवृत्तीपदी ज्ञानसागर ।
अर्पिती जयमाला सत्वरी ॥५॥

□ □ □

अशा ब्रह्मानंदात त्या भावंडांचे दिवस पैठणला जात असता एक दिवस अवचितच मुक्ताई बोलली, "अरे ज्ञानदादा, आपण आळंदीहून निघतांना सांगितले होते की, पैठणला धर्म निर्णय लागताच आम्ही परत येऊ म्हणून. परंतु एक महिना झाला, आपण तर इथेच रमलो, आणि परत जाणे विसरूनच गेलो." ऐकून ज्ञानदेव म्हणाले, "अग मुक्ते, अजून आपला निर्णय तर लागलाच नाही. ब्रह्मसभेकडून आपणाला शुद्धिपत्र तर मिळालेच नाही."

"अरे दादा, उद्या पौर्णिमा. पैठणेश्वर मंदिरात ब्रह्मसभा भरणार. चल, तू आणि मी मिळून जाऊ व ब्रह्मसभेला शुद्धिपत्र मागू आपण," मुक्ताईने ज्ञानदादाला सुचविले.

ठरल्याप्रमाणे दुसरे दिवशी दोघेही बहिणभाऊ पैठणेश्वर मंदिरात गेले. तिथे ब्रह्मसभा बसलीच होती. ज्ञानदेव व मुक्ताईला पाहाताच उपस्थित ब्रह्मवृंद उभा झाला आणि सर्वांनी ज्ञानेश्वराला हात जोडले व नमस्कार केला.

"काय ज्ञानेश्वरा, आज कसे येणे केले," याप्रमाणे ब्रह्मवृंद प्रमुखाने विचारताच ज्ञानदेव म्हणाले, "भूदेवा अजून आम्हाला आपल्या सभेकडून शुद्धि-पत्र मिळाले नाही. त्याची आठवण करून देण्यासाठी आलो आहो." ऐकताच ते प्रमुख बोलू लागले,

"ज्ञानेश्वरा तुम्हाला आम्ही काय शुद्धिपत्र देणार ? तुम्ही स्वयेच ईश्वर आहात. साक्षात प्रभावंत सूर्यदेव आहात आपण. सूर्याला तो सूर्य आहे अशा प्रमाणपत्राची काय आवश्यकता ? कोण असे प्रमाणपत्र देऊन आपल्या अज्ञानाचे प्रदर्शन करणार ? ज्ञानेश्वरा, आम्हाला आणखी लज्जित करू नका. आम्ही सर्व काही डोळ्यांनी पाहिले आहे व कानांनी ऐकले आहे. झालेल्या साक्षात्काराने आम्ही सर्व दिपून गेलो. या नरदेहात भूवर कोण असा समर्थ आहे की जो त्रैलोक्येशाबद्दल प्रमाणपत्र लिहू शकेल ? आपण स्वत: ईश्वरी अंश आहात. आपणाबाबत लिहिणे आमची पात्रता नाही." एवढ बोलून त्या ब्रह्मवृंद प्रमुखाने आपला माथा ज्ञानेश्वरपदी झुकविला.

"पण भूदेव, आळंदीकर आम्हाला शुद्धिपत्र मागतील तर मग आम्ही काय करावे ?" ज्ञानदेवाने पुन्हा शंका काढली.

"तशा कारणाकरता लौकिक म्हणूनच जर हवे असेल तर आम्ही शुद्धिपत्र देतो. त्यात आपल्या चरणांची सेवा घडते आहे अशीच आमची धारणा राहील." ब्रह्मवृंद प्रमुखाने एवढे निवेदन करून, एका पत्रावर लिहिले आणि ते पत्र मोठ्या

भक्तिभावाने ज्ञानदेवाचे हाती दिले. ज्ञानदेवाने अत्यंत सन्मानपूर्वक व नम्रतेने त्या पत्राचा स्वीकार केला. सभाजन म्हणाले, "ज्ञानेश्वरा आता आपण पैठण सोडून जाणार काय" ?

"भूदेवा, आपणच आमची सर्व ऐहिक पाशापासून मुक्तता केली आहे, तर मग आम्ही पैठण सोडून जाऊ नये हा पाश तरी कशाला आम्हामागे ठेवावा ?" ज्ञानदेव अत्यंत भावपूर्वक बोलले आणि सर्वांना वंदन करून, मुक्ताईसह बिऱ्हाडाकडे चालू लागले.

आज नको उद्या जा, याप्रमाणे दररोज सर्व जनांचा आग्रह ऐकता शेवटी जाण्याचा दिवस उगवला. सर्वांचा निरोप घेऊन ती चारही भावंड वाट चालू लागली. सर्वत्र पैठण नगरवासी आबालवृद्ध, माय माउल्या, लहान बालके सुद्धा त्या अवतारी भावंडांचा वियोग होतो आहे म्हणून अतिशय दुःखित दिसत होते. सर्वांच्या नयनांत अश्रू आले होते. निवृत्तीनाथ मंद पाउले टाकीत सर्वांच्या पुढे चालत होते. ज्ञानदेव, सोपान, मुक्ता भारावल्यावत मागे जात होते. जनसागर त्यांचे मागून गुणगान करीत चालला होता, आणि त्या महाज्ञानी, सत्शील, स्थितप्रज्ञ योगी भावंडांच्या होणाऱ्या विरहामुळे शोकमग्न होता. लोकांना एकच दुःख होते :

निवेदक–

याविणा दुःख नसे अन्य ।
चालले परतुनी चैतन्य ।। धृ ।।

ज्ञानेश्वर ये प्रतिष्ठाणला ।
मानवतेच्या उद्धाराला ।
भाग्य आमुचे वेद ऐकिला ।
महीषा मुखातुनी धन्य ।।१।।

साक्षात्कारा पाहुन हरले ।
दंभ रुढीचे जने मानले ।
भूताभूती श्रीहरि बसले ।
संपले वैचारिक दैन्य ।।२।।

पुनीत केली पैठण नगरी ।
बंधुभावमय मंत्रोच्चारी ।
मिटले भेदाभेद संगरी ।
पाहुनी देव सर्वमान्य ।।३।।

प्रभावंत हा परत चालला ।
वाटे प्रेमळ माता सकला ।
हाती प्रण हा एक घेतला ।
सांगणे भक्ती प्राधान्य ।।४।।

दुःखित सारी पैठण नगरी ।
आज चालले पद ज्ञानेश्वरी ।
प्रभुचे अवतारची भूवरी ।
नश्वर देही सामान्य ।।५।।

अशा प्रकारे चालता चालता पैठण नगरीची वेस आली. तोवर सर्व जनसमुदाय त्या तेजस्वी भावंडांच्या मागे चालत आला. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताई यांच्या गळयात मोगरा, जाई, बकुळ इत्यादि फुलांच्या माळा पडल्या होत्या. त्या सुगंधी फुलांचा परिमळ सर्व वातावरणात पसरला होता. सारा परिसर सुगंधाने दरवळत होता. वेस येताच ज्ञानेश्वर मागे फिरून उभे झाले आणि त्यांनी आपले दोन्ही हात जोडून जनसागराला नमस्कार करीत ते म्हणाले, "आपल्या निःसिम प्रेमाने आम्ही भारल्या गेलो. जेवढे प्रेम आपण आम्हावर केले, तेवढेच जर परमेश्वरावर कराल आणि मानवता धर्म साक्षात पाळाल, तर आपल्या जीवनाचे सार्थक होईल. चौऱ्यांशी लक्ष योनीच्या फेऱ्यातून मुक्त व्हाल. मोक्षप्राप्तीचे अधिकारी व्हाल आपण. आता परतावे. आम्ही आपले आशिर्वाद आणि सद्भावना सोबत घेऊन जात आहोत."

सर्व जनसागराने ज्ञानेश्वरांचा त्रिवार जयजयकार केला. लोकांनी त्या चारही भावंडाच्या पायावर माथी टेकविली. माय–भगिनींनी आपल्या कडेवरील लहान लहान बालके त्यांच्या चरणावर ठेऊन आशिर्वाद घेतले. लोक गावाकडे परतू लागले आणि ती चार भावंडे "जय जय रामकृष्ण हरी" असे मुखाने म्हणत आपला मार्ग आक्रमू लागली.

मार्ग चालता चालता ती भावंडे गोदा–प्रवरा संगमावर आलीत. त्या ठिकाणी एक 'शिवमंदीर' पाहून तिथेच रात्र काढायचे ठरले. त्यांची कीर्ती चारही दिशांना आधीच पोहोचल्यामुळे तिथेही लोकांची भीड त्यांचे दर्शनास आली. बरीच रात्र झाली. जन दर्शन घेऊन निघून गेले. थोडी शांतता झाली. निवृत्तीनाथ व ज्ञानदेव ध्यानस्थ बसले. ध्यान उतरल्यावर निवृत्तीने ज्ञानदेवास हाक मारली, "बाळा ज्ञानदेवा, जरा इथे मजजवळ ये तुज काही सांगावयाचे आहे". "जी. जी दादा." म्हणून ज्ञानदेव त्यांचे जवळ गेले आणि पदाचे वंदन करून आपल्या बंधु–सद्गुरूचे समोर बसले. मुक्ता–सोपानही कुतुहलाने जवळ येऊन बसले. निवृत्तीनाथांनी ज्ञानदेवाचे पाठीवर प्रेमाने हात ठेवला व सांगू लागले :

निवृत्तीनाथ– गीता संस्कृत वाणीत ।
जनासी सांग प्राकृतात ।। धृ ।।

कथा विस्मयी बहू पुरातन ।
महेश उघडे निज अंतर्मन ।
उमा देवता परिसे कथन ।
परिसरी क्षीरसिंधु व्याप्त ।।१।।

स्वर्गाचार्य देव महेश ।
अंतरंगत्री उघडुन देविस ।
परमभक्तिचे गूढ रहस्य ।
सांगती विश्वसार गुप्त ।।२।।

अपार इच्छा पडणे कानी ।
संवादा त्या अगाध ज्ञानी ।
श्री विष्णू मग गर्भरुपानी ।
ठाके लेमत्स्य शरीरात ।।३।।

ऐसे ऐकुन ज्ञान पावले ।
हर्षे त्यासी मनी ठेविले ।
मत्सिद्रच नंतर अवतरले ।
भूवरी ब्रह्मज्ञान प्राप्त ।।४।।

श्री विष्णूने कृष्णावतारी ।
महाभारती रणभूमिवरी ।
दिले अर्जुना ज्ञान ईश्वरी ।
हेचि जे गीता बोधामृत ।।५।।

अमोल दुर्लभ गीता तत्व ।
ज्ञान मंथनातील नवनीत ।
संस्कृत वाणित जे बंदिस्त ।
ना कळे बहुजन अज्ञात ॥६॥

सकल जनास्तव मुक्त करावे ।
अर्था त्यातिल उकलुन द्यावे ।
सुलभ प्राकृती तू सांगावे ।
आजते भूवर उपयुक्त ॥७॥

卐 卐 卐

ज्ञानदेवा, हे असे अनमोल 'गीतातत्व', जे सर्व लिखित शास्त्रांतील मेरूमणी, सर्व उपनिषदांचे सार, श्रीकृष्ण भगवान आणि धनंजय-पार्थ यांच्या अद्वितीय अशा संवादरुपात देववाणी संस्कृतमध्ये लिहिले आहे, ते तुला जन उपयोगाकरिता, अज्ञानांच्या उद्धारास्तव, सुलभ मराठी भाषेत सांगावयाचे आहे. ही सद्गुरू गहिनीनाथांची इच्छा आहे, तशीच त्यांची आज्ञा आहे. ती त्यांची इच्छा तुज पूरी करणे आहे, ती आज्ञा पालन करणे आहे. ते तुवाच केले पाहिजे आणि ते करण्यास तूच समर्थ आहे. अन्य कुणीही नाही. हा ईश्वरी संकल्प आहे." निवृत्तीनाथांनी आपले निवेदन संपविले.

ज्ञानदेवाने सर्व ऐकून घेतले. त्यांनी आपल्या आत्मशक्तीचा ठाव घेतला. मनात काही संभ्रम राहिला. ते निवृत्तीनाथांना सांगू लागले, "गुरुदेव आपल्या सामर्थ्याविषयी मज तिळमात्र संदेह नाही. पण मी स्वत:च्या आत्मशक्तीविषयी जरा साशंक आहे. मराठीत रुपांतर तर गीता ग्रंथाचे करणे आहे. ती **श्रीमद्भगवद्गीता** जी वेद व्यासांनी उत्पन्न केली, जी सातशे श्लोकात बद्ध आहे, जी माता भगवती प्रमाणे प्रगट झाली आहे, जी देव अवतार भगवान श्रीकृष्ण मुखातून कुरुक्षेत्रावर बाहेर आली आहे, महासागरातील तरंगाप्रमाणे भव्य, अफाट; तिज मी स्पर्श कसा करू. या एकाच कल्पनेने माझे मन थरथरत आहे."

हे ऐकून निवृत्तीनाथ मंद हंसले आणि एकदम उभे झाले. ज्ञानदेवाला त्यांनी आपल्या दोन्ही बाहूंच्या आलिंगनात बद्ध करून घेतले. हृदयाशी हृदय भिडले. त्या एका क्षणात असाच भास झाला कीं, जणू स्वयें भगवान श्रीकृष्ण पार्थाला आलिंगन देत आहेत. ज्ञानदेव उजळून निघाले. निवृत्तीनाथ बोलू लागले :

निवृत्तीनाथ–

**मनीरे संभ्रम का यावा ।**
**समर्था बाळ ज्ञानदेवा ।। धृ ।।**

शिवशक्तीचा धारक शिष्य ।
देव त्रिमूर्ती वच अदृष्य ।
जिव्हाग्री तव करण्या भाष्य ।
तुला ना, अवघड ही सेवा ।।१।।

योगी गहिनीनाथ कृपेचा ।
तू तर पुतळा रवि प्रभेचा ।
त्रिभुवनि सबळ महासिद्धिचा ।
तुजविणा, अन्य नसे बांधवा ।।२।।

संयोजित जे तुज सांगितले ।
याच कारणे सर्व घडविले ।
आत्मसिद्धिबळ पुरते दिधले ।
करावे, दूर अता भेवा ।।३।।

होणे ठरले तुझ्याच वाणित ।
धरिना शंका मुळी मनांत ।
प्राकृति "गीता" वच बोधामृत ।
वाहवी, प्रतिभा तव ठेवा ।।४।।

ठाणे
ग्रा. क्र.

दुसरे दिवशी पहाटेला चारही भावंड आपला पुढील मार्ग आक्रमू लागली. त्यांची कीर्ती सर्वत्र पसरली होतीच. मार्गात लोक त्यांचे दर्शनाला येत आणि त्यांच्या मुखातून निघणारी वाणी ऐकीत. याप्रमाणे चालता चालता ते नेवासे येथे पोहोचले. ही ज्ञानी भावंड नेवास्याला येणार, ही माहिती आधीच तिथे आणि आसपासच्या परिसरात पोहोचली होती. त्यामुळे ज्ञानी, विद्वाना-सहित सर्वच स्तरातील जन भक्तीभावाने तिथे येऊन जमले होते. नेवास्याला पोहोचताच त्यांनी सर्वप्रथम 'आदिमाया मोहिनीचे' देऊळ शोधले आणि दर्शन घेतले. तिथेच देवळात निवृत्तीनाथ ज्ञानदेवाला म्हणाले, "बाळा ज्ञानदेवा, हेच ते स्थळ जिथे भगवान विष्णूने मोहिनीरुपात असुरापासून अमृतकुंभाचे रक्षण केले होते. आता तेच **'गीतारुपी अमृत'**, जे संस्कृतच्या कुंभात बंद करून ठेवले आहे, ते सकल अज्ञ जनाकरता, सुलभ अशा आपल्या मराठीत सांगून इथेच तुला मोकळे करायचे आहे. त्या पवित्र कर्माकरता ह्या स्थानाशिवाय दुसरे योग्य स्थानच नाही. आपला मुक्काम आता इथेच राहिल".

माहित झाले की प्रवरातिरावर एक प्राचीन शिवमंदीर आहे आणि परिसरात वृक्षराजींनी संपन्न अशी एक जागा आहे. तियेच जाण्यास ते निघालेत. रस्त्यात एक सुहासिनी, मळवट भरलेली आणि हिरव्या रंगाचे लुकडे–चोळी परिधान केलेली, एकदम पुढे आली. तिने मोठ्या भक्तीने ज्ञानदेवाचरणी साष्टांग नमस्कार घातला. ज्ञानदेव आपल्याच तंद्रीत चालले होते. सहजच त्याच्या तोंडातून आशिर्वाद निघाला, "अखंड सौभाग्यवती भव". त्या स्त्रीबरोबर असलेल्या लोकापैकी, एकाने संभ्रमात पडून ज्ञानदेवांना सांगितले, "ह्या स्त्रीचा पती निधन पावला आहे आणि ती त्याचे सोबत सती जात आहे. त्याचे नांव सच्चिदानंद कुळकर्णी".

ज्ञानदेवांनी ऐकले आणि क्षणात त्यांची कांति प्रखर अशा तेजाने तळपू लागली. ते बोलले, सच्चिदानंद आणि मृत्यू पावले ! छे. ते शक्यच नाही. ते असंभव आहे". आणि तसेच शिवमंदीराकडे चालू लागले.

दुसरे दिवशी सकाळपासूनच शिवमंदिराचे ओवरीत भाविक जनांची गर्दी जमू लागली. इतकी भीड झाली की ओवरीत जागा राहिली नाही बसावयास. लोक बाहेर उभे राहिले. प्रत्येकाच्या मुखावर एक प्रकारची गूढ अपेक्षा दिसून येत होती. त्यांना कल्पना होती की आता काही तरी दिव्य, ज्ञानमय, भाविक आणि सुश्राव्य ऐकावयास मिळणार आहे. तेच भाव प्रत्येकाचे मुखावर उमटले होते.

ओवरीच्या खांबाशीच लागून व्यासपीठ तयार करण्यात आले होते. सर्व ठिकाणी पताका लागल्या होत्या. आम्रपत्र आणि फुले यांची तोरणऽ लावण्यात

आली होती. व्यासपीठ सुगंधी पुष्प पत्रांनी शृंगारले होते. ओवरीच्या खांबाशी बसण्याला उच्च आसन तयार केले होते. समोर भाविक जन टाळ, मृदंग, वीणा, चिपळ्या इत्यादी घेऊन आधीपासूनच भजन करीत होते. सर्व भाविक जनसमुदायाच्या नजरा व्यासपीठावर स्थिर झाल्या होत्या. त्यांच्या हृदयातील उत्कंठा शिगेला पोहोचली होती.

तेवढ्यांत मागील बाजूने, निवृत्तीनाथ व त्यांचे मागे ज्ञानदेवाला दोन्ही बाहूंना धरून येणारे सोपान व मुक्ताई लोकांना दिसले. त्या तेज:पुंज अशा ब्रह्मज्ञानी भावंडांना पाहून लोकांनी जयजयकार केला. व्यासपीठाजवळच एका आसनावर सिद्धासन घालून निवृत्तीनाथ बसले. मुक्ताई–सोपानही त्यांच्या बाजूलाच आसनस्थ झाले. ज्ञानदेवाने आपले सद्‌गुरू निवृत्तीनाथ यांचे पदवंदन केले आणि नंतर ते व्यासपीठावर चढले. भाविक सांप्रदाय प्रमुखाने ज्ञानदेवामाथी बुक्का लावला आणि सुगंधी पुष्पमाला त्यांचे गळयात घातल्या. दोन्ही हात जोडून ज्ञानदेवाने अवघ्या जनसागराला नमस्कार केला आणि मग व्यासपीठावर सजविलेल्या आपल्या आसनावर बसले. भजन बंद झाले. ज्ञानदेवांनी मंद स्वरात गुरुस्मरण सुरू केले :

ब्रह्मानंदं परम सुखदं केवलं ज्ञानमूर्ति ।
द्वंद्वातीतं गगन सदृशं तत्वमस्यादि लक्ष्यं ।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षिभूतं ।
भावातीतं त्रिगुण रहितं सद्‌गुरुं तं नमामि ।।

श्रोतृवर्ग स्तब्ध बसून ऐकत होता. ज्ञानदेवाने एक दीर्घ ॐकार उच्चारला आणि मग मुखातून उत्स्फूर्त अशी प्रथम ओवी बाहेर पडली.

ॐ नमोजी आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जयजय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।
देवा तुचि गणेशु । सकलमति प्रकाशु ।
म्हणे निवृत्तिदासु । अवधारी जोजी ।।

ह्या ओवीनंतर पार्वतीनंदन श्री गणपती दैवताचे स्वरूप वर्णन करण्यास त्यांनी सुरुवात केली. गणपतीचे अवयव कोणत्या कोणत्या शक्तीचे प्रतीक आहेत आणि त्या दैवतात सारे विश्वच कसे एकरूप झालेले आहे हे ज्ञानदेवाने मोठ्या काव्यमय आणि अलंकारीक भाषेत सांगितले.

श्री. गणेश दैवताचे असे वर्णन केल्यानंतर त्यांनी देवी शारदा सरस्वतीची आराधना केली व शारदा सरस्वती स्तवनानंतर आपले सद्‌गुरू निवृत्तीनाथ यांना भक्तीपूर्वक अभिवादन केले आणि त्यानंतर श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील प्रथम श्लोक, त्यांचे मुखातून रसाळ मराठी भाषेत, स्वयंभू प्रवाहाप्रमाणे बाहेर पडला :

"तरी पुत्रस्नेहे मोहितु।
धृतराष्ट्र ऐसे पुसतु।
म्हणे संजया सांगे मातु।
कुरुक्षेत्रिचा"॥

आणि याप्रमाणे एकामागून एक संस्कृत मधील मूळ श्लोक काव्यरुपातच सोप्या प्राकृत भाषेत ज्ञानदेवाचे मुखातून अखंड प्रवाहाप्रमाणे बाहेर स्त्रवू लागले. श्रोतेजन मोठ्या तन्मयतेने ऐकत होते, भारावून रस ग्रहण करीत होते. त्याच समयी श्रोतृवर्गाला ज्ञानदेवाच्या दिव्य शक्तीचा आणखी एक साक्षात्कार पाहायला मिळाला. ज्ञानदेव सांगत असताना प्राकृतात लिहून कोण घेत होते समोर बसून ? तेच सच्चिदानंद कुळकर्णी, जे मृत झाल्यावर "ज्ञानदेव" वाणी प्रभावाने पुन्हा जिवंत झाले होते :

**निवेदक–** **पाहिले साक्षात्काराला ।**
**मृत जो लेखक ज्ञानाला ॥ धृ ॥**

एक पतिव्रता मळवट भाली ।
पति निधनांती सती चालली ।
मार्गी ज्ञानेश्वरपदि पडली ।
'सुहासिनि भव' आशिश दे तिजला ॥१॥

सत्य स्थितीची जाणिव होता ।
'ऐसे घडणं नाही आता ।
मरण सच्चिदानंदा करला' ।
बोललें शुभ या वचनाला ॥२॥

तोचि सच्चिदानंद आजला ।
बसुनी लिहितो ज्ञान वाणिला ।
चमत्कार हा अनुपम घडला ।
पुनरपि जीवित तो झाला ॥३॥

प्रभाव ऐसा ज्ञान वाणिचा ।
जीवन पावे मृत देहाचा ।
भक्त सच्चिदानंद आजचा ।
लेखकऽ गीता कथनाला ।।४।।

ज्ञानदेव एक एक श्लोक प्राकृत भाषेत, आपल्या रसाळ अशा काव्यात्मक वाणीने सांगत होते आणि सच्चिदानंद लिहून घेत होते. जनसागर मुग्ध होऊन ऐकत होता. त्यातील रस ग्रहण करत होता. कथन करतांना ज्ञानदेव तल्लीन होत होते. स्वत:ला विसरून गेल्याप्रमाणे भासत होते. श्रीमद्‌भगवद्‌गीता तत्वज्ञान आजपर्यंत देववाणी संस्कृत मध्ये होते ते प्राकृतात अज्ञ जनांच्या कानावर पडत होते. लोक त्यातील तत्वज्ञान समजू शकत होते. ते अगाध तत्वज्ञान, ज्यात मानवी जीवनाचे सार भरले आहे आणि जे इतके दिवस बहुजनसमाजाच्या आकलन शक्तीबाहेर होते, ते आता सर्वत्र जनांना समजू लागले होते. ज्ञानदेवांनी त्या **'गीतामृत' कुंभाचे** झाकण उघडून त्यातील 'ज्ञानामृत' सर्वसामान्य जनाला वाटणे सुरू केले होते.

पहिला 'अर्जुन विषाद योग' अध्याय पूर्ण झाला आणि नंतर "सांख्य योग" हा दुसरा अध्याय सुरू केला.

निवेदक– **नाशवंत हा देह जाणरे आत्मा अविनाशीऽपरी ।**
**तुझिया पुढती उभे मर्त्य हे शोक तयांचा काऽकरी ।।धृ।।**

भय बाधा हे घोर पाप रे कर्मपराङ्मुखताऽ असे ।
योनित या सुख दु:ख चेतना क्षणभंगुर परि शाऽपसे ।
पुरुषोत्तम तू धैर्यवंत हो अविनाशी जप अंऽतरी ।।१।।

अवध्य शाश्वत अमरात्म्याला अशक्य शस्त्रा माऽरणे ।
तसे शक्य ना अग्नीलाही दहन तयाचे पाऽहणे ।
वृथाचि करणे चिंतन पार्था मर्त्य सर्व धरणीऽवरी ।।२।।

जैसे वस्त्रा जिर्ण त्यागणे तेविच आत्मा सोऽडुनी ।
जाई देही नवउपजत ही अविरत चक्रे भूऽवनी ।
रणकंदन हे क्षत्रिय भूषण कर्तव्यची रण संऽगरी ।।३।।

कर्म करावे फल आशाविण कर्तव्यास्तव जीऽवनी ।
इष्ट फळाते सोडित जावे परमेश्वरपदी वाऽहुनी ।
स्थितप्रज्ञाला योगसिद्धिचा प्रकाश कर्म पथाऽवरी ॥४॥

समत्वभावे चालत योगी खंत करीना तोऽमनी ।
पाप पुण्य ना कदापि चिंती करिता कर्मा योऽजुनी ।
समत्वबुद्धी योगच अंती चतुरी मनुजाचीऽ खरी ॥५॥

सुबुद्धि योगी ज्ञानी जनते फलवांछेला त्याऽगुनी ।
सर्व बंधना तोडित जाती योजित कर्मा पाऽहुनी ।
अमृतमय त्या परमपदाचे धारक होती याऽपरी ॥६॥

दुसरा अध्याय पूर्ण झाला. तिसराही सांगून संपविला. दररोज याप्रमाणे ज्ञानदेव मुखातून गीतामृताची अखंड सरिता वाहत होती. श्रोते त्या ज्ञानामृतात न्हात होते. चवथा अध्याय आला. "ज्ञानकर्मसंन्यास योग" ज्ञानदेवांनी सांगणे सुरू केले.

निवेदक– **पुनर्जन्म हे दान जीविता मुक्ती परी यातुनी ।**
**मोक्षपदासी जाती, करिता सुकृत मनु जीवनी ॥ धृ ॥**

गत जन्मीची आठव सारे विसरुनि ते भूवरी ।
परमेश्वरची स्वर्गलोकिचे आठविती अंतरी ।
येती सत्कृत्यास्तव भुवनी अवतारा घेउनी ॥१॥

समयी ज्या हो धर्म लोप नी पापांचे पर्वतऽ ।
करिती दानव जीवनदु:सह दीनांचे शाश्वतऽ ।
दुर्जन हनन धर्म रक्षण कार्यान्वित होउनी ॥२॥

जीवित मानव मोक्षपदाला पावे कर्मांतरी ।
परमभक्त जे विनम्र होती प्रभुपदी नियमापरी ।
सुटती तेची जन्ममृत्युच्या अवघड फेऱ्यातुनी ॥३॥

शक्य हे तया करिती कर्मे ज्ञानी योग्यापरी ।
अकर्मांप्रती कठोर न्यायी, लिन प्रभुचरणावरी ।
आसक्तीला झिडकारित जे पुण्यपथी चालुनी ।।४।।

जेवी अग्नी करतो रक्षा काष्ठाची जाळुनी ।
तेविच ज्ञानी योगसुकृते पापांना नाशुनी ।
जाती चरणी भगवंताच्या सत्कर्मा साधुनी ।।५।।

पुढे पांचवा अध्याय संपला आणि ज्ञानदेवांनी सहावा अध्याय उघडला. "ध्यान योग" या सहाव्या अध्यायात सविस्तर वर्णन सांगू लागले.

"ध्यान म्हणजे काय ? संन्यासी कोण ? योगसाधना कशी करावी. योग-साधना करणाऱ्याने काय पथ्ये पाळायला हवीत आणि अंतीं योग साधनापूर्ती कशात होते हे सर्व श्रोत्यांना ऐकविले. त्यांना समजाऊन दिले. मोक्षाप्रत जाण्याचा मार्ग व साधना भाविकांच्या आकलनात आली.

**"योगी तोची संन्यासी ।। धृ ।।**

फळाची आस न धरता मनी ।
करी जो सत्कर्मा जीवनी ।
बंधनी ठेवि इंद्रियासी ।
योगी, तोची संन्यासी ।।१।।

जये त्यागिले स्विकृत कर्म ।
बिसरुनि उज्वल मानवधर्म ।
जया न कळले जीवन मर्म ।
दंभ ना, असा जया पासी ।।२।।

पूर्व सुकृते मानव योनी ।
यातचि होई जीवित ज्ञानी ।
यत्ने मोक्षाप्रत कर्मानी ।
आठवुनि, साध्य साधनेसी ।।३।।

सत्वान्नच घे आहारासी ।
विश्रांतीस्तव मित निद्रेसी ।
ब्रह्मचर्यव्रत निग्रह ज्यासी ।
योजितो, सुकृत साध्यासी ।।४।।

शुद्ध भूमिवर आसनि अढळ ।
शीर पाठ नी मानही सरळ ।
एकाग्री मन सात्विक निर्मळ ।
ठेउनी, बसे समाधीसी ।।५।।

जया मनी ना भवभय आशा ।
योगाभ्यासी विनम्र ईशा ।
विणा वासना तन अभिलाषा ।
भक्त हो, मोक्षपद वासी ।।६।।

सहाव्यानंतर सातवा, आठवा, नववा, दहावा आणि अकरावा असे अध्याय क्रमशः पूर्ण झाले आणि ज्ञानदेव नंतर "भक्तियोग" हा बारावा अध्याय सांगू लागले. "देवाला कसा भक्त प्रिय असतो" ह्या पार्थाने विचारलेल्या प्रश्नाचे भगवान श्रीकृष्णाने दिलेले उत्तर ज्यात आहे, तो बारावा अध्याय, ज्यात भगवत्भक्तीबाबत योग्य मार्गदर्शन आहे, तो अध्याय, ज्ञानदेवांनी मोठ्या रसाळ आणि भाविक वाणीने श्रोत्यांना सांगितला. जनसागर ऐकण्यात तल्लीन होऊन गेला होता :

**जीवनी सद्गुण पथी चालला ।**
**भक्त तो बहुप्रिय देवाला ।। धृ ।।**

भक्तीभावे चिंतन प्रभुचे ।
करि जो पळभर विनम्र वाचे ।
ठेवि बंधनी इंद्रिय त्याचे ।
त्यागितो ऐहिक स्वार्थाला ।।१।।

करितो कर्मा ईशपदार्पण ।
शक्ती बुद्धी सुख यश मान ।
सदा आठवी श्रीहरीचरण ।
सोडुनी द्वेष क्रोध इथला ।।२।।

प्रिय बहुलोकी अरिविण जीवन ।
सकला प्रेमी निर्मळ तन्मन ।
दुःख सुखाला मानि समान ।
दया हा मंत्र मनी धरला ।।३।।

संतोषीं मन परोपकारी ।
दृढनिश्चयि जो साध्य संगरी ।
उद्वेगा ना स्थान अंतरी ।
मानतो दुःखित जन आपुला ।।४।।

हांसत घाली यशमालाते ।
तैसा हांसत पराजयाते ।
लावी हृदयी सुख दुःखाते ।
निगर्वी, स्तुति निंदा भुलला ।।५।।

बारावा नंतर तेरावा संपला आणि पुढे ज्ञानदेवांनी "गुणत्रय विभाग योग" हा चवदावा अध्याय प्रवचना करता घेतला. यौवनातील मानवाचे सुंदर व लाघवी दिसणारे, विद्युत् वेगाने हालचाल करणारे असे ते नाशवंत शरीर आणि तेच वृद्धापकाळी, सुरकुत्या पडलेले, जीर्ण, निस्तेज आणि सर्वत्र द्वारामधून घाण वहात असलेले–पहाणाऱ्याला घृणा येईल पाहून असे ते शरीर, यांचे तुलनात्मक वर्णन ज्ञानदेव कथन करीत होते. ते कथन करीत असतांना ज्ञानदेव आपणा स्वतःला जणू विसरून गेल्याप्रत भासत होते. एकाद्या विरक्त योग्याप्रमाणे त्यांनी ते कथन संपविले, त्या क्षणी ते अतिशय भावनावश झालेले श्रोत्यांना दिसत होते.

पुढे कालानुसार पंधरावा, सोळावा, सतरावा आणि अठरावा हे सर्व अध्याय रुपांतर करून पुरते झाले. गीता प्रवचनाचा चा अद्वितीय सोहळा संपला.

प्रवचन समाप्तीक्षण आला. शेवटच्या दहा ओव्या मात्र ज्ञानदेवांनी देववाणी संस्कृतमध्येच कथन केल्या. त्याचा अर्थ सुलभ मराठीत श्रोतेजनांना समजाऊन

सांगितला. हे पाहून आजूबाजूचे लोक कुतुहलाने आपसात कुजबुजू लागले. चाणाक्ष मुक्ताईच्या ती गोष्ट लक्षात आली. "मूळ ग्रंथ देववाणीत आहे. त्याची पूर्णताही त्याच देववाणीत करून ज्ञानोबाने लौकिक साधला हे योग्यच केले." असे सांगून मुक्ताईने श्रोत्यांच्या शंकेचे निरसन केले.

अंती ज्ञानदेवांनी आपले अग्रज आणि सद्‌गुरू निवृत्तीनाथ यांचे चरणी साष्टांग नमस्कार घातला आणि कार्यसमाप्तीचे पसायदान मागितले. निवृत्तीनाथांनी आशिर्वाद दिला :

आता विश्वात्मकें देवें । येणे वागयज्ञें तोषावे ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान ॥१॥
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूता परस्परे पडो । मैत्र जीवाचे ॥२॥
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ॥३॥
वर्षत सकळ मंगळी । ईश्वर निष्ठांची मंदियाळी ।
अन अवतरत भूमंडळी । भेटतु भूंता ॥४॥
चला कल्पतरूंचे अरव । चेतना चिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयुषाचे ॥५॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड ते तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥६॥
किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होउनि तिही लोकीं ।
भजि जो आदिपुरुषी । अखंडीत ॥७॥
आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकी इये ।
दृष्टादृष्ट विजये । हो आवे जी ॥८॥
तेथ म्हणे श्रीविश्वेश्वरावो । हा होईल दान पसावो ।
येणे वरे ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥९॥

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

लेखक सच्चिदानंदांनी तळी नोंद केली.

शके बारा शते बारोत्तरे ।
तै टीका केली ज्ञानेश्वरे ।
सच्चिदानंद बाबा आदरे ।
लेखकु जाहला ॥

卐 卐 卐



नेवासे येथील 'ज्ञानेश्वर' मंदिरातील तो खांब ज्याला टेकून ज्ञानेश्वरांनी "ज्ञानेश्वरी" लिहिली. सातशे वर्षांची जुनी पुण्य कथा सांगणारे आणि भाविकांना स्फूर्ती देणारे

**श्र द्धा स्था न**

आळंदी येथे समाधीला हस्तलिखित अर्पण केल्यानंतर मिळालेला प्रासादिक नारळ कवीने मोठ्या भक्तीने खांबाशी ठेवला तो नारळ दिसत आहे.

**स**र्व जण ग्रंथ समाप्तीचा सोहळा पूर्ण झाल्यावर बाहेर आले. तिथे जनसमुदाय एक सजविलेला हत्ती घेउन बाहेर उभा होता. सोबत तुताऱ्या, भेरी, शंख, ढोल, टाळ, मृदंग घेउन वादक उभे. 'हे सर्व काय आहे', असे ज्ञानदेवांनी विचारताच, जनप्रमुख म्हणाले "ज्या महान युगपुरुषोत्तमाने **"गीता ग्रंथज्ञान"** मराठीत सांगून ते लिहवून घेतले आणि त्याद्वारे भूमीवरील सकल जनावर फार मोठे उपकार करून ठेविले, त्या महान योग्याला हत्तीवरून मिरवावे असा जनमानस आहे. कृपा करून ती आमची इच्छा पुरी करावी." हे ऐकून ज्ञानदेवांनी निवृत्तीनाथाकडे अंगुली निर्देश केला. जनश्रेष्ठी मग त्यांना विनवू लागले. पण निवृत्तीनाथांनी काहीही न बोलता, मंद हंसत मुक्ताईकडे बोट दाखविले. जनश्रेष्ठी मुक्ताईकडे वळताच ती बोलू लागली :

मुक्ताई— **"जीविता स्तुति ही नाहि बरी ॥ धृ॥**

स्तुती मानवा देई गर्व ।
धुंदित भुलतो मग तो सर्व ।
त्यातुनी उपजे प्रमाद पर्व ।
आणते, दैन्यच संसारी ॥१॥

तसेच आम्ही मानव जीवऽ ।
धारण करुनी मानवि भावऽ ।
मनी लौकिका मुळिना ठावऽ ।
आमुचा, पंथ निरंकारी ॥२॥

ज्ञानोबाने गीता ज्ञाना ।
येथे केले प्राकृति कथना ।
जनसेवा ही ध्येय धारणा ।
कृत्य हे, नव्हते उपकारी ॥३॥

मनात ऐसे जरी मिरविणे ।
शाश्वत ग्रंथा तिथे वसविणे ।
गज अंबारित तीच शोभणे ।
पुजावी 'देवी ज्ञानेश्वरी' ॥४॥

आम्ही चालू अमुच्या रंगे ।
गजामागुनी भक्त विहंगे ।
जयजयकारा गर्जत संगे ।
ठेवुनी सद्भावा अंतरी ॥५॥

卐 卐 卐

मुक्ताईच्या ह्या कथनाचा दिव्य प्रकाश जनसमुदाय मानसावर पडला. सर्वांचे समाधान झाले होते. **'माता ज्ञानेश्वरी'** ग्रंथ मग मोठ्या भक्तीभावाने हत्तीवरील अंबारीत उच्चासनावर काषाय वस्त्र पसरून, तिथे विराजमान केला. ग्रंथावर सुगंधी पुष्पमाला ठेवल्या. धूप लावला. हत्तीपुढे वाद्ये गरजू लागलीत. आणि मिरवणूक निघाली. हत्तीमागे टाळ, मृदंग, वीणा घेऊन वाद्यनादात भक्तीभावाने गाणारी भजनी मंडळी, चालत होती. त्यांचे मागे ती चार ज्ञानी निस्पृह भावंडे आणि नंतर सर्व जनसमुदाय. तो थाट काही आगळाच होता. त्या मिरवणूकीचा. असा विलोभनीय सोहळा की पाहाणाऱ्यांच्या डोळ्याचे पारणे फिटावे. रस्त्याने सुगंधी पुष्पे, तुळसीमंजिऱ्या आणि गुलाल बुक्क्याची उधळण चालू होती. सारी **निविधाग्राम नगरी** त्या पवित्र, ईश्वरी आणि सुगंधी वातावरणात न्हाउन निघाली. भजनगान, टाळ मृदंग यांचे झंकार आणि ज्ञानेश्वर जयजयकाराच्या नादात सारा परिसरच धुंद झाला. चार प्रहर होईपर्यंत मिरवणूक चालत होती. मार्गात भाविक जन ज्ञानेश्वरांच्या पायाला वंदन करीत होते. त्या श्रद्धा आणि प्रेमाच्या वर्षावाने ज्ञानेश्वर गहिवरून गेले. मिरवणुकीचा सोहळा संपला.

सायंकाळी सर्वच जण प्रवरावाळवंटात बसून गप्पागोष्टी करत होते. शांत वेळ होती. **प्रवरामाई** वाहात होती. आकाश निरभ्र होते. चांदणे पडले होते. शीतलसा वारा वाहात होता. निवृत्तीनाथ आपल्या नेहमीच्या तंद्रीतून उठले. ज्ञानदेवाला जवळ बोलावून, त्यांचे पाठीवर प्रेमाने हात फिरवीत म्हणाले, "ज्ञानदेवा : बर केलेस बाळा **गीताज्ञान** सोप्या मराठी भाषेत सांगितलेस. पण बाळा एक मात्र बाकी ठेवले तू सांगायचे." ऐकून ज्ञानदेव म्हणाले, आज्ञा करावी दादा." अरे चौदाव्या अध्यायी, **अव्यभीचारी** भक्तीचे जे दैवत त्याचे आणखी स्पष्टीकरण न करता तू श्लोकासोबत पुढे गेलास आणि ते अज्ञातच राहिले. तेच आता तू शब्दरूप करून सांगावेस. अरे तोच तर आपला शैव पंथियांचा सिद्धांत आहे." निवृत्तीनाथांनी सुचवले. "होय दादा ते तत्व मज आठवते. ते तत्व म्हणजेच शिवशक्तीरहस्य. तीच शांकरी विद्या. तेच अद्वय, शांभव वैभव. जे सर्व असूनही एकलच आहे." ज्ञानदेवांनी थोडक्यात कल्पना दिली.

"होयरे ज्ञानदेवा तेच. म्हणजेच अनुभवामृत. तू आता शब्दरूप करून सांगावेस." निवृत्तीनाथांनी आपली इच्छा प्रगट केली.

ज्ञानदेव सांगू लागले :

ज्ञानदेव– अद्वय शांभव वैभव सर्व शिवशक्ती भरले ।
उपजता ब्रह्मरुपी झाले ।। धृ ।।

जये निर्मिली चेतन शक्ती ।
प्रकाश माया मोहासक्ती ।
दिली इंद्रिया तम रज भुक्ती ।
तसे जे सत्वगुणे नटले ।।१।।

तशी घडविली प्रमाद धुंदी ।
सुकृत अमृत ब्रह्मानंदी ।
अव्यय एकांतिक सुख नांदी ।
तत्वी या विश्वसार बसले ।।२।।

अव्यभिचारी भक्त संहिता ।
वर्णियली श्रीकृष्णे पार्था ।
भूषण दिव्यची शैव सुपंथा ।
जयाला आम्ही उरी धरले ।।३।।

जयास सुख नी दुःख समान ।
दगड मृत्तिका सुवर्ण रत्न ।
प्रिय अप्रिय या भेदा कृपण ।
स्तुती ना निंदा ज्या विचले।।४।।

मानापमानि सदा विरक्त ।
धैर्यवंत मनि क्षमा उदात्त ।
नाहि वलगना करता उपकृत ।
जीवनी स्वार्था त्यागियले ।।५।।

जयास स्वामी एकच ब्रह्म ।
अभिमानाला केले दमन ।
भक्ती योगे आत्मचिंतन ।
करुनि जे परमज्ञानि रमले ।।६।।

卐 卐 卐

अमृतानुभव सांगून ज्ञानदेवाने तो शब्दरूप केला. ज्ञानेश्वरीनंतर आणखी एक ग्रंथ अमृतानुभव साकार झाला.

नेवासे येथील कार्य समाप्ती झाली आणि त्या चारही भावंडांनी नेवासे-करांचा निरोप घेतला व मग ते आळंदी मार्गाला लागले. यथा अवकाश ती चारही भावंड आळंदी वेशीजवळ येऊन पोहोचलीत.

ते आळंदीला परत येत आहेत ही वार्ता आळंदीकरांना आधीच मिळाली होती. पैठणला घडलेले दिव्य चमत्कार आणि नंतर त्यांचा झालेला मानसन्मान, नेवासे येथील वास्तव्यात ज्ञानदेवांनी भगवत्गीतेचे केलेले प्राकृती रुपांतर म्हणजेच देवी ज्ञानेश्वरीची उत्पत्ती, अमृतानुभव निर्मिती वगैरे या सर्व घटनांची माहिती आणि सत्कीर्ति आळंदीकरापर्यंत आधीच पोहोचली होती. त्यामुळे सर्व गावच पूर्वीचे सारे विसरून एकत्र झाले आणि त्यांनी त्या ज्ञानी व योगी भावंडांचे स्वागताची जंगी तयारी केली. घराघरावर गुढ्या तोरणे लावलीत. मंदिरात दीपमाळा उजळिल्या, गावात सुशोभित कमानी उभारल्यात आणि सारे आबाल-वृद्धासहीत वेशीवर त्या भावंडांचे स्वागताला येऊन उभे झाले होते. सर्वात पुढे होते. विसोबाचाटी, ग्रामउपाध्याय, महादेव शास्त्री, मुदगल शास्त्री आणि लक्ष्मी ज्ञानदेवांचा जयजयकार करीत हाती पुष्पमाळा घेऊनच. जशी ती भावंड वेशीवर आली, सर्वांनी त्यांचा जयजयकार केला. त्या जयजयकाराच्या निनादाने सारा परीसर दणाणून गेला. जनांनी त्या भावंडांच्या गळयात पुष्पमाळा घातल्या आणि त्यांचे पदवंदन केले. निवृत्तीनाथ व ज्ञानदेवांनी, विसोबा, ग्रामउपाध्याय, महादेवभट यांना आपल्या आलिंगनांत बद्ध केले. लक्ष्मीसहीत सर्वांची ख्याली खुशाली विचारली. सारे वातावरणच प्रसन्न झाले होते. नियतीचे चक्र हे असे फिरले होते.

निवेदक–

**कालचक्र हे फिरे यापरी ।**
**अघटित ते घडले ।**
**आज हे मोदपर्व आले ।। धृ ।।**

गुढया घरावर तोरण दारी ।
दीप उजळले सर्व मंदिरी ।
नवनवरी सम नटली नगरी ।
स्वागता, देवच जे झाले ।।१।।

पुष्पसुगंधी माला हाती ।
घेउनि आले वेशीवरती ।
जय ज्ञानेश्वर जय निवृत्ती ।
गर्जता, सर्वचि गहिवरले ॥२॥

येत पाहिली निवृत्तीची ।
मूर्ति तळपती ज्ञानेशाची ।
मुक्ताईसह सोपानाची ।
स्वर्गिचे सुरगण ते दिसले ॥३॥

गतकाळाच्या स्मृती आटल्या ।
ग्रामण्याच्या गाठी तुटल्या ।
पैठणच्या ज्या कथा ऐकल्या ।
कौतुके, पदि त्यांच्या नमले ॥४॥

गुलाल बुक्का उधळण केली ।
वंदुनि चरणा कृतार्थ झाली ।
पश्चात्तापे हृदये भरली ।
वंचिता, म्हणुनीं मग आपुले ॥५॥

सर्वांच्या भेटी गाठी झाल्यात. औपचारिक विचारपूस करण्याचा सोहळा संपला, आणि नंतर मिरवणुकीने त्या भावंडांना घेऊन, वाजत गाजत टाळ मृदंगाच्या निनादात, आळंदीकर गावांत आले.

दुसरे दिवसापासून त्यांचे भजन, पूजनादि नित्य कार्यक्रम सुरू झाले. आळंदी भक्तीसागरात तल्लीन होऊन गेली त्या योगी भावंडाच्या सहवासात. त्यांच्या आजोबांचा वाडा झाडून पुसून स्वच्छ करून ठेवला होता आधीच आळंदीकरांनी. त्या वाड्यातच मग ते मुक्कामास राहिले.

卐 卐 卐

असेच एक दिवस सकाळी, थंडी जास्त पडल्यामुळे ते चारही भावंडऽ उन्ह अंगावर घेत आपल्या आजोबांच्या पडक्या वाड्याच्या भिंतीवर बसले होते. निवृत्तीनाथ त्यांच्या नेहमीच्या तंद्रीत होते. ज्ञानदेव सोपान व मुक्ताई आपसात बोलत होते. हंसत बोलत त्यांचा वेळ चालला होता. जाणारे येणारे जन कौतुकाने, त्या ज्ञानी व पवित्र आचरणाच्या ईश्वरवत् भावंडाकडे पाहात होते. तोच गावच्या वेशीकडून गुराख्याची काही मुले धांवत पळत आली. ती मुले अतिशय घाबरली होती. त्या मुलांनी भिंतीवर बसलेले ते चार बहीणभाऊ पाहिलेत आणि ते भिंतीजवळ उभे झाले. "कायरे ! काय झाले तुम्हाला असे घाबरुन पळत सुटायला?" मुक्ताईने त्या मुलांना विचारले. त्या बिचाऱ्यांच्या तोंडुन नीट शब्दही निघेना उत्तर द्यायला. "वाघ, मोठा वाघऽ संतऽ हाती नाग". असेच काही तरी संदिग्ध बोलत ते थोडे थांबले. आणि मग स्वतःला सावरून, त्यापैकी वयाने मोठा असा, त्या भावंडाना सांगू लागला.

गुराखी– "चलावे पुढती । स्वागताला ॥"

डोई जटाभार । मस्तकी शेंदूर ।
व्याघ्रचर्म थोर । पांघरूनी ॥
सिद्ध शक्तीधारी । आहे व्याघ्रावरी ।
हाती नाग धरी । आसुडाला ॥
मुखावरी तेजे । सूर्यच विराजे ।
शंख वाद्य वाजे । मागे पुढे ॥
शिष्य गण वाचे । निनादी तयांचे ।
गर्जती गुरूचे । जयजयकार ॥
ऐसा तो सोहळा । पाहुनिया डोळा ।
वर्तण्या आगळा । आलो आम्ही ॥
महासंत येती । तुम्हा भेटण्याती ।
चलावे पुढती । स्वागताला ॥

ज्ञानदेवांनी गुराख्याचे तोंडून हे सर्व कथन ऐकले. "मुक्ते आज संत भेटिचा योग दिसतो. चांगदेव आलेती." ज्ञानदेवांनी मुक्ताईला म्हणताच, ती बोलली, "कायरे ज्ञानदादा, संत तर व्याघ्रावर बसून आलेती. त्यांचे स्वागताला जायचे म्हणजे आपणालाही काही तरी वाहन हवेना ?" ऐकून ज्ञानदेवांनी सद्गुरू

निवृत्तीनाथांच्या डोळयात पाहिले. निवृत्ती अर्थ समजले. "अरे ज्ञाना, सजीव वाहनापेक्षा निर्जीव वाहनच वेगाने पळते आणि व्याघ्रापुढे न भिता जाऊ शकते. चला आपण या भितीवरच बसून जाऊ स्वागत करायला." असे संदिग्ध ते बोलून गेले.

सद्गुरुंची इच्छा ऐकताच, ज्ञानदेनांनी भितीस आज्ञा दिली, "भिंती चलगे बाई संता भेटीला." आणि काय दिव्य चमत्कार ! ती निर्जिव भित त्या बसलेल्या चारही भावंडाना घेऊन एकदम आकाशात उंच उडाली विजेसारखी आणि चांगदेवांचे मार्गाकडे लागली :

निवेदक—

चंचला दिव्य नभांतरी ।
उडाली भित अधांतरी ।।धृ।।

बोले मुक्ता ज्ञानेशाला ।
व्याघ्रावरती योगी बसला ।
आपणासही पुढे जायला ।
हवेना, वाहन काही तरी ।।१।।

हासत निवृत्ती मग सांगे ।
निर्जिव वाहन पळते वेगे ।
सजीव व्याघ्रा भेटीयोगे ।
चलावे असेच भितीवरी ।।२।।

ज्ञानदेव दे आज्ञा भितिस ।
चलगे बाई संता भेटिस ।
भित उडाली नभी प्रवास ।
स्वागता, संत अहंकारी ।।३।।

अशी विस्मयी उडती भित ।
वरती बसले चार महंत ।
मुखी लीनता दिसती शांत ।
पाहती, चांगदेव यापरी ।।४।।

"मी तर व्याघ्रा वाहन केले ।
वसुनी भिंतीवर हे आले" ।
मम सिद्धीचे वळ ना असले ।
म्हणे हे,सिद्ध चमत्कारी ॥५॥

उतरे खाली व्याघ्रा वरुनी ।
नाग हातचा दिला फेकुनी ।
भिंती पुढती पडले नमनी ।
मृत्तिका लावे अपुल्या शिरी ॥६॥

चांगदेव पाहून खजील झाले तो चमत्कार. त्यांनी वाघावरून खाली उडी मारली, हातातील नाग फेकून दिला आणि भिंतीपुढे लोटांगण घालून, मातीच आपल्या शीरावर फासली. ज्ञानदेव भिंतिवरून खाली उतरले आणि पुढे होऊन त्यांनी चांगदेवांना त्यांचे दोनही बाहू धरून मोठ्या प्रेमाने उठविले आणि आपल्या दृढ आलिंगनात बद्ध केले. चांगदेव म्हणाले "ज्ञानेश्वरा क्षमा करा मला. तुमचा अधिकार फार थोर आहे." ज्ञानदेव त्यांना समजावीत उत्तरले "योगिराज, अहंकार सोडल्यावर परमेश्वर दूर नाही."

"ज्ञानेश्वरा मला चरणात घ्या आणि माझा उद्धार करा" असे चांगदेवांनी विनविताच ज्ञानदेव मुक्ताईला म्हणाले, "मुक्ते घे बाई सांभाळ ह्या बाळाला. मी तुझ्याच पदरात घालतो." असे म्हणून ज्ञानदेवांनी चवदाशे वर्षाचे योगी चांगदेव यांना चौदा वर्षाच्या मुक्ताईच्या स्वाधीन केले. तीनेही "आज्ञा दादा," म्हणून स्विकार केला त्या महान योगी शिष्याचा.

त्या दिवसापासून संत चांगदेव योगी मंडळीत सामील झाले, आणि मग भक्तीरस सागराला जणू भरतीच आली. दररोज श्री सिद्धेश्वर राउळी, भजन–कीर्तनांची बहार उडू लागली. रोज नवनवीन रचना, रोज नवा रंग. ज्ञानदेवांच्या मुखातून प्रतिभा वहात होती आणि त्या भक्तीरस प्रवाहात सर्व संत व श्रोते तल्लीन होउन न्हात होते. सर्वच जन मोहित झाले होते. असेच एक दिवस, लक्ष्मीने भजनाचे तंद्रीत ज्ञानदेव असता, ज्ञानदेवांना म्हटले, "बाबा ज्ञानदेवा एकादा नवा अभंग रचून तू मज ऐकवावा अशी माझी इच्छा आहे. ऐकीवरे बाबा आणि ती पुरी कर आज." "बर आत्या, ऐक आता" असे म्हणून ज्ञानदेवांनी सुरुवात केली.

ज्ञानदेव–

इवलेसे रोप लावियले दारी ।
त्याचा वेलु गेला गगनावरी ।।
मोगरा फुलला मोगरा फुलला ।
फुले वेचिता अति बहरू कळियासी आला ।।
मनाचिये गुंती गुंफियला शेला ।
बाप रखुमादेवीवरु विठ्ठली अर्पिला ।।

ज्ञानदेव अभंग गात होते आणि तल्लीन होऊन भक्तगण रसग्रहण करून डोलत होते. ऐकतानाच एक संत उभे झाले आणि म्हणाले, "मीही एक अभंग गाऊ काय ?" ज्ञानदेव आपल्याच भानात हरपले होते. मुक्ताईने त्या भक्ताला सांगितले, "हो हो गाना. तुम्हीही गा." त्या भक्ताने अभंगाला सुरुवात केली.

संत–

श्रीमुख साजिरें कुंडले गोमटी ।
तेथे माझी दृष्टी बैसलीसे ।।
कटीवर कर समचरण साजिरे ।
देखावया झुरे मनु माझे ।।
माहेरची आस दसरा दिवाळी ।
बाहे ठेवी निढळी वाट पाहे ।।
बंदीजन नामा उभा महाद्वारी ।
कीर्ती चराचरी वर्णितसे ।।

हा अभंग त्या विठ्ठलभक्ताने मोठ्या तन्मयतेने गायिला. ऐकतांना ज्ञानदेव तल्लीन झाले होते. अभंग संपताच ते भानावर आले आणि पुसू लागले,

"कोणी रचिला हा अभंग? फारच गोड आणि सुबक रचना आहे." "नामदेवांनी." त्या भक्ताने उत्तर दिले. नांव ऐकून ज्ञानदेव म्हणाले, "कोण नामदेव? कुठं असतात ते?" भक्त उत्तरला, "ते पंढरपुरी आहेत. विठ्ठलाचे मोठे भक्त आहेत ते. प्रत्यक्ष पांडुरंग त्यांचे हाती जेवला नैवेद्याचे ताट. मोठा अधिकार आहे त्यांचा." आणि नतर त्या भक्ताने नामदेवांचे विठ्ठलभक्तीच्या एक एक कथा त्यांना ऐकविल्या. ऐकून मुक्ताई नवलाने म्हणाली, "ज्ञानदादा हे एवढे महान संत आपणाला पहावयास मिळतील का रे?" ऐकले हे आणि लगेच ज्ञानदेव निवृत्तीनाथाकडे वळून बोलले, "दादा आपण पंढरपुरी जाऊन त्या महान भक्ताला भेटाव अशी इच्छा मनात आली आहे. विठ्ठल दर्शनाची ओढही मज लागली आहे."

निवृत्तीनाथ उत्तरले, "ज्ञानदेवा गेलेच पाहिजेरे माझ्या बाळा. उदईक पहाटेलाच पंढरपूरची वाट धरू आपण." आणि दुसरे दिवशी सुप्रभातीच तो सर्व संत मेळा पंढरपूरचे वाटेला लागला. ज्ञानदेव अभंग गात पाऊल टाकीत होते.

ज्ञानदेव– **चला सारे संतगण पंढरीसी जाऊ।**
**सगुण रूप विठ्ठलाचे डोळाभरे पाहू ॥ धृ ॥**

महिमा पुण्य पंढरीचा वर्णिता ना पुरे।
वाचा, ऐसे देवरूप सावळे गोजीरे।
भक्तासाठी नेत्रातुनी करुणा पाझरे।
असे देव विठ्ठलाचे दर्शनासी घेऊ ॥१॥

धर्म भागवत साऱ्या जनासी सांगणे।
जाति धर्म वर्ण भेद बंधना तोडणे।
मानवासी बंधुभाव मंत्र एक देणे।
घेता कार्य हेच आता आत्मा देहवाहू ॥२॥

महासंत नामा गोरा चोखा जनी सर्व।
भेट होणे आपणाला सुयोगाचे पर्व।
घटी ऐसी संताभेटी लाभणे अपूर्व।
मिळोनिया सारे गुण विठ्ठलाचे गाऊ ॥३॥

□ □ □

अशा अद्वितीय भक्तीरसाच्या आनंदात तो संत मेळा मजल दर मजल करीत चालत होता. मार्गात जनसमाजात जागृती करीत होता. जैसी एकादी नदी उगम पावतांना लहान असते पण पुढे लहान सहान ओघळ आणि नद्या तिला मिळतात आणि मग तीचे विराट रूप होते, तद्वतच त्या संत मेळचाला मार्गात इतर भक्तजन येऊन मिळत होते आणि याप्रमाणे अंती विराट रूप धारण करूनच तो हरीभक्त मेळावा पंढरपूर वेशीजवळ येऊन पोहोचला.

पैठणला घडलेले चमत्कार, रेडयाचे मुखातून ज्ञानदेवांनी काढलेली वेदवाणी, प्राकृत भाषेत गीता ज्ञान सांगून ज्ञानेश्वरी निर्माण कार्य, सच्चिदानंदांचे पुनर्जीवन, संत चांगदेवासमोर निर्जीव भिंतिला चालवून स्वागतास जाणे, इत्यादि सर्वच कथा साऱ्या देशभर पसरल्या होत्या. त्यामुळे ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपान आणि मुक्ताई या भावंडांचे दर्शन घेण्यास सर्वच जन उत्सुक होते, तर मग पंढरपूर सारख्या पतीत पावन नगरीचा संतसंग याला अपवाद कसा राहाणार ? ही भावंडे पंढरपुरी येत आहेत हे वृत्त तिथे सर्वांनाच कळले होते आणि म्हणून पंढरी त्यांचे येण्याचे मार्गावरच दृष्टी ठेवून वाट पहात होती मोठचा उत्सुकतेने. तो संतमेळावा वेशीजवळ येत आहे ही बातमी मिळाली आणि नामदेव, जनाई, नरहरी सोनार, गोरोबा कुंभार, चोखामेळा, सावता माळी, आदि सर्व संत मंडळी आणि पंढरपूरची भाविक जनता, त्या भावंडांचे आणि सोबत असलेल्या भक्तांच्या स्वागतास आली.

दुरून येत असलेला संत मेळावा त्यांना दिसला. ज्ञानेश्वरांचे ते दिव्य प्रभावंत रूप, महासिद्ध योगी निवृत्तीनाथांचे मागे, आणि त्यांचे दोनही बाजूला चालत असलेचे सोपान व मुक्ताई असे त्यांनी पाहिले. पाहून गोरोबा, नासदेवांना विचारतात, "नामदेवा ओळखलेस काय समोर कोण कोण आहेत ते ?" फक्त पंढरीचा विठ्ठल हेच एक दैवत समजणारे संत नामदेव, त्या चारही भावंडाची ओळख सांगू लागले",

नामदेव– कैवल्याची मूर्ती रूप ज्ञानेशाचे ।
नामा म्हणे मुखचंद्र पंढरिरायाचे ।। धृ ।।

सूर्य प्रभावंत दिसे मध्यभागी ।
समोर निवृत्ती गुरूनाथ योगी ।
मुक्ताई सोपानऽ अनुजाचे संगी ।
दर्शन हे भासे माझ्या विठ्ठलाचे ।।१।।

निवृत्ती विरक्त योगी महासिद्ध ।
हृदयी जयांचे लोक तिन्ही बद्धऽ ।
जिव्हाग्री विराजे विश्वसार शुद्धऽ ।
पुढे दिसे ध्यान जे शिवशंकराचे ।।२।।

ल्हाना सोपान मुक्तीचिही वाट ।
जाते भेदुनिया अंधाराची दाट ।
पलिकडे दावी स्वर्ग लोक थाट ।
कृपावंत ब्रह्मऽ द्वार जे मोक्षाचे ।।३।।

मुक्ताईचा महिमा मुक्ती एक जाणे ।
पावे ही जयाला नाही जन्म घेणे ।
ऐसी जगन्माता चालुनिया येणे ।
इथे जे पाहिले माय चित्कलेचे ।।४।।

卐 卐 卐

नामदेवांना निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताई यांची रूपऽ कशी दिसत होती हे वर्णन नामदेवांनी सांगितले. तो पर्यंत ते पुढे चालत चालत ज्ञानदेवासोबतच्या भक्त मेळाव्यापुढे पोहोचले होते. ज्ञानदेवानी नामदेवांना समोर पाहिले. दोनही दिव्य दृष्टी एकमेकात स्थिरावल्या आणि दोघांच्याही मुखावर करूण, स्नेहपूर्ण आणि मिलनोत्सुक असे भाव प्रगटले. अद्वितीय असेच विलोभनीय दृश्य होते ते. एका क्षणात दोघेही एकमेकाच्या आलिंगनात बद्ध झाले. किती तरी वेळ ते अशाच बद्ध स्थितीत होते. इतर सर्वत्र संतसमुदाय, दोन महान भक्तांचे हे अपूर्व मीलन मोठ्या कौतुकाने आणि श्रद्धेने पहात होता.

सर्वांच्या ओळखी झाल्यात आणि नंतर अप्रतीम अशा धडाक्यांत, टाळ मृदंग झंकारात व जयजयकाराच्या गगनभेदी निनादांत तो संत मेळावा पंढरपूर नगरीत आला. नामदेव व जनाबाई यांनी त्या चार भांवंडांना आणि त्यांचे सोबत आलेल्या भक्त जनांना, मोठ्या आग्रहाने व भक्तीभावाने आपल्या घरी मुक्कामाला नेले.

सर्वांसोबत श्री विठ्ठल दर्शन घेतले, त्याचप्रमाणे इतर देवळे आणि समाध्या यांनाही भेटी दिल्या. नामदेव ज्ञानदेवांना म्हणाले, "ज्ञानोबा केवढे महान कार्य केलेस तू. गीता ग्रंथाचे मराठीत भाषांतर करून त्या गीता बोधाला आणि सोबतच आपल्या मराठी बोलीला तू दिव्य रत्नहार घालून भूषित केलेस. चैतन्याचा दीप उजळिलास. अमघ्या भूमिवर नांव कमावलेस. धन्य आहे तू आणि धन्य तुझें महान सद्‌गुरू निवृत्तनाथ, ज्यांना तुझ्यासारखा 'ज्ञानसागर' अनुज व शिष्य लाभला. उद्धार केलास तू मानव योनीचा आणि जगाचा.

मुक्ताई मध्येच म्हणाली, "नामदेवा मज तुझ कीर्तन ऐकायच आहेरे एकदा. आज ऐकिवना." ज्ञानदेवही म्हणाले, "होय नामया. अरे तू मोठा विठ्ठलभक्त. विठ्ठल तुझ्या हातून जेवला. विठ्ठल गुणगान होऊ दे आज तुझ्याच तोंडून." नामदेव तयार झाले. आणि रात्री, चंद्रभागेच्या वाळवंटात असा रंग उडाला की :

निवेदक– **भागिरथीच्या वाळूवरती**
**वाजती टाळ मृदंग।**
**डोलतो स्वये पांडुरंग ॥ धृ ॥**

मुक्ताईने सूचित करता।
नामा घेई वीणा हाता।
विठुरायाचे रूप पाहता।
गातो भक्तीगीत अभंगऽ ॥१॥

किर्तन करतो नामा भोळा।
ज्ञानदेव ते वाजवि टाळा।
चिपळ्या घेऊनि चोखामेळा।
अन् गोरोबाचा मृदंगऽ ॥२॥

हरिनामाचा गजर चालला।
संत समागम धुंद जाहला।
भेदाभेदना इतुका उरला।
सर्व ते विठ्ठलनामी दंगऽ ॥३॥

पंढरिनाथाचे गुण गाता।
हरते सगळी भवभय चिंता।
नाचत मोदे भाविक भक्ता।
हर्षला विटेवरी श्रीरंगऽ ॥४॥

सकाळपर्यंत नामदेवांचे रसाळ वाणीत विठ्ठलगुणगानपर किर्तन चालू होते. जनता जनार्दनाचा महासागर, रात्रभर भक्तीरसांत बुडून आत्मियतेने रस ग्रहण करत होता. काय अद्वितीय असा संग तरी जमला होता ! वाहवा ! विठ्ठलभक्त संत नामदेव किर्तनकार. टाळ हातात घेऊन स्वयें ज्ञानेश्वर. संत गोरोबाचा नाद तालात गर्जणारा तो मृदंग आणि महाभक्त संत चोखामेळा यांचे हातातील झंकारणाऱ्या चिपळ्या. सर्वच काही अमृतमय. आणि हे सर्व स्वतःचे गुणगान ऐकणारे, भक्तगणांची तल्लीनता पाहाणारे व कौतुकाने डोलणारे ते विटेवर उभे असलेले पंढरीनाथाचे गोजिरे ध्यान ! खरोखरच पंढरीनाथ डोलत आहेत असाच भास होत होता जनगणांना. असा अपूर्व किर्तन रंग कधी झाला नाही व कधी होणे नाही अशीच भक्तांची मनोधारणा झाली त्या रात्री पहाटेपर्यंत.

पुढील चार दिवस त्या भावंडांनी जवळपासची पवित्र स्थळें, सर्व संतासोबत पाहिली आणि जनजागृति कार्य केले. एक दिवस नामदेवांना जवळ बोलावून ज्ञानदेव म्हणाले, "नामया इथ माझ्याजवळ बस जरा. मज तुझ्यापाशी माझ्या मनीचे विचार बोलायचे आहेत." ऐकून नामदेव म्हणाले, "ज्ञानदेवा केवढा भाग्यवान मी आज, अरे तू ज्ञानेश्वर, स्वतः ज्ञानाचा महासागर, तुझ्या रसनेश्वर स्वतः देवी सरस्वती वास करते, आणि तू आपले मनीचे विचार मज सांगू इच्छितो, केवढे मोठेपण दिलेस मला. सांग काय आहे असे तुझ्या मनांत."

"चारही धाम तीर्थयात्रा तुझ्या संगतीत करावी अशी इच्छा मनी आली आहे तरी माझेसोबत चलावे." ज्ञानदेवांनी आपले अंतर्मन उघडे केले नामदेवाजवळ.

"ज्ञानेश्वरा मी पंढरीनाथाचा दास. त्या चरणाशिवाय मला दुसरं काहीच दिसत नाही. मज जगाच्या इतर गोष्टीत काहीच रस नाही. माझे चारही धाम विठ्ठल–रुखमाई. काय करावयाचे आहे मज बाहेर जाऊन ?" पंढरीनाथ हेच दैवत जाणणाऱ्या भक्त नामदेवांनी अती करुण अशा वाणीने आपली प्रतिक्रिया व्यक्त केली ज्ञानदेवाजवळ. "अरे पण नामया मज तुझीच सोबत हवी आहेना." ज्ञानदेवांनी गळ घातली नामदेवाला. जनाई सर्व ऐकत होती. नामदेवांना म्हणाली, "अरे असा कसा रे तू नामा. अरे स्वतः ज्ञानेश्वर तुझा संग इच्छितो. केवढा भाग्यवान तू आणि वेड्यासारखा काय नाही म्हणतोस ? तू ज्ञानेश्वरा-सोबत यात्रेला जा. नाही म्हणू नकोस." नंतर ज्ञानदेवाना म्हणाली "येईल तो घेऊन जा त्याला." नामदेवांनी 'होय' म्हणून संमति दिली.

दुसऱ्या दिवशीच प्रातःकाळी ज्ञानदेव आणि नामदेव दोघेही निघाले."माझ्या भोळ्या नामाची काळजी घ्या वर ज्ञानेश्वरा," असे जनाई ज्ञानदेवांना विनवित होती.

जनाई–

**जपावे नामाला भूवनी ।**

**सांगते ज्ञानोबाला जनी ।। धृ ।।**

नामा माझा बहुतचि भोळा ।
वेडा विठ्ठल पदी आगळा ।
तृषा भूक ना असा वेगळा ।
तयाची, चिंता माझे मनी ।।१।।

पंढरि सोडुनि आजच दूरी ।
जातो ऐसा हा बाहेरी ।
त्याचा तारक एक श्रीहरी ।
ज्यावरी निष्ठेसी वाहुनी ।।२।।

भाग्यवंत हा तुमचा संगऽ ।
पुढे ठाकला अपूर्व रंगऽ ।
ईशस्तवनी होउनी दंग ।
जागवा अज्ञ जना जीवनी ।।३।।

पुरी करोनी पुण्य कामना ।
यावे दोघे परतुनि सदना ।
पाहु वाटुली मूक भावना ।
अंतरी शुभमंगल ठेउनी ।।४।।

卐 卐 卐

ज्ञानदेव व नामदेव दोघे मिळून तीर्थयात्रेला निघाले. निवृत्तीनाथ, सोपान, मुक्नाई आणि इतर संतजन यांनी त्या दोघांना मोठ्या प्रेमाने निरोप दिला. ती तीन भांवडे मांगे पंढरपूरला नामदेवाचे घरीच राहिली. काळ पुढे पुढे जात होता.

तीर्थाटणाचे दरम्यान, नामदेवाची विठ्ठलनामी एकाग्रता पाहून एक दिवत ज्ञानदेव म्हणाले, "नामया तुझी दृष्टी विशाल कर आणि सर्व जगाकडे आत्मियतेने समतापूर्वक नजरेने पाहा जरा. तुझ्या ध्यानात येईल की परमेश्वर सर्व ठिकाणी आहे आणि एकच आहे. फरक एवढाच की रुपे आणि नावे भिन्न आहेत आणि ती मानव संबोधित आहेत. जेव्हा तुझ्या मनी ही धारणा रुजेल तेव्हाच तुला परमानंदी रमल्याचा भास होईल. जीवन समजल्याचे समाधान होईल, नामया तुला." बोधामृतासोवतच ज्ञानदेव आपली तपस्या, योगसिद्धी, वैभव, विद्या सर्वच काही नामदेवाला मुक्तपणे देत होते. अंतीच्या परतमार्गी प्रवासात नामदेव पक्व, विशाल दृष्टीधारी, पूर्ण वैभवी, सर्वांगी परिपूर्ण झाले होते. ह्याच एका उदात्त कार्याकरता ज्ञानदेवांनी त्यांना स्वत:सोवत तीर्थयात्रेला आणले होते, आणि त्यांचा उद्देश सफल झाला होता. नामदेव परिपूर्ण झाले आणि ज्ञानदेवांनी आपली पडशी खाली करून स्वत:चे ओझे हलके केले होते.

दोघांनीही देशभर फिरून जन जागृती केली. दीनांच्या दु:खावर मायेची फुंकर घातली आणि सगुण भक्तीचा महिमा त्यांचे मनावर बिंबवून धीराचे दोन शब्द दिले. यवनांचे अत्याचार, रक्तपात, मूर्तिभंजनही पाहिले डोळ्यांनी आणि पीडितांना "बाबाने ईश्वर दूर नाही, निष्ठा ठेवा. सत्कर्म करा, एकी वाढवा, धैर्यवंत व्हा, गीताज्ञान अवलंबा, हेही दिवस जातील," असा आशामय प्रकाश दीप त्याचे हृदयी तेवविला दोघे परत पंढरपुरी आलेत तेव्हां नामदेव पूर्णत्व पावलेला तेज:पुंज पुतळा, तर ज्ञानदेव थकला, शिणला पण कृतकृत्य असा समाधानी, भासत होता. पंढरपूरला पोहोचताच ज्ञानदेवांनी मुक्ता सोपानाला विचारले, "माझे सद्गुरू कुठे आहेती ?" मुक्ता म्हणाली, "आत नेहमीप्रमाणे ध्यानस्थ बसले आहेत."

ऐकताच ज्ञानदेव धावतच आत गेले. त्यांचे मागोमागच सोपान आणि मुक्ता दोघेही चालू लागले. "तुम्ही दोघेही इथेच थांबा" असे सांगून एकटे ज्ञानदेव आत गेले. सोपान–मुक्ताई दोघे दाराबाहेरच उभे झाले, आणि संभ्रमाने वाट पाहू लागले ज्ञानदेव आंत गेले. निवृत्तीनाथ ध्यानस्थ बसले होते. ज्ञानदेवानें आपले भ्राता, तसेच सद्गुरू यांचे चरणास मिठी मारली." निवृत्तीनाथांची समाधी उतरली. गुरू–शिष्यांची दृष्टीभेट झाली. आलास परत ज्ञाना. काय पाहिजे आता तुला ?" असे निवृत्तीनाथांनी विचारताच, ज्ञानदेव विनवू लागले :

ज्ञानदेव— विनंती सद्‌गुरूपदी भावे ।
वाटते, ब्रह्मपदी जावे ।। धृ ।।

येउनि जन्मा केली पूर्ति ।
आज्ञेपरि मी सद्‌गुरु मूर्ति ।
शैव सुपंथाची जी कीर्ति ।
आपणा, सर्व असे ठावे ।।१।।

आज्ञा शिरसावंद्य मानुनी ।
पालन केले मानव जन्मी ।
थकलो आता देह मनानी ।
कामना, विश्रांतिस घ्यावे ।।२।।

सद्‌गुरु तसे भ्राता आपण ।
काहि न करणे ह्या आज्ञेविण ।
आज माग तो शैव दयाघन ।
समाधी, दान मला द्यावे ।।३।।

निवृत्तीनाथांनी ऐकले. क्षणभर स्तंभित झाले ते ऐकून. परंतु शैवपंथनीति आठवताच त्याना कर्तव्याची जाणीव झाली. भावना दुय्यम झाल्या. ज्ञानदेवांना हातांनी धरून मोठ्या प्रेमाने उठविले आणि हसतच बाहेर आणले. मुक्ता सोपान दोघेही त्या आपल्या दोन भावांच्या चेहेऱ्यावरील गूढता पाहून संभ्रमी पडले. तेथे उभे असलेल्या सर्वांनाच उद्देशून निवृत्तीनाथ म्हणाले, "चला सारेजण पांडुरंगाचे मंदिरात. आज प्रथम देवदर्शन घेऊ आणि देवास परिहार अर्पण करू आपण." ह्या गहन अशा वक्तव्याचा अर्थ मात्र उपस्थितापैकी कुणाच्याही लक्षात आला नाही. पुढे ज्ञानदेवास हाताने धरून निवृत्तीनाथ आणि मागे इतर, असे ते पढरीरायाचे मंदिराकडे जाण्यास निघाले. ज्ञानदेवास हाताने धरून पुढे चालणाऱ्या निवृत्तीनाथाकडे पाहून असेच वाटत होते कीं, जणू कुणी वडील माणूस एका लहान बालकास हाताने धरून चालत आहे. विठ्ठल मंदिरात येताच निवृत्तीनाथांनी आपल्या हाताने धरूनच ज्ञानदेवाचे शीरकमल झुकवून देवाचे चरणावर टेकविले आणि ते पंढरीनाथाला भक्तीपूर्वक आळवू लागले.

निवृत्तीनाथ– अगा विठ्ठला पंढरिनाथा, घ्यावे परिहारी ।
लेकरू तुझिया चरणावरी ॥ धृ ॥

कर्तव्यासी करूनी दमले ।
योजुनि जे जे त्यासी दिधले ।
देहि मानसी ऐसे झिजले ।
येत हे, मायेच्या मंदिरी ॥१॥

नाही बाकी उणे कुठेही ।
आज्ञाधारक हे निर्मोही ।
कृत कृत्य असे मानवदेही ।
ठाव दे, याला हृदयांतरी ॥२॥

बालक इच्छित ठाव पदाचा ।
टळणे फेरा जन्म मृत्युचा ।
अपुल्या हृदयी वास सदाचा ।
दयाघन, घ्यावे अंकावरी ॥३॥

आणि त्याच समयी पांडुरंगाचे गळ्यातील पुष्पहाराचे एक टवटवीत पुष्प ज्ञानदेवाचे विठ्ठलपदी नमीत असलेल्या शीरकमलावर पडले. निवृत्तीनाथांनी ते उचलून देवाला नमस्कार केला आणि हांसत हांसत ज्ञानदेवास धरून उभे केले. ईश्वरी प्रसाद मिळाल्याचे प्रतीक असे ते पुष्प त्यांच्या हातात होते,

मुक्ताई हे सर्व पहात होती आणि ऐकत होती. ती कंपित झाली ऐकून. निवृत्तीनाथाजवळ जाउन विचारू लागली :

ऐकुनि मुक्ता पुसे तयाला ।
काय मागसी तू देवाला ।
भाव मनीचा कळवी मजला ।
भेवरे, उपजे माझ्या उरी ॥४॥

निवृत्तीनाथांनी मुक्ताईला जवळ घेतले. मायेने तिच्या पाठीवरून हात फिरवित, तिला समजावू लागले :

"मुक्ते जीवन मंगल झाले ।
ज्ञानोबास्तव ते मागितले ।
शैव पंथिया भूषण सजले ।
समाधी, संजिवन भूवरी ॥५॥

वाळे तुजला भेव कशाचे ।
ज्ञानोबाला अमर पदाचे ।
आसन मिळते, चिर शांतीचे ।
नसावे, दु:ख कुणा अंतरी ॥६॥

卐 卐 卐

पंढरपूरचा मुक्काम संपला. सर्वजण मग पंढरी सोडून एक दिवस आळंदी मार्गाला लागले. त्या मेळाव्यात नामदेव, जनाई, चोखामेळा, सावता माळी, गोरोबा इत्यादी पंढरपूर निवासी संत मंडळी पण होती. आळंदीहून पंढरपूरला येताना जो उत्साह, होता तो दिसत नव्हता. वरवर जरी कुणीच दाखवित नव्हते तरी पण सर्वांच्या मुखावर गूढ अशी विषादाची छाया होती. आळंदीला गेल्यावर ज्ञानेश्वर 'समाधी' घेणार आणि देहाने दृष्टीआड होणार, ही कल्पनाच त्यांना दु:खित करीत होती. सर्वजण मार्ग चालत होते. ज्ञानदेव स्वत: पूर्ण भारावलेल्या अवस्थेत, जणु कोण्या सुप्त ब्रह्मानंदात वावरत आहेत असे पाहाणाऱ्यास दिसत होते. मुक्ताई सावलीप्रमाणे त्यांचे सोबत राही व त्यांची काळजी करी. निवृत्तीनाथ सदा आपल्याच तंद्रीत समाधिस्थ. सारे चालत होते. ज्ञानदेवांना चालवित होते. आता त्यांचे सर्वांसोबत ते शेवटचेच चालणे होते. ज्ञानेश्वर संजीवन समाधी घेणार ही बातमी पवनाप्रमाणे सर्वत्र परिसरात, खेडोपाडी पसरली होती. भक्त-गण जमत, त्यांचे दर्शन घेत. दु:खाचे वलय तयार होत होते भोवती. दु:खवाटणाऱ्या जनांना मुक्ताई समजावीत होती.

मुक्ताई–
**जीवनी सार्थक ज्या गाठी ।**
**शोकना करणे त्या साठी ॥ धृ ॥**

ज्ञानोशास्तव व्यर्थचि शोक ।
कृतार्थ त्याचे जीवन एक ।
ऐसा नाही कुणा लौकिक ।
सुकृती, ठेव तया पाठी ॥१॥

क्षमा संहिता स्वआचरणी ।
स्फूर्तिवंत ही अनुपम करणी ।
जीवन त्याचे पुण्य कारणी ।
सांडले, दीन हिता पोटी ॥२॥

दु:ख सोडुनी मागा देवा ।
मानवता सुख मंगल ठेवा ।
न्यायी समता प्रीती भावा ।
पीडिता, दया क्षमा दृष्टी ॥३॥

'ज्ञानदीप जो असे उजळिला ।
तेवत ठेवा पुढे तयाला ।
कार्य तयाचे चालविण्याला ।
भूवरी ऐक्य प्रेम सृष्टी ॥४॥

□ □ □

अशा तऱ्हेने तो संतमेळा आळंदीला येऊन पोहोचला. आळंदीकर भाविक जनता त्यांचे दर्शनास आली. भावसमाधीत स्थिर झालेला, आपले भ्राता आणि सद्‌गुरू निवृत्तीनाथ ह्यांचे जवळ बसलेला, देहभावांना भुललेला, सर्व इंद्रियांना आवर घातलेला, तद्रुपता पावलेला, ब्रह्मानंदी तल्लीन झालेला, आत्मरसाने संपन्न असा शांत वहाणारा अमृताचा झरा, चैतन्याचा पुतळा, प्रकाश देणारा प्रतीसूर्यदेवच, असा ज्ञानदेव सर्वांनी पाहिला.

त्रयोदशीचा दिवस हा ज्ञानदेवांनी 'समाधी दिवस' निश्चित केला आपल्या सद्‌गुरूच्या समतीने. तयारी सुरू झाली. करणारे सर्वजण अंतर्मनात सुप्त असे दु:खाचे ओझे घेऊनच, दिलेले काम करीत होते. निवृत्तीनाथांनी 'समाधीस्थळ' निश्चित ठरविले आणि तिथे सर्व तयारी करवून घेतली. एकादशीचा दिवस उजाडला. सकाळीच नामदेव आणि चांगदेव यांनी निवृत्तीनाथाकडून समाधी स्थळाची माहिती करुन घेतली आणि नामदेवपुत्र विठा व नारा यांचे हातून ते स्वच्छ झाडून पुसून घेतले. तिथे धूप दीप लावून जागा मंगलमय सुगंधी करून ठेवली. रात्रभर भजन कीर्तन झाले. दुसऱ्या दिवशी द्वादशीचे पारणे झाले. दिवसभर भेटीगाठी झाल्यात. रात्री पुन्हा भजन कीर्तनाचा मंगल आणि श्राव्य असा सोहळा उरकला. सर्व भक्तगण साऱ्याच कार्यक्रमात भाग घेत होते, दृष्य ते डोळयांनी पाहात होते, श्रवणीय ते कानांनी ऐकीत होते, पण प्रत्येकाच्या मुखावर गूढ अशी दु:खाची छाया होती. रात्री कुणीच झोपले नाही. त्रयोदशीचे सूर्यनारायण, आपल्या आगमनाची सूचना देत पूर्व क्षितिजावर रेखू लागले. प्रभा फाकू लागली.

एक वारकरी उठून ईश्वराचे गुण गाऊ लागला, तशी मुक्ताई उठली आणि जनाईचे कुशीत शिरून दु:खातिरेकाने आक्रोश करू लागली. गतकाळाची एकएक आठवण काढून आळवू लागली,

'अगे जने ज्ञानोबा अंतरतोगे आम्हाला आज. माय बाप सोडून गेले आम्हा लहानांना उघड्यावर टाकून तेव्हां ज्ञानदादानेच आम्हाला मायेची उब दिली त्यानेच पोटाशी लावले आम्हाला. तोच आम्हा तिघांची माय झाला होता. आता कोण गे मला लडिवाळ मुक्ते म्हणून गोंजारील!" तिच्या गतकाळच्या सर्व आठवणी उजळून आल्यात. बाजूला ध्यानस्थ बसलेल्या निवृत्तीनाथाच्या कानावर मुक्ताईचा हा आक्रोश पडत होता. त्यांना भडभडून आले आणि बहू प्रयासांनी रोखलेला हुंदका बाहेर पडला. मुक्ताईने तो ऐकला आणि उठून धावतच जाऊन त्यांचे अंगावर कोसळली व रडू लागली. निवृत्तीनाथ आक्रंदू लागले, "मुक्ते काय करू गे ? मी किती तरी स्वत:ला आवर घालतो पण मन आवरल्या जात नाही. माझा ज्ञानदेव, ज्ञानाचा महासागर. त्याचेवाचून आता ही खोप उदास

राहिलगे. तुम्हा पाडसांना आता मायेची उब कोण देणार." जनी नामदेव आलेत आणि निवृत्तीनाथांना समजावू लागले निवृत्तीनाथ ज्ञानदेवाचे गुण गात होते आणि हुंदके देत होते. निवृत्तीनाथाची ही गती तर इतराबाबत काय सांगावे. नामदेवही होणाऱ्या वियोग दुःखेतिरेकाने गहिवरून विठ्ठलास आळवू लागले, "पांडुरंगा, पंढरीराया अरे हा ज्ञानियांचा दीप, ब्रह्मज्ञानाचा विशाल ठेवा, दया सिंधू, योगियाचा योगी, नजरे आड होत आहेरे. मी माझे दुःख तुझ्यावाचून कुणाला सांगू, कृपाळू दयाघना."

ज्ञानदेव, भाव समाधीत बसले होते. मनाची एकाग्रता पावली होती. हा सर्व कल्लोळ ऐकून उभे झाले. आपल्या सद्गुरुंच्या पायाचे वंदन करीत त्यांनी मुक्ताईला जवळ घेतले आणि आणि तिचे डोळे पुसतच तिला आणि इतर सर्वांना सांगू लागले :

ज्ञानदेव- **नका नीर नयनी आणू उगवला सुदीनऽ ।**
**आज कृत कृत्य होतो ब्रह्मपदी लीनऽ ।। धृ ।।**

लेकरे तयांची आम्ही जे विरक्त मूर्ति ।
कार्य सिद्धि दिसता देह त्याग अशी कीर्ति ।
पुण्य वारसा निर्मोही घेउनी महानऽ ।।१।।

पहा माय मुक्ताबाई लडीवाळ माझी ।
वाहियली हासत सर्व दैव दत्त ओझी ।
तुम्ही पुर्ण चंद्र येथे शुद्ध अलांछन ऽ ।।२।।

उपजे ते पावे नाश देह मर्त्य दीनऽ ।
अंत होत पुनरपि उपजे, चक्र या समानऽ ।
सद्भाग्ये मंदिर मिळते मर्जास निरंजनऽ ।।३।।

जातिधर्म वर्ण भेद वारण्या न अन्य ।
बंधु भाव हाची मंत्र निर्मुलना दैन्य ।
हेच कार्य पावन तुम्हा करी सोपवूनऽ ।।४।।

प्रीति ऐक्य स्नेह जुळवा व्हा सुखी समर्थ ।
द्वेष अहंकार स्वार्थ यातुनी अनर्थ ।
त्याग विकारांचा करता सौख्य ये भरूनऽ ।।५।।

भाग्य थोर माझे झाले, संत सर्व गोळा ।
चांगदेव नामा गोरा जनी चोखामेळा ।
असा ब्रह्मानंद पाही, विठ्ठल दुरूनऽ ।।६।।

मजसि कुठे जाणे नाही, परतही न येणे ।
"गुरूदत्त" अमरपदाचे भाग्यवंत लेणे ।
"ज्ञानदेव समाधिस्थ" होत संजिवनऽ ।।७।।

卐 卐 卐

ज्ञानदेवांनी मोठ्या प्रयासाने सर्वांची समजूत घातली. लहानग्या सोपानाला व मुक्ताईला जवळ घेतले. आपल्या प्रेमळ बाहुपाशात धरून त्यांचे डोक्यावरून मायेने हात फिरविला मुक्ताईची हनुवटी आपल्या हाताने उचलीत तिला म्हणाले, "मुक्ते तू योगिनी आहेस. तूच शोक करतेस? अगे संजीवन समाधी हे आपल्या शैव पंथाचे भूषण. ते एकाद्याच भाग्यवंताच्या नशीबात येत असते. माय नेहमी म्हणायची की माझी मुक्ता हंसली म्हणजे तिच्या गुलाबी गालाला खळी पडते. एकदा हांस गे लडिवाळे. मला ती खळी पाहू दे." अशा भावनामय शब्दांत ज्ञानदेवानी मुक्ताईला कुरवाळीत आर्जविले. मुक्ताईने स्वतःला सावरले आणि आपल्या ज्ञानदादाकडे पाहून ती बळेच हंसली. एक क्षणच गेला. सर्वांनीच आपल्या मुखावर हास्य आणले. ज्ञानदेव म्हणाले, "माझी लडिवाळ मुक्ताई हंसली, आता शोक कुणीच करायचा नाही". निवृत्तीनाथ म्हणाले, 'अगा ज्ञानसागरा, तुझी इच्छा पूरी होइल. आता कुणीच शोक करणार नाही. सर्वजण आपापल्या कामाला लागले.

"**संजीवन समाधी**" क्षण आला. सर्व तयारी झाली. ज्ञानदेवांनी सर्व संत मंडळीचे पाय वंदिले. सर्वांना आलिंगन दिले. समाधी सोहळा पवित्र आणि अतिशय हृदयस्पर्शी अशा वातावरणात सुरू झाला :

निवेदक–

**समाधी संजीवन ध्यान ।**

**चालले दृष्टीआड ज्ञान ॥ धृ ॥**

योगी बाविस हा वर्षाचा ।
पुतळा साक्षात् कैवल्याचा ।
ब्रह्मज्ञानी सिंधु दयेचा ।
भूवरी कृतकृत्य होवूनऽ ॥१॥

मानव जन्मी सार्थक केले ।
सगुण भक्तिचे मंत्रा दिधले ।
दया शांतिचे दीप उजळले ।
संहिता स्वये आचरूनऽ ॥२॥

श्रीमद्भगवद्गीता अमृत ।
प्राकृत भाषी करुनी मुक्त ।
जनास दिधले महिमा सांगत ।
मानवा सत्पंथा लावूनऽ ॥३॥

मायामोह बंध तोडिले ।
विकार षड्रिपू सर्व जिंकिले ।
जीवन पावन कृतार्थ केले ।
लौकिका, माघारी ठेवून ॥४॥

अस्ता रजनीनाथ चालती ।
सुवर्ण लाली क्षितिजावरती ।
विलसे, ऐसी जगात कीर्ति ।
वंद्य हे, परमार्थी जीवन ॥५॥

पहा सोहळा असा चालला ।
चंदन उटणे अंगी भरला ।
सुहासिनिंनी ओवाळीला ।
वाजते टाळ मृदंग धून ॥६॥


उभा राहिला सदगुरु पुढती ।
करा जोडुनी सांगे महती ।
'काय वर्णु मी, गुरुची शक्ती ।
ज्याकृपे झालो मी पावन' ॥७॥

निवृत्तीने धरुनी त्यासी ।
हळू फिरविले प्रदक्षिणेसी ।
हस्तामध्ये ज्ञानदेविसी ।
देत घे, सिद्धेश्वर दर्शन ॥८॥

चालत विवरा द्वारी आले ।
बंधूद्वय बहु दिसे भारले ।
ज्ञानोबाने करा जोडिले ।
जनांना करण्याते वंदन ॥९॥

दोघे विवरी आंत उतरले ।
निवृत्तीने तया बसविले ।
आसनि मूळबंध साधले ।
शिरीस्वहस्तासी ठेऊन ॥१०॥

卐 卐 卐



‘ अजानबाग ’ आळंदी

समाधीत जाता विवरी ठेवि दंड येथे ।
धरी मूळ भूमित खाली, वरी पल्लवीते ।
पुण्य कथा ‘ज्ञानेश्वर’मय गातसे महान ।
एकनाथ साक्षात्कारी, बाग ही अजान ॥

अशा रीतीने निवृत्तीनाथांनी, ज्ञानदेवास समाधी आसनावर बसविले. आसनावर दर्भ, तुळसीपत्र, मंजिऱ्या व्यवस्थित रचून आसन सम करून ठेविले होते. आसन स्थिर झाले. निवृत्तीनाथांनी आशिर्वचनासाठी आपले दोनही कर ज्ञानदेवाचे शिरावर ठेविले. ज्ञानदेवाने तीनदा सद्गुरुंना नमस्कार केला आणि दृष्टीत दृष्टी मिळवून करूण वाणीने त्यांना म्हणाले :

"पाळिले पोशिले चालविला लळा ।
बा माझ्या कृपाळा निवृत्तिराजा ।
ज्ञानदेव म्हणे सुखी केले देवा ।
पादपद्मी ठेवा निरंतर ॥"

एवढे बोलून ज्ञानदेवांनी, भावभरल्या दृष्टीने सद्गुरू निवृत्तीनाथांचे दृष्टीमध्ये पाहिले. दोघांच्याही मुखावर समाधानदर्शक मद स्मित झळकले आणि नंतर ज्ञानदेवाने आपले कमळासारखे सुंदर नेत्र मिटवून घेतले. निवृत्तीनाथ संथपणे विवराबाहेर आले. "जय ज्ञानेश्वर" असा जयजयकार वातावरणात दुमदुमत होता. आकाशात त्याच समयी विजेचा एक कडकडाट झाला. निसर्ग करीत असलेला तो जणु एक जयजयकारच होता. आणि त्या मंगल जयजयकाराच्या निनादातच :

"निवृत्तीने कर्तव्यांतरी ।
शिळा बसविली विवरद्वारी ।
कथा ईश्वरी पावन सारी ।
सांगते इंद्रायणी थांबुन ॥

ॐ शांतिः शांतिः शांतिः

मुख पृष्ठ :

चित्रकार–एल. राजाराम,
आर्ट स्टुडिओ,
फोर्ट, मुंबई १

प्रथमावृत्ती
ऑगष्ट, १९७७

मुद्रक–श्री. एस. एस. पालकर
दि पॅकेज प्रिंटर्स अँड पब्लीशर्स
४३, महर्षि कर्वे रोड, मुंबई २

अंतरंग :

फोटोग्राफर :
(१) श्री. एन. एस. नायर
माटुंगा, मुंबई

(२) श्री गरुटे, फोटोग्राफर, नेवासे

ब्लॉक मेकर्स–गुप्ता ब्रदर्स, फोर्ट, मुंबई १

मुद्रक :

प्रतिभा मुद्रण, कोठी रोड
महाल, नागपूर.

गिरिजा प्रिंटर्स,
सुभाष रोड, नागपूर

प्रकाशक .
अजय प्रकाशन,
कोठी रोड, महाल, नागपूर

॥ संकलन ॥

(१) श्री. कमलाकर बुरंगे.
एम्. अे. एम्. कॉम.

(२) श्री. ल. पु. खोलापूरकर.
एम् अे, एम् अेड, डी. पी. अेड.

REFBK-0022512

REFBK-0022512

2309
दा. क्र. 22412